सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, १७ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २६३ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# प्रसिद्ध तबलावादक उस्ताद झाकीर हुसैन यांचे निधन

## वयाच्या ७३व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास, कुटुंबियांनी दिली माहिती

मुंबई: प्रसिद्ध तबलावादक झाकीर हुसैन यांचे निधन झाले आहे. वयाच्या ७३व्या वर्षी त्यांनी उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला. अमेरिकेच्या सॅन फ्रॅन्सिस्कोच्या रुग्णालयात झाकीर हुसैन यांचे निधन झाले. रविवारी रात्री उशिरा त्यांचे निधन झाल्याचे वृत्त आले होते. मात्र त्यांच्या बहिणीने हे वृत्त फेटाळून लावले होते. त्यांच्या निधनाच्या केवळ अफवा असल्याचे म्हटले होते. मात्र सोमवारी अखेर त्यांचे निधन झाले आहे. कुटुंबियांनी या बातमीला दुजोराही दिला आहे.

खरंतर, त्यांना एका आठवड्याआधी झाकीर यांना सॅन फ्रान्सिस्कोच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांचा ब्लड प्रेशरही ठीक नव्हता. आरोग्यासंबंधित समस्यांमुळे त्यांना आयसीयूमध्ये ठेवण्यात आले होते.

झाकीर हुसैन यांचा जन्म ९ मार्च १९५१मध्ये मुंबईत झाला होता. १९८८मध्ये झाकीर हुसैन यांना पद्मश्री, २००२मध्ये पद्मभूषण आणि २०२३मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. तीन वेळा झाकीर हुसैन यांनी ग्रॅमी पुरस्कार जिंकला होता. त्यांच्या वडिलांचे नाव उस्ताद अल्लाह रक्खा कुरैशी होते. तेही पेशाने तबलावादक होते. त्यांच्या आईचे नाव बीवी बेगम होते.

झाकीर हुसैन यांनी माहीम स्थित सेंट मायकल शाळेतून शिक्षण घेतले होते. तर मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधून ग्रॅज्युएशन पूर्ण केले होते. झाकीर हुसेन यांना १९९९ मध्ये यूएस नॅशनल एन्डॉवमेंट फॉर द आर्ट्सने नॅशनल हेरिटेज फेलोशिप दिली, तेव्हा त्यांना भारतीय शास्त्रीय संगीताचे जागतिक राजदूत म्हणून ओळखले गेले.

उस्ताद झाकीर हुसेन यांच्या बँडने अलीकडेच जानेवारी २०२५ मध्ये होणाऱ्या भारत दौऱ्याची घोषणा केली होती. त्यांनी आपल्या संगीतातून अनेक भारतीयांना प्रेरणा दिली आहे. वयाच्या तिसऱ्या वर्षी वडिलांच्या देखरेखीखाली त्यांनी संगीत शिकण्यास सुरुवात केली. झाकीर हुसैन यांनी वयाच्या ७व्या वर्षी पहिला परफॉर्मन्स दिला होता. झाकीर हुसेन हे पहिले भारतीय आहेत ज्यांना अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी व्हाईट हाऊसमध्ये ऑल-स्टार ग्लोबल कॉन्सर्टसाठी आमंत्रित केलं होतं.



# तबल्याचा ताल हरपला; झाकीर हुसेन यांना मुख्यमंत्र्यांची श्रद्धांजली

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

नागपूर, दि.१६ डिसेंबर : प्रसिद्ध तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांच्या निधनाने तबल्याचा ताल हरपला आहे. तबल्याच्या नादमाधुर्याने सबंध जगातील रसिक श्रोत्यांना एका समेवर आणणारा महान सुपुत्र आपण गमावला आहे, अशा शोकसंवेदना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या.

महाराष्ट्राचा सुपुत्र असलेल्या झाकीर हुसेन यांनी अवघ्या जगाला तबल्याचे वेड लावले. तीन पिढ्यांसोबत तबल्याची जुगलबंदी सादर करणारे झाकीर हुसेन यांनी अनेक युवकांना तबला वादनाकडे आकर्षित केले. तबला क्षेत्रात भारताची वेगळी ओळख त्यांनी जगात निर्माण केली. तबलानवाज पद्मविभूषण उस्ताद झाकिर हुसेन आणि तबला हे अद्वैत होते. हे अद्वैत आता भंगले आहे. जादुई बोटांनी त्यांनी स्वरमंडलात उभे केलेल्या अनेक अद्भुत मैफिली यापुढे तालयोगी तबलानवाझ उस्ताद झाकिर हुसेन यांच्याविना सुन्यासुन्या वाटत राहतील. वयाच्या सातव्या वर्षापासून तबलावादनाची सुरुवात करणाऱ्या उस्ताद झाकिर हुसेन यांनी तबलावादनातील एकल मैफिलींनाही प्रतिष्ठा मिळवून दिली.

भारतीय संगीताला जागतिक पातळीवर सन्मान मिळवून देण्यात हुसेन यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे शिष्य जगभर संगीताची सेवा करत आहेत. वडिलांकडून मिळालेला संगीताचा वारसा त्यांनी केवळ जोपासलाच नाही तर तबलावादनाला अत्युच्च अशा शिखरावर नेले. गाणारा तबला ही त्यांच्या जादुई बोटांची करामत अनेकांनी अनुभवली आहे. ज्येष्ठ कलाकारांबरोबर केलेली जुगलबंदी रसिकांसाठी पर्वणी होती. तरूण आणि होतकरू कलाकारांना व्यासपीठ मिळावे, त्यांची कला सादर व्हावी, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. तबल्याला समानार्थी नाव झाकीर हुसेन होते.

साथीच्या या वाद्याला त्यांनी व्यासपीठाच्या केंद्रस्थानी आणून त्याला जनमनात स्थान मिळवून देण्याचे महान कार्य केले. त्यांच्या निधनाने भारतीय संगीताचा तेजस्वी तारा निखळला आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या आणि चाहत्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असेही फडणवीस यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

# ईव्हीएम सरकार विरोधात महाविकास आघाडीची विधिमंडळाच्या पायऱ्यांवर निदर्शने

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

नागपूर दि .१६ - जनमत विरोधी असतानाही ईव्हीएममुळे हे सरकार निवडून आले आहे, असा आरोप करीत हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी महाविकास आघाडीच्या आमदारांनी

ईव्हीएम सरकार विरोधात आक्रमक होत हातात प्रतिकात्मक ईव्हीएम मशीन घेऊन विधिमंडळाच्या पायऱ्यांवर जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे यावेळी काहीकाळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

मर्कडवाडी येथे ग्रामस्थांनी ईव्हीएमला विरोध करून बॅलेटवर




निवडणूक घेण्याची मागणी केली, मात्र त्यांना विरोध करण्यात आला. येणाऱ्या काळात बॅलेटवर निवडणूक घेतली पाहिजे, यामागणीसाठी आंदोलन छेडणार असल्याचे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मागणी केली.

# ज्ञानसाधिकेचे शंकराचार्यांकडून कौतुक...!; गीता पठनात विशाखा पाठक अव्वल

नागपूर,१६ डिसेंबर : नागपूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवणारी बातमी आहे. नागपुरातील सेवानिवृत्त बँकर आणि लेखिका विशाखा पाठक यांनी कर्नाटकातील शृंगेरी पीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या भगवत गीता पठन परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. पाठक यांनी केलेल्या श्लोकांच्या सस्वर उच्चारणाला थेट शंकराचार्यांकडून कौतुकाची थाप मिळाली आहे. गेल्या ८ डिसेंबर रोजी कर्नाटकातील शृंगेरी पीठातर्फे ही परीक्षा घेण्यात आली होती.

लहानपणापासून दुर्मिळ प्रकारचा मधुमेहाशी दोन हात करत जीवनाची यशस्वी वाटचाल करणाऱ्या विशाखा पाठक यांनी अध्यात्म, छंद आणि साधना यांची सांगड घालत भगवत गीता कंठस्थ केली आहे. शाळेत शिकताना स्कोअरिंग सब्जेक्ट म्हणून संस्कृतची निवड करणे आणि परीक्षेत अपेक्षित गुण प्राप्त झाल्यावर सर्व सोईस्कर विसरणे हा हल्लीचा एज्युकेशन पॅटर्न बनला असताना. कसलेही प्रलोभन मनात न ठेवता आपण हे करू शकतो, आपण हे करायला हवे या दोन वाक्यांना मनाचा निर्धार बनवून ध्येयप्राप्ती होऊ शकते हे विशाखा पाठक यांनी नव्याने अधोरेखित केले आहे. यातूनच त्यांनी ८ डिसेंबर २०२४ रोजी शृंगेरी पीठातर्फे घेतली जाणारी गीता पठनाची परीक्षा वयाच्या ७० व्या वर्षी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. सोबतच २१ हजारांचे प्रथम पारितोषिक आणि शंकराचार्यांकडून अमूल्य अशी कौतुकाची थाप मिळवली आहे.

गीतेतील सर्व १८ अध्याय आणि त्यातील ७०० श्लोक त्यांना तोंडपाठ आहेत. विशेष म्हणजे गीतेतील या श्लोकांमधले ५७४ भगवान श्रीकृष्ण, ८४ अर्जुन, ४१ श्लोक संजय आणि एक श्लोक धृतराष्ट्राच्या तोंडी असल्याचे जेव्हा त्या सांगतात तेव्हा विशाखाताईंनी गीता केवळ कंठस्थ नव्हे तर आत्मसात केल्याचे लक्षात येते. विशाखाताईंनी सुमारे १० वर्षांपूर्वी पुण्यातील गीता धर्म मंडळातर्फे घेतली जाणारी परीक्षा उत्तीर्ण केली होती. परंतु, ज्ञानमार्गाच्या पांथस्त असल्यामुळे त्यांना या क्षेत्रात आणखी काही तरी करायची इच्छा होती. अशात डॉ. मालती निमदेव यांच्याकडून त्यांना शृगेरी पीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या गीता ज्ञानयज्ञ परीक्षेसंदर्भात माहिती मिळाली. ही परीक्षा मौखिक असली तरी पाणिनीच्या व्याकरणावर आधारित स्वरोच्चारांसह घेतली जाते. त्यासाठी विशाखाताईंनी पुण्यातील सुनिती उटांगळे यांचा ऑनलाईन क्लास केला. या क्लासमधून ६ जणींचा एक गृप तयार करण्यात आला. ही परीक्षा समूहिक घेतली जात असल्यामुळे त्यासाठी गृपची गरज होती. त्युनासार नागपुरातून विशाखा पाठक, निशा खंडाळकर, उर्वरित चौघीजणी पुण्याच्या आणि एक अमेरिकेतील अशा सर्वजणी एकत्र आल्यात. या परीक्षेसाठी विशाखाताईंनी अतिशय परिश्रमपूर्वक तयारी केली. यापूर्वी पाठ असलेल्या गीता पठनाऐवजी व्याकरणाच्या सिद्धांत आणि नियमानुसार पुन्हा एकदा संपूर्ण गीता नव्याने पाठ केली. त्यासाठी त्यांनी मैत्रिणी आणि नातवासोबत ६ महिने सराव केला.

त्यानंतर शृंगेरी पीठाकडे परीक्षेसाठी नोंदणी करण्यात आली. तब्बल वर्षभराच्या प्रतीक्षेनंतर त्यांच्या परीक्षेची तारीख ठरली. त्यानुसार ३२ तासांचा प्रवास करून सर्व ६ जणी शृंगेरी पीठात एकत्र आल्यात. याठिकाणी त्यांनी तब्बल ३ तास परीक्षा झाली. परीक्षकांकडून त्यांना कुठलाही श्लोक, उवाच विचारले जायचे आणि परीक्षार्थींना ते श्लोक सविस्तर वर्णनासह म्हणावे लागतात. प्रत्येक परीक्षार्थ्याला ४५ ते ५० श्लोक म्हणून दाखवावे लागतात. परीक्षेनंतर अवघ्या काही तासातच निकाल जाहीर करून प्रमाणपत्र प्रदान केले जाते. विशाखा पाठक आणि त्यांच्या सहअध्यायींनी केलेल्या गीता पठनाचे दस्तुरखुद्द शंकराचार्यांनी कौतुक केले. अध्यात्म आणि धर्म या क्षेत्रातील सर्वोच्च व्यक्तीकडून होणारे

# बीडमधील हत्येमागे मंत्र्यांवर नागरिकांना संशय

## अंबादास दानवे यांचा आरोप; आरोपींवर कडक कारवाई करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

नागपूर, दि. १६ डिसेंबर :

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील.सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येची घटना गंभीर असून यास सरकारने गांभीर्याने घेतले आहे. संबंधीत आरोपीवर कसल्याही दबावाविना कठोर कारवाई करण्यात येईल , अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधान परिषदेत दिली.

सभागृहातील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विषय २८९ अन्वये बीड मधील हत्याप्रकरणी सभागृहाला माहिती दिली. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते. अध्यक्षस्थानी उपसभापती नीलम गोऱ्हे होत्या.

यावेळी विरोधी पक्षनेते दानवे म्हणाले,' संतोष देशमुख यांच्या हत्येत राज्य मंत्रिमंडळातील एका बीडच्या मंत्र्यांच्या जवळचे वाल्मीक कराड यांचा सहभाग असल्याची येथील गावकऱ्यांना शंका आहे .या हत्येत सहभागी सर्व आरोपींना तात्काळ अटक करून वाल्मीक कराड यांच्यावर गुन्हा दाखल करावा. गुन्हा दाखल केल्याप्रकरणातील अद्याप तीन आरोपी फरारी असून त्यांना त्वरित अटक करावे. तसेच या घटनेत दोषी असलेल्या सर्वांची चौकशी करण्यात यावी. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या घटनेसाठी 'सीआयडी'ची एक विशेष एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. तांत्रिक व कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार असून फरार आरोपींना लवकरच पकडण्यात येईल. या प्रकरणात एका पोलीस अधिकाऱ्यांस सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले असून एका फौजदाराला निलंबित करण्यात आले आहे. आरोपी कोणत्याही जाती, धर्माचा किंवा राजकीय पक्षाचा असला तरी तसेच कोणत्याही दबावाचा विचार न करता यासंदर्भात कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

### तालिका सभापतींच्या नावांची घोषणा

**विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधानपरिषदेच्या तालिका सभापतीपदी नियुक्त नावे जाहीर केली. त्यासाठी सर्वश्री निरंजन डावखरे, शिवाजीराव गर्जे, कृपाल तुमाने, सुनील शिंदे, धीरज लिंगाडे यांच्या नावाची घोषणा गोऱ्हे यांनी केली.**

### काश्मीरच्या थंडीमुळे महाराष्ट्रात थंडीचा कडाका वाढणार

मुंबई १६ डिसेंबर : गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा पार चांगलाच खाली येताना दिसत आहे. देशातील उत्तरेकडे असणाऱ्या राज्यांमध्ये सध्या थंडीचा कडाका वाढत असल्याचं पाहायला मिळत आहे. काश्मीरमध्ये थंडीचं प्रमाण काहीसं कमी झालं असलं तरीही इथं पारा मात्र शून्य अंशांवर स्थिरावणार असल्याचा अंदाज असल्यामुळं या भागातून देशाच्या उर्वरित क्षेत्रांकडे वाहत येणाऱ्या वाऱ्यांमुळं मध्य भारतासह महाराष्ट्रही पुरता गारठणार आहे. महाराष्ट्रात थंडीच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. मागील २४ तासांमध्ये राज्याच्या कोकण पट्ट्यासह उत्तर महाराष्ट्रातही थंडीचा कडाका वाढणार आहे. ज्यामुळं राज्यात ही थंडीची लाट मुक्काम वाढवताना दिसेल. पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र व विदर्भातील किमान तापमान घसरले आहे. सध्याच्या घडीला निफाडमध्ये पारा ६ ते ७ अंशांदरम्यान असतानाच सर्वाधिक निच्चांकी तापमानाची नोंद धुळे येथे करण्यात आली आहे. महाराष्ट्रात सध्या धुळे, निफाड, अहिल्यानगर, परभणी, गोंदिया, नागपूर, वर्धा, आणि बुलढाणा इथं तापमान १० अंशांहूनही कमी असून, कोकणातील रत्नागिरीमध्ये राज्यातील सर्वाधिक ३४.८ अंश इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

# वाल्मीकी कराडला अटक न केल्यास तीव्र आंदोलन : आ .संदीप क्षीरसागर

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

नागपूर , दि.१६ डिसेंबर :

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येमागे वाल्मिक कराड हा मुख्य सुत्रधार आहे. पोलिस या प्रकरणात दिशाभूल करत आहे. या अधिवेशनात वाल्मिक कराडला अटक झाली नाही तर अधिवेशन संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी आंदोलन पुकारण्यात येईल, असा इशारा बीडचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी सोमवारी दिला.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विरोधी महाविकास आघाडीने या प्रश्नावरून प्रवेशद्वारावर निदर्शने करीत सत्ताधारी पक्षाविरोधात घोषणाबाजी केली यावेळी पत्रकारांशी बोलताना बीड मधील स्थानिक आमदार क्षीरसागर म्हणाले की,

संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी अपहरण करून हत्या करण्यात आली होती. सध्या या प्रकरणावरून पोलिसांच्या कार्यशैलीवर शंका व्यक्त करण्यात येत आहे. ते दिशाभूल करत आहे. या हत्येमागे वाल्मिक कराड असल्याचे सर्व पुरावे माझ्याकडे आहे. या घटनेनंतर संपूर्ण बीड जिल्ह्यात दहशतीचे वातावरण आहे. देशमुख कुटुंबीय भीतीच्या सावटखाली आहे. सरकारने या घटनेला कारणीभूत असलेल्या वाल्मिक कराडला अटक न केल्यास मोठे आंदोलन पुकारण्यात येणार आहे.' आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले,'बीड जिल्ह्यात दोन वर्षांत ३२ खून झाले आहेत. वाल्मिक कराड या सर्व प्रकरणांचा मास्टरमाइंड आहे. वाल्मिक कराडच्या मागे कोण, हे सर्वांना माहिती आहे. त्यामुळे सरकारने जनतेच्या सुरक्षिततेचा परिचय देत त्याला अटक करावी. तसेच परभणी प्रकरणातील कारागृहात असलेल्या आंदोलकाच्या मृत्यूप्रकरणी जबाबदार पोलिस कर्मचाऱ्यांना तत्काळ निलंबित करावे.' या दोन्ही मुद्यांच्या अनुषंगाने मविआतील आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले.

# बीड व परभणीच्या घटनांवर , सरकारने उत्तर द्यावे : नाना पटोले यांची मागणी

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

नागपूर, दि. १६ डिसेंबर:

अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी परभणी व बीड मधील घटनांचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. संविधानाची विटंबना व सरपंचाची निघृण हत्या या दोन्ही घटना भाजपा सरकार आल्यानंतर घडल्या आहेत. परभणीत एका आंबेडकरी विचाराच्या कार्यकर्त्याचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला आहे. या घटना अत्यंत गंभीर असून आंबेडकरी अनुयायी व राज्यातील जनतेत प्रचंड संताप आहे. सरकारने या मुद्द्यांवर उत्तर द्यायची तयारी दाखवावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

विधानसभेत परभणी व बीडच्या घटनांचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर सरकारच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा अध्यक्ष ज्या दिवशी चर्चा करण्यास सांगतील त्या दिवशी चर्चा करू असे आश्वासन दिले. त्यानंतर विधीमंडळ परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना पटोले म्हणाले की, बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांना किडनॅप केल्याची माहिती पोलिसांना होती पण देशमुख यांची अत्यंत निघृण पद्धतीने हत्या करण्यात आल्यानंतर पोलीस सक्रीय झाले. भाजपा सरकार आल्यानंतर दलित व बहुजन समाजावर अत्याचार केले जात आहेत का? ईव्हीएम सरकारने राज्यात राजकीय हत्यासत्र सुरु केले आहे का? असे प्रश्न पटोले यांनी उपस्थित केले.

परभणीतील सोमनाथ सुर्यवंशी यांना कोठडीत असताना पोलिसांनी प्रचंड हालहाल करून मारण्यात आल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे शवविच्छेदन अहवालात स्पष्ट झाले असून ही सरकार प्रायोजीत हत्या आहे. याप्रकरणी सरकारवरच हत्येचा गुन्हा दाखल केला पाहिजे अशी मागणी नाना पटोले यांनी केली आहे.

परभणीच्या मुद्द्यावर ते म्हणाले की, संविधानाची विटंबना केल्याप्रकरणी पवार नावाच्या इसमाला पोलिसांनी अटक केली असून तो मनोरुग्ण असल्याचे सांगितले जाते परंतु तो व्यक्ती बांग्लादेशातील हिंदूवरील अत्याचार प्रकरणी काढण्यात आलेल्या मोर्चात सहभागी झाला होता. सरपंच संतोष देशमुख सुद्दा हिंदूच आहे, त्यांचे हातपाय कापले, मृत्यूनंतर त्यांच्या शरिरावर आरोपी नाचले, त्यांना काय म्हणणार. बांग्ला देशातील हिंदू सुरक्षित नाहीत म्हणता मग भारतातील हिंदुंच्या संरक्षणाचे काय, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. परभणी व बीडचे प्रकरण मारकडवडीच्या ईव्हीएम विरोधातील मुद्द्यावरून लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न तर नाही ना अशी शंका येते असेही नाना पटोले म्हणाले.

### रविंद्र चव्हाण यांच्याकडून ९ कोटीसाठी मुलाचे अपहरण?

**माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री व भाजपाचे नेते रवींद्र चव्हाण यांनी त्यांच्या बंगल्यावर वैभव नावाच्या मुलाला किडनॅप करून ठेवले आहे. ९ कोटी रुपयांसाठी त्याला किडनॅप केले असून त्याच्याकडून ४.५ कोटी वसून केले आहेत, असा गंभीर आरोप पटोले यांनी यावेळी केला. ते म्हणाले उर्वरितबाकीच्या ४.५ कोटी रुपयाच्या वसुलीसाठी त्याच्यावर अत्याचार केले जात आहेत. ही कसली वसुली आहे ? एवढे पैसे चव्हाणांकडे आले कुठून, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.**

### पटोलेचे आरोप केवळ टीआरपीसाठी : रविंद्र चव्हाण

**नाना पटोले यांनी आपल्यावर केलेले आरोप बिनबुडाचे व खोटं अशी? टीआरपी मिळवण्यासाठी ते काहीही सांगत आहेत, असे प्रत्युत्तर माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिला दिले यांच्यावरील आरोपाबाबत आरोपाला उत्तर देताना ते म्हणाले की, निवडणुकीत जनतेने त्यांना पाणी पाजल्याने त्यांच्याकडे आता काही राहिलेले नाही. टीआरपी वाढण्यासाठी ते सातत्याने खोटे आरोप करत आहेत, असेही त्यानी स्पष्ट केले.**

### 'बेस्ट' बसचे अपघात टाळण्यासाठी उपाययोजना राबविणार: मुख्यमंत्री

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

नागपूर, दि. १६ डिसेंबर : मुंबईतील बेस्ट बसच्या अपघाताची घटना गंभीर असून राज्य शासनाने याची दखल घेतली आहे. अशा घटना घडू नयेत, यासाठी उपाययोजना केल्या जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधान परिषदेत सांगितले. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे या पीठासीन अधिकारी होत्या.

विधानपरिषद सदस्य सुनील शिंदे यांनी मुंबई एका आठवड्यात बेस्टचे बसचे चार अपघात झाले आहेत, चालकांना योग्य प्रशिक्षण दिले जात नाही तसेच कालबाह्य बसेस वापरात असल्याने मुंबईकरांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचा मुद्दा मांडला. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. फडणवीस म्हणाले की, 'बेस्ट' बसच्या अपघातातील वाहनचालकाची तपासणी केली आहे. या घटनेनंतर यादृच्छिक (रॅन्डम) पद्धतीने तपासणी करण्यास सुरूवात केली आहे. बेस्टमध्ये नवीन बसेस घेण्यासाठी १३०० बसेसची मागणी नोंदविण्यात आली असून त्या लवकरच बस 'बेस्ट'च्या ताफ्यात येणार आहेत.

बेस्ट बसेसची वस्तुस्थिती जाणून घेऊन उपाययोजना राबविण्यासंदर्भात मुंबई महापालिका आयुक्तांना 'बेस्ट' प्रमुखांशी चर्चा करून आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. असेही त्यांनी सांगितले.



# विस्तार आणखी बाकी, कामांचा सिलसिला असाच सुरू राहणार -आ.अर्जुन खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

निधी आणणं हे काम काही सोपं नाही. मंत्रिमंडळाचा अजून विस्तार होणे बाकी असतांनाही आपल्या प्रयत्नांना यश आले आणि ६७ कोटी रुपयांचा निधी आपल्याला मिळाला आहे. तूर्तास आपण आज चार रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ केला असला तरी हा कामांचा सिलसिला असाच सुरु राहील, असे मत आ. अर्जुनराव खोतकर यांनी येथे बोलतांना व्यक्त केले. गोरंट्याल यांचा नामोल्लेख न करता यावेळी त्यांनी त्यांच्यावरही टिका केली.

भांडवली गुंतवणूकीसाठी राज्याच्या विशेष सहाय्य योजनेअंतर्गत जालना शहरात ६७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. याच अनुषंगाने आज आयटीआय पाण्याची टाकी ते मारोती मंदिर चौक (३.४९ कोटी), रेल्वे गेट ते माँ किराणा (२.५० कोटी), पेशवे चौक ते लक्कडकोट पुलापर्यंत (१.१० कोटी), श्रीजी ढाबा ते शंकुतलानगर (२.०६ कोटी) या कामाचा आज शनिवारी आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी



मार्गदर्शन करतांना आ. श्री. खोतकर बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, काही लोकांनी निधीची वाट न पाहताच भूमिपूजन उरकुन घेतले असले तरी आपण तसे करणार नाही. अगोदर निधी मंजूर करुन आणला आणि नंतर भुमिपूजन केले आहे. आज सकाळी प्रथम प्रभू श्रीरामाचे दर्शन घेतले आणि कामाला सुरुवात केली. आपण आपल्या कामाचा हा सिलसिला असाच सुरु ठेवणार आहोत, मंत्री मंडळ विस्ताराबाबत बोलतांना आ. खोतकर म्हणाले की, मला याबाबत काहीच माहित नाही परंतू आमचे नेते एकनाथराव शिंदे हे जो निर्णय घेतील, तो आपल्याला मान्य राहिल, असेही आ. खोतकर यांनी यावेळी सांगितले.

यावेळी युवा सेनेचे सचिव श्री.अनिरुध्द खोतकर, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, संपर्क प्रमुख पंडीतराव भुतेकर तसेच गणेश सुपारकर, आत्मानंद भक्त आदींसह भाऊसाहेब कदम, बाबासाहेब इंगळे, फिरोजलाला तांबोळी, गणेश मोहिते, दिनेश भगत, पांडुरंग डोंगरे, राहुल हिवराळे, प्रदीप गायकवाड, अमोल ठाकुर, बाबुमामा जाधव, विजय जाधव, दशरथ तोंडूळे, योगेश रत्नपारखे, माधु गायकवाड, प्रमोद पवार, संतोष परळकर, संदीप साबळे, किशोर शिंदे, जाफर खान, राजू गायकवाड, स्वप्नील घुले, संजय पा. डुकरे, जगदीश रत्नपारखे, दिपक वैद्य, संतोष रासवे, किशोर शिंदे, प्रभाकर पवार, प्रमोद पवार, गणेश चव्हाण, सुशिल भावसार, संतोष परळकर, ताहेर खान, बबनराव मगरे, सुहास मुंडे, माधु गायकवाड, किशोर शिंदे, कुणाल जाधव, फिरदोस भाई, जाफर खान, पांडुरंग शिंदे, मनोज देवरे, किशोर शिंदे, राजू रमेश मुळे, अभिजीत गायकवाड, महेश कुलकर्णी, गोपाल काबलिये, मनपाचे बांधकाम अभियंता शेख सऊद उपस्थिती होती.

## संक्षिप्त

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या त्रुटी पुर्ततेसाठी आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येते. योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना नियमानूसार देय असलेली रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न खात्यात जमा केली जाते. ज्या विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी आहे त्यांना लाभ देण्यात आलेला नाही. तरी सन २०२१-२२, २०२२-२३ आणि २०२३-२४ या वर्षात अर्ज सादर केलेल्या अर्जातील त्रुटी दुरुस्तीची कार्यवाही सुरु असून संबंधित विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहुन त्रुटीची पुर्तता दि.३१ डिसेंबर २०२४ पर्यंत करावी, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त अनंत कदम यांनी केले आहे.

### १६ ते २० डिसेंबर २०२४ या पाच दिवसात कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) मोहीम राबविणार

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

शाश्वत विकास ध्येयाच्या अंतर्गत केंद्र शासनाने सन २०२७ पर्यंत शुन्य कुष्ठरुग्ण प्रसार हे उद्दिष्ट निश्चित केले आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी समाजातील लपलेले कुष्ठरुग्ण शोधुन त्यांना बहुविध उपचाराखाली आणणे आवश्यक आहे. याकरीता नियमित/विशेष सर्वेक्षणामध्ये वंचित राहणाऱ्या/दुर्लक्षित राहणाऱ्या गटांवर उदा. विटभट्टी कामगार, खाण कामगार स्थलांतरीत व्यक्ती, बांधकाम मजूर, निवासी/आश्रमशाळेत राहणारे विद्यार्थी, कंपनीत काम करणारे कामगार इ. वर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. वरील गटातील लोक हे कामाकरीता/मजूरीकरीता लवकर घर सोडतात व उशिरा घरी परत येतात. यामुळे अशा व्यक्तीची आरोग्य तपासणी नियमित सर्वेक्षण अथवा कुष्ठरोग शोध मोहिमेमध्ये होत नाही. केंद्राच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्व जिल्ह् यामध्ये १६ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२४ या कालावधीत अतिजोखमीच्या भागात कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) हे अभियान राबविण्यात येणार आहे.

जालना जिल्ह्यात कुसुम अभियानाअंतर्गत वेगवेगळ्या उपेक्षित गटांचे दि.१६ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२४ या पाच दिवसांच्या कालावधीत आशा व आरोग्य कर्मचारी यांच्या मदतीने प्रत्यक्ष सर्वेक्षण होणार आहे. जिल्हयात २१४ उपेक्षित ठिकाणावर विशेष लक्ष केंद्रित करुन जवळपास १४ हजार ९१२ व्यक्तींची शारीरीक तपासणी करण्यात येणार आहे. या तपासणी करीता जिल्हयात १२३ पथक तयार करण्यात आले आहेत व ८ पर्यवेक्षक नेमण्यात आले आहेत.

जोखीमग्रस्त भागातील महीलांची तपासणी आप्शा स्वयंसेविकांमार्फत व पुरुप सभासदाची तपासणी पुरुप आरोग्य कर्मचारी यांच्या मार्फत केली जाणार आहे. मोहिमेमध्ये शोधलेल्या संशयीत रुग्णांची वैद्यकीय अधिकारी तपासणी करुन निदान करणार आहे. तसेच नविन शोधण्यात आलेल्या कुष्ठरुग्णांच्या सहवासात असलेल्या व्यक्तींना कुष्ठरोगाची लागण होऊ नये म्हणून रिफाम्पिसिन औषधीची एक मात्रा (पीईपी) देण्यात येणार आहे. तरी तपासणी करीता घरी येणाऱ्या पथकामार्फत तपासणी करुन घेण्यात यावी असे आरोग्य विभागाकडून आवाहन करण्यात येत आहे.

कुष्ठरोग लक्षणे :-त्वचेवर फिकट, लालसर बधीर चट्टा व त्या ठिकाणी घाम न येणे.जाड, बधीर, तेलकट / चकाकणारी त्वचा. त्वचेवर गाठी असणे, कानाच्या पाळया जाड होणे.हातापायाची बोटे वाकडी असणे, मुंग्या येणे/बधीरता असणे.भुवयांचे केस विरळ होणे, डोळे पुर्ण बंद करता न येणे. त्वचेवर थंड व गरम संवेदना न जाणवणे.अशी माहिती सहाय्यक संचालक डॉ. सुधाकर शेळके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

## श्री दत्त जयंती निमित्त हरे राम नगर येथे ह.भ.प.श्रीकृष्ण महाराज शिंदे शहापूरकर यांचे हरी किर्तन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

माझा जन्मच मुळात वारकरी संप्रदायातील कुटुंबात झाल्यामुळे माझ्यावर वारकरी संप्रदायाचे संस्कार असून नित्य नियमाने पंढरीची वारी करणारी माझे वडील, यांच्यामुळे मी सांप्रदायाशी जोडल्या गेलो, आपल्याला ३२ अभंग पाठ असून, आपण वेळ मिळेल तेव्हा नित्य नियमाने भजन पूजन करण्यासाठी घरच्या घरी का होईना वेळ देत असतो असे मत राज्याची माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केले

ते हरिराम नगर दैठणा ता परतूर येथे कणसे परिवाराच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून आयोजित करण्यात येत असलेल्या दत्त जयंती उत्सव कार्यक्रमाचे आयोजित ह भ प श्रीकृष्ण महाराज शिंदे यांच्या हरी किर्तन बोलत होते. पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की मी, सेवेचा वसा हाती घेऊन दलित पीडित, निराश्रीतांची सेवा करत गेलो, मुळातच धर्म संस्कृतीला



जोपासणारी संस्कार माझ्यात असल्यामुळे माणसांना जोडत गेलो त्यातून समाजाला न्याय देऊ शकलो विकासाची अनेक कामे मतदार संघात करू शकलो असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले. शत्रुघ्न कणसे व त्यांच्या परिवाराने त्यांच्या पाच पिढ्यापासून दत्त जयंतीची ही परंपरा सतत जोपासलेली असून कणसे परिवाराचे आपण अभिनंदन करत असून यापुढेही या परिवाराने धर्म संस्कृतीसाठी अशाच प्रकारचे उत्सव नियमितपणे आयोजित करावे असेही यावेळी बोलताना त्यांनी सांगितले. यावेळी ह भ प श्रीकृष्ण महाराज शिंदे शहापूरकर यांनी हरी कीर्तनाच्या माध्यमातून, सेवा धर्म, प्रपंच आदी बाबींचा उहापोहो करत प्रपंच करत असताना देव देश आणि धर्मासाठी काम करण्याची आवाहन यावेळी उपस्थित त्यांना केले त्याचबरोबर जो राजसत्ता व धर्मसत्ता या दोन्ही चा मेळ घालतो तो जीवनामध्ये यशस्वी होतो कारण राजशत्तेचा आश्रेय खूप गरजेचा असतो आणि आपण पाहतो की या भारत देशामध्ये कधी नव्हे ते रामराज्य अयोध्येतील श्री प्रभूराम यांचे मंदिर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहकार्यातून स्थापन झाले नारीशक्तीचा आवर्जून उल्लेख करताना महाराजांनी स्थैर्य लक्ष्मी ही केवळ नारीशक्तीमुळेच टिकून राहते असे सांगतानाच महिलांनी सासू सासरे कुटुंब यांची सेवा करावी असे यावेळी बोलताना सांगितले श्री लोणीकर हे येणाऱ्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात उच्च पदावर राहतील असेही संकेत महाराजांनी बोलताना व्यक्त केले. या कार्यक्रमाला विविध राजकीय पक्षातील सामाजिक क्षेत्रातील धार्मिक क्षेत्रातील वैद्यकीय क्षेत्रातील व्यापारी क्षेत्रातील अनेक प्रतिष्ठित मंडळींची उपस्थिती होती.

## होमी भाभा परिक्षेत विवेकानंद इंग्लिश स्कूल व विवेकानंद पब्लिक स्कूलचे यश




**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

३० नोव्हेंबर रोजी घेण्यात आलेल्या होमी भाभा परिक्षेत विवेकानंद इंग्लिश स्कूल परतुर च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यशाची परंपरा कायम राखली आहे. यावर्षी इ. ०९ वी व ०६ चे अनुक्रमे १९ विद्यार्थी, १९ विद्यार्थी पास झाले असून ०९ वी तून कु. शरयू चंद्रशेखर भांडवलकर तर इ. ०६ वी तून कु. आदित्री प्रमोद आकात व चि. हर्ष जगन्नाथ बागल यांची पुढील प्रात्यक्षिक फेरी साठी निवड झाली आहे.

तसेच विवेकानंद पब्लिक स्कूल परतुर ची इ. ०६ वी विद्यार्थीनी कु. इश्वरी गणेश उबाळे ही विद्यार्थिनी पास झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्था अध्यक्ष डॉ. एस. जी. बाहेकर यांनी केले तर शालेय समिती अध्यक्ष श्री. संदीप दादा बाहेकर यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ परतूरात कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

परभणी येथील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमे समोरील संविधानाच्या प्रतिमेचे खंडन केल्यानंतर शहरात उग्र झालेल्या आंबेडकरी कार्यकर्त्यांच्या वतीने निषेध करण्यात आला या दरम्यानच झालेल्या जाळपोळ व दगडफेकीच्या घटनेत पोलिसांनी काही लोकांना अटक केली होती यातील विठ्ठल व्यंकट सूर्यवंशी या युवकाचा पोलीस मृत्यू झाल्यानंतर आंबेडकरी जनतेच्या वतीने तीव्र निषेध करण्यात येत आहे.




त्या अनुषंगाने परतूर शहरातील आंबेडकरी विचारसरणीचे कार्यकर्त्यांनी बंदचे आवाहन केले होते त्यास प्रतिसाद देत परतूर शहरात कडकडीत बंद ठेवण्यात आले शहरातील रेल्वे स्टेशन भागातून आंबेडकरी विचारसरणीचे कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयापर्यंत निषेध मोर्चा काढला यावेळी नायब तहसीलदार श्री भालेराव यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले यावेळी वंचित आघाडीचे रामप्रसाद थोरात, सिद्धार्थ पानवाले, एडवोकेट वेडेकर, सनी गायकवाड, योगी प्रधान यांनी आपले विचार मांडले या मोर्चाला परतूर शहरासह परिसरातील दलित समाजासह आंबेडकर विचारधारेचे अनुयायी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १६ डिसेंबर १९७१ च्या युद्धाची आठवण करून देणारा दिवस म्हणजे विजय दिवस-प्रा.मोहन नेहरे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भारताच्या १९७१ च्या पाकिस्तानविरुद्धच्या ऐतिहासिक विजयाची आठवण म्हणून साजऱ्या होणाऱ्या आज दि १६ डिसेंबर २०२४ रोजी विजय दिवसाचा उत्सव पार्थ सैनिकी शाळा, खरपुडी येथे मोठ्या उत्साहात पार पडला. नेहरू युवा केंद्र, जालना आणि पार्थ सैनिकी शाळेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना देशभक्ती आणि ऐतिहासिक घटनांची जाणीव करून देण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रमुख पाहुणे प्रा. मोहन नेहरे यांनी १९७१ च्या युद्धातील विजयाचे महत्त्व पटवून देत भारतीय सैनिकांनी दाखवलेल्या शौर्याची माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देत राष्ट्रसेवेसाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले. डॉ. विजय गव्हाणे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली. त्यांनी



विद्यार्थ्यांना भारताच्या इतिहासातील या विजयाचे राष्ट्रीय महत्त्व उलगडून सांगितले. नेहरू युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. युवा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष यांनी आभार प्रदर्शन केले. विद्यालयातील शिक्षकवर्ग, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. १९७१ च्या विजयाने भारताने जागतिक स्तरावर आपली ताकद दाखवली होती. अशा कार्यक्रमांमुळे तरुण पिढीला इतिहासाची जाणीव होऊन देशसेवेची प्रेरणा मिळते, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## परभणी घटनेच्या निषेधार्थ स.जळगाव येथे रस्ता रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

परभणी घटनेच्या निषेधार्थ दि.१६.डिसेंबर रोजी सकाळी भिमसैनिक रस्त्यावर उतरून सकाळी ८.वाजता रस्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे अन्वा ते रे.पिंपळगाव या मुख्य महामार्गावर





ठिय्या देत जोरदार घोषणा देत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणीचे निवेदन पोलिस निरीक्षक पारध यांना देण्यात आले दरम्यान रस्ता रोको आंदोलन वेळेस पोलिसांचा चोक बंदोबस्त तैनात होता या वेळी परीसरातील भिम सैनिक मोठ्याप्रमाणात उपस्थित होते वाहतूकीची मोठी कोंडी निर्माण झाली होती तसेच लांब पर्यंत वाहनाचे रांगा लागले होते काही काळ पुर्णपणे चक्काजाम झाला होते.

## शॉर्टसर्किटमुळे तीन एकर तुरीचे पीक जळून खाक, नुकसान भरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील तळतोंडी येथील शेतकरी नागेश नारायणराव कुलकर्णी यांच्या शेतात शॉर्टसर्किटमुळे आग लागण्याने तीन एकर शेतातील तूर व जनावरांचा चारा जळून खाक झाला. ही घटना सोमवारी सकाळी घडली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे लाख रुपयाचे



नुकसान झाले असूनही नुकसान भरपाई मिळावी , अशी मागणी शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे महावितरण करण्यात केली आहे.तर कापणीला आलेली तूर जळून खाक झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे

याप्रकरणी शेतकरी नागेश कुलकर्णी यांनी महावितरण कार्यालयात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की , मौजे तळतोंडी शिवारातील गट क्रमांक ४६ मधील तीन एकर तुरीचे पीक आहे. त्यावरून अकरा केव्हीच्या उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्या गेल्या आहेत. या तारातून शॉर्टसर्किट होऊन त्यातून ठिणग्या उडाल्या. तुरीच्या झाडावर पडल्या त्यामुळे तुरीच्या शेतामध्ये आग लागून तीन एकरच्या पिकाची राग झाली असून ७० हजार ते एक लाख रुपये पर्यंतचे नुकसान झाले असल्याचे कुलकर्णी यांनी निवेदनात म्हटले आहे. वीज वितरण च्या भोगळ कारभारामुळेच आग लागली असल्याने वीज वितरणने नुकसान भरपाई द्यावी. अशी मागणी शेतकरी नागेश कुलकर्णी यांनी केली आहे. यादरम्यान महसूल व पोलीस ठाण्यात या प्रकरणी कळविले असल्याची माहिती देखील कुलकर्णी यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## कर्मवीर काकासाहेब विद्यालयात ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन संपन्न

### विज्ञानप्रदर्शनात विक्रमी १३ विद्यार्थ्यांचा सहभाग

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१६ डिसेंबर - महाराष्ट्र शासन व पंचायत समिती शिक्षण विभाग कन्नड यांच्यावतीने ५२ वे तालुकास्तरीय शैक्षणिक वर्ष २०२४ या वर्षातील विज्ञान प्रदर्शन कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय कन्नड येथे संपन्न झाले विद्यालयात तालुक्यातील १३० विद्यार्थ्यांनी प्राथमिक व माध्यमिक गटातून आपला सहभाग नोंदवला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव तर प्रमुख पाहुणे शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण गटशिक्षणाधिकारी नीता श्रीश्रीमाळ गट विस्तार अधिकारी संगीता सावळे,केंद्रप्रमुख बाजीराव ताठे, मुख्याध्यापक तथा तालुका विज्ञान प्रदर्शन प्रमुख दिलीप गायकवाड,मुख्याध्यापक रामेश्वर राठोड, मुख्याध्यापक रवींद्र पाटील,पर्यवेक्षक देविदास चौधरी, विज्ञान शिक्षक संतोष परदेशी यांची उपस्थिती होती. शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी बालवायातच वैज्ञानिक जिज्ञासा जागृती ठेवली तर उद्याचा तो शास्त्रज्ञ निर्माण होऊ शकतो त्यामुळे विज्ञान प्रदर्शनामध्ये आपण नेहमी सहभाग घेतला पाहिजे. असे सांगितले.

विज्ञान प्रदर्शनाचे विषय अन्न आरोग्य स्वच्छता, वाहतूक आणि दळणवळण ,नैसर्गिक शेती ,आपत्ती व्यवस्थापन, गणितीय मॉडेलिंग आणि संगणकीय विचार, कचरा व्यवस्थापन, संसाधन व व्यवस्थापन असे विषय देण्यात आले होते. यासाठी प्राथमिक माध्यमिक दिव्यांगासाठी प्राथमिक व माध्यमिक तसेच प्राथमिक शिक्षक व माध्यमिक शिक्षक व प्रयोगशाळा परिचर असे गट करण्यात आले होते

विज्ञान प्रदर्शनाचे परीक्षण परीक्षक म्हणून चंद्रमणी पी मनोहर विप्लव चव्हाण,प्रा योगीराज सोमवंशी,प्रा आर के आव्हाळे, यांनी काम पाहिले. तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये यशस्वी झालेले विद्यार्थी.

प्राथमिक गट प्रथम क्रमांक मंजिरी चव्हाण जि प प्रा शा चिकलठाणा, द्वितीय क्रमांक प्राप्ती संतोष पवार जिल्हा जि प प्रा शा देभेगाव, तृतीय क्रमांक सार्थक रावते जिल्हा जि प प्रा शा विटखेडा, माध्यमिक गट - ऋतुराज संजय केवट,कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय कन्नड, द्वितीय नूतन विनय शिरसे जि प प्रशाला अंधानेर, तृतीय क्रमांक धनंजय गणेश नलावडे न्यू हायस्कूल औराळा, प्राथमिक दिव्यांग गट प्रथम श्रद्धा संतोष जाधव समता कन्या विद्यालय पिशोर, माध्यमिक दिव्यांग गट प्रथम क्रमांक राठोड रितेश अनिल नारायण विद्यालय जैतखेडा, प्राथमिक शिक्षक गट प्रथम क्रमांक अंभोरे अतुल विजय जिल्हा परिषद प्रशाला हातनुर, माध्यमिक शिक्षक गट गणेश ठकसेन मैद विद्यानिकेतन विद्यालय जोड बोरसर प्रयोगशाळा परिचर गट संजय जाधव या यशस्वी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना कार्यक्रमाचे अध्यक्ष सागर जाधव शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण गटशिक्षणाधिकारी नीता श्रीमाळ,विस्ताराधिकारी संगीता सावळे, केंद्रप्रमुख बाजीराव ताठे यांनी बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे आभार तालुका विज्ञान प्रदर्शन प्रमुख दिलीप गायकवाड यांनी मानले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप सनंसे यांनी केले

## स्वामी समर्थ केंद्रात रक्तदान शिबिर संपन्न

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि .१६ डिसेंबर - शहरातील स्वामी समर्थ केंद्रात स्वामी सेवा अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र कन्नड यांनी दत्त जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते

दि.१६ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास रक्तदान शिबिरास सुरवात झाली यावेळी ४३ रक्तदातांनी रक्तदान केले,छत्रपती संभाजीनगर येथील महात्मा गांधी मिशन मेडिकल महाविद्यालयाचे पथक आले होते,सोमवार पासून सोमवार पासून सुरुवात झालेल्या या सात दिवसीय सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले तर दि.१६ रोजी रक्तदान,व महाप्रसादाच्या कार्यक्रमाने सांगता झाली यावेळी डॉ. स्नेहल तावरे,गौतम कोराणे, कल्याण पाथ्रीकर,सौरभ सुरणार, मच्छिंद्र जाधव, आदींचा या पथकात समावेश होता,

पुरुष,महिला सेवेकरी सह केंद्र प्रतिनिधी रामकृष्ण मराठे , संजय शिरसागर, कल्याण चव्हाण, गणेश वाघ, गणेश शेजवळ ,नितीन लोंढे महिला प्रतिनिधी मीनाक्षी चव्हाण यांच्यासह सेवेकरी परिश्रम घेत सहभाग घेतला आहे

# पिण्याच्या पाण्यासाठी कन्नड येथील महिलांनी काढला हंडामोर्चा

## सात दिवसात पाणी न मिळाल्यास उपोषणाचा दिला इशारा

तभा वृत्तसेवा


कन्नड: दि.१६ डिसेंबर - तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत असलेल्या शिपघाट येथे गेल्या ५ वर्षांपासून तीव्र पाणी टंचाई भेडसावत आहे. या गंभीर बाबीकडे लोकप्रतिनिधी लक्ष देत आहेत ना प्रशासन यामुळे वैतागलेल्या महिलांनी पाणीपुरवठ्यासाठी अखेर दि.१६ डिसेंबर रोजी दुपारी १२ वा. कन्नड तहसील कार्यालयावर हंडा मोर्चा काढून, आपली व्यथा मांडली.



या संदर्भात नायब तहसिलदार श्रावण उगले (निवडणूक विभाग) यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, करंजखेड ग्रूपग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या शिपघाट या गावात गेल्या ५ वर्षांपासून पिण्याच्या पाण्याची टंचाई भेडसावत आहे. काही दिवसांपूर्वी येथील पाणीपुरवठ्याचे काम घेतलेल्या ठेकेदाराने पाईप लाईनचे व पाण्याच्या टाकीचे काम अपूर्ण ठेवले आहे. जे काही काम करण्यात आले आहे, तेही अत्यंत नित्कृष्ट दर्जाचे झालेले आहे.

गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्याने ग्रामस्थांना दुरवरून डोक्यावर पाणी आणावे लागत आहे. यात घरातील लहान मोठया माणसांचा अधिकचा वेळ जात असल्याने, विद्यार्थ्यांना शाळेत जायला, मजुरांना मजुरीवर जायला तर शेतकऱ्यांना शेतिकामासाठी उशीर होत असल्याने, रोज नवनवीन समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या संदर्भात तात्काळ कारवाई करून पाण्याची व्यवस्था करावी अन्यथा तहसील कार्यालयासमोर उपोषणास बसण्याचा इशाराही निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे. निवेदनावर उषाबाई निकम, कडूबाई बिरारे, रेखाबाई साळवे, मनिषाबाई लोखंडे, अलकाबाई साळवे, उषाबाई बिरारे, सावित्रीबाई बिरारे, परिगाबाई बिरारे, निर्मलाबाई मैंद, छायाबाई बिरारे, संगीताबाई माळकर, अलका बिरारे, कल्पना साळवे, प्रेमसिंग राजपुत आणि विश्वनाथ साळवे यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

## महाराष्ट्र बंदला वाळूज महानगरात समिश्र प्रतिसाद



वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : परभणी येथील घटनेचा निषेध व सोमनाथ सूर्यवंशी यांच्या संशयास्पद मृत्यूच्या चौकशीसाठी आज आंबेडकरी समाज बांधवांच्या वतीने महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली होती. त्या बंदला वाळूज महानगरात समिश्र प्रतिसाद मिळाला.

आंबेडकरी समाजाच्या वतीने व्यापार्यांना आपापली दुकाने बंद ठेवून या बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते, या प्रतिसादाला वाळूज महानगरातील बजाजनगर, वडगाव, पंढरपूर, रांजणगाव, साजापूर येथे समिश्र प्रतिसाद मिळाला. यावेळी आंबेडकरी समाजाच्या नेत्यांनी सकाळी ९ वाजेच्या सुमारास परिसरातील व्यापार्यांना दुकाने बंद ठेवण्याबाबत आवाहन करत बंद मध्ये सहभागी होण्याबाबत आवाहन करत होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मोरे चौक, महाराणा प्रताप चौक, पंढरपूर, रांजणगाव शें.पू., साजापूर आदी ठिकाणी व्यापार्यांनी दुकाने बंद ठेवली होती. परिसरात कोणताच अनुचित प्रकार घडला नसून शांतता असल्याचे वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक कृष्णाचंद्र शिंदे यांनी तरुण भारतशी बोलताना सांगितले.

## बजाजनगर परिसरातील कचरा उचलत परिसराची केली सफाई

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : गेल्या काही दिवसांपासून कचरा उचलणार्या कंपनीच्या कर्मचार्यांनी मनमानी करत कचरा घेण्यास कसूर करण्यात येत असल्याची नागरिकांची ओरड होती, त्यामुळे परिसरात ठिकठिकाणी कचर्यांचे ढिग साचले होते, याबाबत नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत कचरा उचलणार्या कंपनीच्यावतीने परिसरात जेसीबीच्या सहाय्याने परिसराची सफाई करण्यात आली.



बजाजनगर परिसरात महिंद्रा कंपनीच्यावतीने कचरा संकलन करण्यात येतो, परंतु परिसरातील कचरा संकलन करण्यास घंटागाडी कचरा गोळा करण्यास कसूर करत होते, त्यामुळे परिसरात ठिकठिकाणी कचर्याचे ढिगारे साचल्याने दुर्गंधी पसरत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी वाढत असल्याने कचरा गोळा करणार्या महिंद्रा कंपनीने परिसरातील सर्व कचरा जेसीबीच्या सहाय्याने गोळा करत परिसराची सफाई केली आहे. त्यामुळे नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

### कचरा घंटागाडीतच टाका

नागरिकांनी आपला कचरा इतरत्र कुठेही न टाकता घंटागाडीत टावैन कंपनीला सहकार्य करावे.कचरा उघड्यावर टाकल्याने परिसरातच दुर्गंधी पसरते परिणामी विविध आजारांना नागरिकांना सामोरे जावे लागते. यापुढे नागरिकांनी आपापला कचरा ठरवून दिलेल्या नियमांप्रमाणे कचरा आपापल्या परिसरात येणार्या घंटागाडीमध्ये टाकून सहकार्य करावे.

- उमेश भटाणे, व्यवस्थापक
महिंद्रा कचरा संकलन कंपनी


## नेहरू युवा केंद्रामार्फत स भु विद्यालय बिडकीन येथे विजय दिवस साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १६ डिसेंबर युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत नेहरू युवा केंद्र छत्रपती संभाजीनगर व शिवसेवा बहुउद्देशीय संस्था यांच्यामार्फत जिल्हा युवा अधिकारी संकल्प शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली श्री सरस्वती भुवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बिडकीन येथे विजय दिवस या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.१६ डिसेंबर १९७१ रोजी भारत पाकिस्तान यांच्या दरम्यान झालेल्या युद्धा विषयी व भारतीय सैन्य दलाच्या शौर्या विषयी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय सैन्य दलातील माजी सैनिक मच्छिंद्र हाडे,हवालदार शिवाजी वंजारे यांना बोलावून यांचा सत्कार करण्यात आला.मच्छिंद्र हाडे यांनी मुलांना देशभक्ती व राष्ट्र निर्माण साठी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच त्यांनी ज्या ज्या युद्धांमध्ये भाग घेतला त्या युद्धाविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. तसेच युवा वक्ते योगेश छबिलवाड विजय दिवसाचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रम दरम्यान उप मुख्याध्यापक युवराज पाडळे सर, योगेश छबिलवाड, नेहरू युवा केंद्र कार्यक्रम समन्वयक पंकज धुळे तसेच सर्व शिक्षक विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## सचिन संपत साळवे याची निवड



सिल्लोड : वढोद चाथा येथिल सचिन संपत साळवे याची नुकताच झालेल्या राज्यसेवा परीक्षेच्या निकालात उखडऋ पदी निवड झाल्याने त्याचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे सचिन हा अत्यंत गरीब कुटुंबातून असल्याने आई वडील रोजंदारी प्रमाणे तसेच गावात चहाची हॉटेल चालवतात त्यांच्या कष्टाची तसेच परिश्रमांची परतफेड त्यांच्या मुलानी दाखवून दिली आहे गावातून सर्व खात्यात एकतरी युवक आहे पण सी आय एस एफ मध्ये वर्णी लावणारा प्रथम ठरला आहे गावातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे असंख्या मुलांना याचा नक्कीच फायदा होईल यावेळी सरस्वती भुवनचे माझी प्राचार्य प्रा. जि आर साळवे सर माझी सरपंच श्री हरिभाऊ अण्णा चाथें. नारायण म चाथें भीमराव राघो साळवे सरपंच लक्सीमन जगताप औरंगाबाद पोलीस विष्णू साळवे ीिषि कौतिक साळवे, आकाश शंकर बावसकर,सिल्लोड तालुका वकील संघांचे सदस्य चाथें पाटिल वकील उपास्थित होते.

## गुणवत्तापूर्ण व उपक्रमशील पुरस्कार शाळेला जाहीर होताच शिक्षकांना दिले लॅपटॉप

तभा वृत्तसेवा

कन्नड, दि.१६ डिसेंबर - तालुक्यातील पठाणवस्ती गंगाराम नगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला गुणवत्तापूर्ण व उपक्रमशील पुरस्कार जाहीर झाल्याने लॅपटॉप देण्यात आले



दि.१३ रोजी चिकलठाण येथील केशव काळे यांनी शाळेतील शिक्षकांसाठी विद्यार्थ्यांना उपयोगी असे लॅपटॉप पुरस्कार म्हणून भेट देण्यात आले शाळेची गुणवत्ता अधिक व्हावी शाळेतील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा वापर करता यावा यासाठी हे लॅपटॉप देण्यात आले आहे अशी माहिती केशव काळे यांनी दिली. या कार्यक्रसाठी चिखलठाण केंद्राचे नवनियुक्त केंद्रप्रमुख सिताराम अहिरे चिकलठाण केंद्राचे माजी केंद्रप्रमुख अजिज शाह उपस्थित होते

यावेळी युवराज चव्हाण, कृष्णा गायकवाड, काकासाहेब काळे,साबळे महाराज, ज्ञानेश्वर चव्हाण, शिवराज देशमुख, प्रवीण जैन,प्रकाश गायकवाड, बापूसाहेब चव्हाण, नानासाहेब चव्हाण , दादासाहेब चव्हाण यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश चव्हाण,उपाध्यक्ष विनोद चव्हाण, सर्व व्यवस्थापन समितीतील सदस्य,पालक,विद्यार्थी ग्रामस्थ उपस्थित होते

## जिल्हयात आजपासून ग्रिस्टॅक मोहिमेस सुरुवात

### १६ तालुक्यात लोकप्रतिनिधीं, वरीष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत एकाच वेळी उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**नांदेड,दि. १६ डिसेंबर :** कृषि क्षेत्रात डिजीटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलदगतीने व परिणामकारकरित्या लाभ देणे सुलभ व्हावे यासाठी राज्यात ग्रिस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक गावात सर्व शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करण्यात येत आहेत. नांदेड जिल्ह्यात यासाठी उद्या १६ डिसेंबरपासून मोहिम राबविण्यात येत आहे. तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोहिमेच्या दिवशी उपस्थित राहून आपला शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करुन घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

शेतकरी ओळख क्रमांकामुळे शेतकऱ्यांना पीएम किसान ,पीककर्ज , पीक विमा, शेतीअनुदान इत्यादी विविध योजनांचा लाभ सुलभतेने मिळवता येणार आहे. सोमवार १६ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा भरात या मोहिमेस सुरुवात होणार आहे. प्रत्येक तालुक्यातील एका गावात स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रभावशाली व्यक्ती व संबंधीत उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, उपाधिक्षक भूमि अभिलेख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गावनिहाय पथकांची निर्मिती करण्यात आली आहे. यात ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) आणि ग्रामविकास अधिकारी (ग्रामसेवक)/ कृषी सहायक यांचा समावेश आहे. हे पथक त्यांना नेमून दिलेल्या गावांमध्ये तीन दिवस निवासी राहून ॲग्रीस्टॅक योजनेची प्रचार व प्रसिध्दी करेल आणि जास्तीत जास्त शेतकरी ओळख क्रमांक तयार करण्याची कार्यवाही पुर्ण करेल.

## बिडकीन येथे कडकडीत बंद- रास्तारोको आंदोलन करत विविध मागण्यांचे दिले निवेदन

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १६ डिसेंबर परभणी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान प्रतिकृती ची तोडफोड केल्याने तसेच शहीद सोमनाथ सुर्यवंशी हा तरुण संविधानाच्या रक्षणार्थ पोलीसांच्या कस्टडीत शहिद झाला असुन सुर्यवंशी यांचा संशयास्पद मृत्यू झाला असल्याची निषेधार्थ आज दि १६ सोमवार रोजी पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाणे हद्दीतील निलजगाव फाटा येथे भव्यदिव्य रास्तारोको आंदोलन करण्यात आले.या



निवेदनात विविध मागण्यांचा विचार केला जावा अशी मागणी केली आहे.बिडकीन येथील मूख्य रोडवरील निलजगाव फाटा येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते.यावेळी बिडकीन शहर बंदची हाक देण्यात असुन मार्केट सह परिसरात शंभर टक्के कडकडीत बंद पाळण्यात आला आहे. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे यांनी स्विकारले आहे. यावेळी निवेदनात म्हटले आहे की, परभणी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान प्रतिकृती ची तोडफोड करणाऱ्यावर कडक कारवाई करावी तसेच अमानुष मारहाणीत शहिद सोमनाथ सुर्यवंशी यांचा संशयास्पद मृत्यू झाला असल्याने चौकशी करण्यात यावी, पोलीस अधिकारी वर कार्यवाही करत निलंबित करण्यात यावे, शहिद सुर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत व एका व्यक्तीला शासकीय नोकरी मिळावी अशा विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे.

याप्रसंगी मिलिंद नरवडे,नरेश रोडगे, ग्रामपंचायत सदस्य सागर फरताळे, अंकुश धर्मे, वामण साठे अजय भिवसाने, रवि नरवडे,अक्षय नरवडे, योगेश नरवडे,वैभव दळवी, किशोर धर्मे, अमोल नरवडे, दिपक साठे,मुक्ताबाई बर्फे ,चंपाबाई नरवडे, सखुबाई नरवडे,धनुबाई बादाडे,कल्पनाबाई नरवडे ,आदी ऑल इंडिया पँथर सेना पदाधिकारी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता .

## निवृत्तीनंतर आर्थिक सुरक्षिततेसाठी मुलांवर अवलंबून राहण्याचा धोका

पुणे, १२ डिसेंबर : भारतात बऱ्याच काळापासून समाजाची रचना मुले म्हातारपणात त्यांच्या पालकांची काळजी घेतील, या कल्पनेवर आधारित आहे. यासंदर्भात बंधन एएमसीचे सेल्स अँड मार्केटिंग हेड गौरब पारिजा म्हणतात, हा सांस्कृतिक नियम एक दीर्घकालीन प्रथा आहे, ज्याचा पुरावा भारतीय सामाजिक-सांस्कृतिक प्रक्रियांमध्ये आहे. जिथे पालक मुलांचे संगोपन करण्यासाठी त्यांची सर्व संसाधने वापरतात. आपली मुले आपली काळजी घेतील, या विश्वासाने ते हे सर्व करतात, विशेषतः निवृत्त झाल्यावर वृद्धापकाळात त्यांची अपेक्षा असते. तथापि, बदलता काळ, वाढती महागाई आणि सतत विकसित होत असलेले सामाजिक बदल, या जुन्या प्रक्रियांना आव्हान देत आहेत. हे अधिकाधिक स्पष्ट होत आहे की, निवृत्तीच्या सुरक्षिततेसाठी केवळ मुलांवर अवलंबून राहणे आता व्यावहारिक राहिलेले नाही. त्यामुळे लोकांना त्यांच्या नोकरीच्या सुरुवातीच्या टप्प्यापासूनच सेवानिवृत्ती नियोजनाची जबाबदारी घेणे आवश्यक झाले आहे.

पारिजा म्हणाले, पारंपारिक भारतीय संयुक्त कुटुंब रचनेत अनेक पिढ्या एकत्र राहत होत्या. मात्र आता विभक्त कुटुंबे वाढत्या प्रमाणात लोकांसाठी आदर्श होत आहेत. हा बदल तरुण पिढीच्या बदलत्या आकांक्षांसह वाढते शहरीकरण आणि गतिशीलता या घटकांचा परिणाम आहे. त्यामुळे म्हातारपणी मुलाने आई-वडिलांची काळजी घेतली पाहिजे, ही परंपरागत धारणा हळूहळू अशक्य होत चालली आहे. याव्यतिरिक्त तरुण पिढीवर वाढते आर्थिक दबाव आहेत, ज्यात राहण्याचा खर्च, शिक्षणाचा खर्च आणि त्यांच्या



भविष्यासाठी बचत करण्याची गरज आहे. अशा वातावरणात पालकांना आधार देण्याची आर्थिक जबाबदारी मुलांवर टाकल्याने कौटुंबिक नातेसंबंधांवर अनावश्यक ताण येऊ शकतो. विकसित होत असलेले कौटुंबिक गतिशील निवृत्तीच्या सक्रिय नियोजनाची गंभीर गरज प्रतिबिंबित करते.

पारिजा यांच्या मते, मुलांवर विसंबून राहण्याऐवजी, व्यक्तींनी म्युच्युअल फंड आणि व्यावसायिक मालमत्ता व्यवस्थापन सेवा यांसारख्या विविध गुंतवणूक पर्यायांचा शोध घेऊन त्यांच्या आर्थिक भविष्याची जबाबदारी निवृत्तीनंतरची सूक्ष्म आर्थिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी घेतली पाहिजे. या बदलत्या गतिमानता लक्षात घेता, लोकांनी त्यांच्या निवृत्तीनंतरच्या जीवनासाठी आर्थिक नियोजनात वेळ आणि संसाधने गांभीर्याने गुंतवायला सुरुवात केली पाहिजे. लवकर नियोजन केल्याने वृद्धावस्थेत आर्थिक स्वातंत्र्य सुनिश्चित करण्यासाठी पुरेसा सेवानिवृत्ती निधी जमा करता येतो. लवकर सुरुवात केल्याने चक्रवाढीचा फायदा होतो, जेथे गुंतवणुकीवरील परतावा कालांतराने वेगाने वाढतो. हा दृष्टिकोन केवळ एखाद्याचे भविष्य सुरक्षित करत नाही, तर मुलांवर दबावदेखील कमी करतो आणि त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यास मदत करतो, असे त्यांचे मत आहे.

ते म्हणाले की, गुंतवणूकीची अनेक साधने आहेत, जी एक चांगली सेवानिवृत्ती किटी तयार करण्यासाठी खूप उपयुक्त ठरू शकतात, हे तुम्हाला समजून घेणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, म्युच्युअल फंड हे गुंतवणूकदाराच्या पसंतीच्या जोखमीच्या पातळीनुसार तसेच गुंतवणुकीच्या कालावधीनुसार बदलांसह येतात. इक्विटी म्युच्युअल फंड, डेट म्युच्युअल फंड आणि हायब्रीड फंड धोरणात्मकरित्या निवडले जाऊ शकतात. जोखीम आणि परतावा संतुलित करण्यासाठी, सेवानिवृत्तीच्या बचतीत स्थिर वाढ सुनिश्चित करण्यासाठी तसेच सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट स्कीम्स (एसआयपी) मध्ये गुंतवणूक करून, शिस्तबद्ध आणि नियमित गुंतवणूक केली जाऊ शकते. त्यामुळे कालांतराने संपत्ती निर्माण करणे अधिक सुलभ होते.

## विविध सामाजिक संघटना महाराष्ट्र बंद मध्ये सहभागी

### पोलिस प्रशासनास दिले विविध मागण्यांचे निवेदन



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१६ डिसेंबर - परभणी येथील घटनेतील शहीद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या संशयास्पद मृत्यूच्या निषेधार्थ आणि संविधानाच्या रक्षणार्थ आज सोमवार १६ डिसेंबर रोजी पुकारण्यात आलेल्या,' महाराष्ट्र बंद ' मध्ये कन्नड शहरातील विविध सामाजिक संघटना सहभागी झाल्या होत्या. या निमीत्ताने या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी गावात फिरुन, व्यावसायिक, दुकानदार यांना आपआपली व्यापारी प्रतिष्ठाने बंद ठेवण्याचे आवाहन केले.

या नंतर शहरातील पिशोर नाका येथे कन्नड शहर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक कुणाल सुर्यवंशी यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

या निवेदनात, आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घेण्यात यावे. अटकेतील सर्व आंदोलकांची सुटका करून, अमानुष अत्याचार करणाऱ्या पोलिसांवर कारवाई करण्यात यावी. शहीद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्यात यावे, आदि मागण्या करण्यात आल्या आहेत. या प्रसंगी सर्व पक्षीय सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# जॉर्ज सोरोस संबंधावरून काँग्रेसची अडचण

सध्या संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. सुरुवातीपासूनच हे अधिवेशन सत्ताधारी पक्ष आणि विरोधक यांच्यात खडाजंगी होण्यावरून गाजत आहे. त्यातच अमेरिकन उद्योगपती जॉर्ज सोरोस आणि काँग्रेस पक्षाच्या नेत्यांमधील कथित संबंधांच्या मुद्यावरून संसदेचे कामकाज अलिकडे पुन्हा एकदा विस्कळीत झाले. या मुद्यावर भाजपा सातत्याने आक्रमक भूमिका घेत आहे. या मुद्यावर चर्चेची मागणी करत त्यांनी संसदेत गोंधळ घातला. एका पत्रकार परिषदेत भाजपाने आरोप केला की, काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी या जॉर्ज सोरोस फाऊंडेशनला निधी पुरवत असलेल्या संस्थेशी संबंधित आहेत. त्या फाऊंडेशनने काश्मीरच्या स्वतंत्र राष्ट्राच्या कल्पनेला पाठिंबा दिला होता. हे संबंध भारताच्या अंतर्गत बाबींवर विदेशी संस्थांचा प्रभाव दर्शवतात. तसेच 'ऑर्गनाइज्ड क्राईम अ‍ॅण्ड करप्शन रिपोर्टिंग प्रोजेक्ट' आणि हंगेरियन-अमेरिकन व्यापारी जॉर्ज सोरोस याने भारताची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करण्यासाठी आणि मोदी सरकारला बदनाम करण्यासाठी विरोधकांशी संगनमत केले आहे, असा आरोपही भाजपाने केला. फोरम ऑफ डेमोक्रॅटिक लीडर्स इन एशिया पॅसिफिक (एफडीएल-एपी) फाऊंडेशनच्या सहअध्यक्ष म्हणून सोनिया गांधी जॉर्ज सोरोस फाऊंडेशनद्वारे अर्थसाहाय्यित संस्थेशी संबंधित असल्याचा दावा भाजपाने केला आहे. पक्षाच्या मते 'एफडीएल-एपी फाऊंडेशन'ने काश्मीर हा वेगळा प्रदेश मानला जावा असे मत व्यक्त केले आहे. सोनिया गांधी आणि काश्मीरला स्वतंत्र राज्य म्हणून मान्यता देण्याच्या कल्पनेला पाठिंबा देणारी संघटना यांच्यातील हे संबंध भारताच्या अंतर्गत घडामोडींवर विदेशी संस्थांचा प्रभाव आणि अशा संबंधांचे राजकीय परिणाम दर्शवतात.

भाजपाने दावा केला की, राजीव गांधी फाऊंडेशनच्या अध्यक्षपदामुळे सोनिया गांधींची जॉर्ज सोरोस फाऊंडेशनशी भागीदारी झाली. ती भारतीय संस्थांवर विदेशी निधीचा प्रभाव दर्शवते. या मुद्यावर भाजपाचे सुधांशू त्रिवेदी यांनी पुन्हा पत्रकार परिषद घेऊन हा अत्यंत गंभीर विषय असल्याचे सांगितले. हा प्रश्न राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित आहे. परकीय शक्तींशी असलेल्या काँग्रेस पक्षाच्या या भागीदारीमुळे देशाची सुरक्षा धोक्यात आली आहे. काँग्रेसचे माजी नेते नटवर सिंह यांनीही सोनिया गांधी यांना उद्देशून, पक्षात विदेशी शक्ती सक्रिय आहेत, असे लिहिले होते. काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी जाहीरपणे जॉर्ज सोरोसचा जुने मित्र असा उल्लेख केला होता. या पृष्ठभूमीवर सोरोस हे सध्या भारतीय राजकारणात वादाचा विषय झाले आहेत. अर्थात हे पहिल्यांदाच घडत आहे किंवा सोनिया गांधी आणि सोरोस यांच्यावर पहिल्यांदाच आरोप होत आहेत असे नाही. भारतीय जनता पक्षाने गांधी कुटुंबासह काँग्रेस पक्ष आणि त्यांचे प्रमुख नेते राहुल गांधी यांच्यावर टीका करण्यासाठी सोरोसचे नाव घेतले. भाजपाने राहुल गांधी देशद्रोही असल्याचा आरोप केला आणि काँग्रेस पक्ष कथितपणे भारताविरुद्ध सोरोस याचा अजेंडा पुढे रेटत असल्याचा आक्षेप घेतला. भाजपाचे हे आरोप जॉर्ज सोरोस याच्याशी संबंधित वादांच्या जागतिक गाथेतील एक उदाहरण आहे. 'ओपन सोसायटी फाऊंडेशन' (ओएसएफ) च्या माध्यमातून त्याच्या आर्थिक शोषणापासून परोपकारी उपक्रमांपर्यंत सोरोस प्रशंसा आणि टीका या दोन्हींच्या केंद्रस्थानी आहेत. सोरोस याचा जन्म १२ ऑगस्ट १९३० रोजी हंगेरीच्या बुडापेस्ट येथे झाला. नाझी राजवटीत तो ज्यू कुटुंबात वाढला. तो आपली ओळख लपवून होलोकॉस्ट (नाझी जर्मन केलेले ज्यूंचे राज्य-प्रायोजित हत्याकांड) मधून वाचला आणि नंतर इंग्लंडला गेला. त्याने 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'मध्ये शिक्षण घेतले आणि तत्त्वज्ञ कार्ल पॉपर आणि त्यांच्या ओपन सोसायटीच्या विचारांनी खूप प्रभावित झाला. १९७० मध्ये सोरोसने सोरोस फंड मॅनेजमेंट या हेज फंडची स्थापना केली. त्यातून त्याला प्रचंड संपत्ती मिळाली. त्याची सर्वांत वादग्रस्त आर्थिक चाल १९९२ मध्ये आली, जेव्हा त्याने ब्रिटिश पौंडविरुद्ध पैज लावली आणि एका दिवसात एक अब्ज पौंडपेक्षा जास्त कमाई केली. यामुळे त्याला 'द मॅन हू ब्रोक द बँक ऑफ इंग्लंड' असे टोपणनाव मिळाले.

'ओपन सोसायटी फाऊंडेशन'च्या माध्यमातून सोरोसने जगभरातील लोकशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि मानवी हक्कांना प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांसाठी ३२ अब्ज डॉलरहून अधिक देणगी दिली आहे. त्याच्या फाऊंडेशनने कम्युनिस्टोत्तर युरोपमधील नागरी समाज प्रकल्पांना तसेच अमेरिका आणि इतरत्र प्रगतिशील चळवळींना निधी दिला आहे. सोरोसने हुकूमशाही शासन, उत्पन्न असमानता आणि हवामानबदल या मुद्यांवरही आवाज उठवला आहे. तथापि, विरोधकांचा युक्तिवाद आहे की सोरोस आपली संपत्ती राजकीय कथांना आकार देण्यासाठी आणि परोपकाराच्या नावाखाली सार्वभौमत्व हडपण्यासाठी वापरत आहे. २०२० मध्ये, दावोस येथील 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'मधील भाषणादरम्यान सोरोसने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरकारवर उघडपणे टीका केली. तेव्हापासून तो भाजपाच्या रडारवर आहे. सोरोसने नागरिकत्व दुरुस्ती कायदा आणि जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० निष्प्रभ करण्यावर टीका केली आणि मोदी सरकारवर फूट पाडणारी धोरणे राबवल्याचा आरोप केला. जागतिक स्तरावर लोकशाहीला धोका निर्माण करणाऱ्या राष्ट्रवादी नेत्यांपैकी एक या शब्दांमध्ये त्याने मोदी यांचा उल्लेख केला. त्याच्या वक्तव्यावर भारतीय नेते आणि टीकाकारांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या. भारताच्या देशांतर्गत व्यवहारात परकीय हस्तक्षेप असल्याची त्याची टिप्पणी भाजपाने स्पष्टपणे नाकारली. सोरोसच्या 'ओपन सोसायटी फाऊंडेशन' (ओएसएफ)वर भारतातील सरकारी धोरणांचा विरोध करणाऱ्या 'एनजीओ' आणि कार्यकर्त्यांना निधी पुरवल्याचा आरोप आहे. त्याच्या संस्थेने 'सीएए' आणि २०२० च्या कृषी कायद्यांविरोधातील निदर्शनांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याचा आरोप आहे. काही भारतीय समालोचक आणि उजव्या विचारसरणीच्या गटांनी दावा केला आहे की, सोरोसचा निधी अप्रत्यक्षपणे खलिस्तान राज्याचा पुरस्कार करणाऱ्यांसह फुटीरतावादी चळवळींना समर्थन देतो. या दाव्यांचे थेट पुरावे नसले, तरी आरोपांमुळे भारताच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणारा म्हणून सोरोसची प्रतिमा मजबूत झाली आहे. 'ओएसएफ'सारख्या संस्थांच्या कथित विदेशी हस्तक्षेपाला प्रतिसाद म्हणून भारत सरकारने 'फॉरेन कॉन्ट्रिब्युशन रेग्युलेशन अ‍ॅक्ट'अंतर्गत नियम कडक केले आहेत. विदेशी निधीचा गैरवापर केल्याप्रकरणी अनेक स्वयंसेवी संस्थांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. भाजपा सातत्याने सोरोसचा संबंध काँग्रेस पक्षाशी जोडते आहे. राहुल गांधी हे भारताला अस्थिर करण्याच्या सोरोसच्या अजेंड्याशी संबंधित असल्याचा आरोप भाजपाने केला आहे.

राहुल गांधी यांना सर्वोच्च देशद्रोही संबोधत भाजपाने देशांतर्गत राजकीय असंतोषाला परकीय हस्तक्षेपाशी जोडण्याचा प्रयत्न केला असून सोरोसला या कथित षडयंत्रातील प्रमुख खेळाडू मानले आहे. सोरोसच्या आर्थिक कारनाम्यांमध्ये १९९२ च्या 'ब्लॅक वेन्सडे क्रायसिस'चाही समावेश आहे. त्यासाठी त्याच्यावर मोठ्या प्रमाणावर टीका झाली होती. पैसा कमावण्यासाठी विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्था अस्थिर केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. १९९७ च्या आशियाई आर्थिक संकटादरम्यान सोरोसवर चलन व्यापाराद्वारे आर्थिक अस्थिरता वाढवल्याचा आरोप होता. त्याच्यावर इमिग्रेशन, 'एलजीबीटीक्यू' अधिकार आणि इतर देशांमधील सरकारविरोधी निदर्शकांना निधी देऊन राजकारणात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. हंगेरी आणि रशियासारख्या देशांनी त्याच्यावर त्यांच्या देशांतर्गत राजकारणात हस्तक्षेप केल्याचा आरोप केला आहे, तर उजव्या विचारसरणीचे नेते त्याला जागतिक स्तरावर राष्ट्रीय सार्वभौमत्वासाठी धोका मानतात. सोरोस अनेकदा कट सिद्धांतांच्या केंद्रस्थानी असतो. गौतम अदानीबाबत सरकारला घेरण्याचा प्रयत्न करणारी काँग्रेस सोरोसच्या मुद्यावर अलिकडे कोंडीत सापडली. सोरोसच्या निमित्ताने भाजपाने काँग्रेसच्या सर्वोच्च नेतृत्वाला अडचणीत आणले आहे. असे असताना भविष्यात जॉर्ज सोरोस आणि सोनिया गांधी यांच्या संबंधाचे उत्तर काँग्रेसला द्यावेच लागेल.

---

## दिल्ली दिनांक

# बांगलादेशची नवी चाल!

**रवींद्र दाणी**

भारत प्रामाणिकपणे बांगलादेशासोबतचे संबंध पूर्ववत् करण्याचा जोरदार प्रयत्न करीत असताना, बांगलादेश मात्र हे संबंध अधिक बिघडविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे आता स्पष्ट होऊ लागले आहे. बांगलादेशातील हिंदूंवर हल्ले केले असताना बांगलादेशने एक मोठा निर्णय घेत भारताला एक प्रतिकूल संदेश दिला आहे. बांगलादेश दूरसंचार नियामक आयोगाने भारताशी झालेला एक करार रद्द करण्याचा निर्णय घोषित केला आहे. पूर्वोत्तर भागाचा उर्वरित भारताशी संपर्क वाढविण्यासाठी बांगलादेशाला लागून असलेल्या भागात काही दूरसंचार मनोरे उभारण्याचा करार दोन्ही देशांत काही महिन्यांपूर्वी करण्यात आला होता. याचा भारताला होणारा मोठा फायदा म्हणजे पूर्वोत्तर भागातील कमकुवत दूरसंचार व्यवस्था बळकट होणार होती. बांगलादेशने हा करारच रद्द करून भारताला मोठा धक्का दिला आहे.

**चीनचा हात?** : बांगलादेश आपल्या अंतर्गत मामल्यांमध्ये गुंतला असताना, त्याने नेमका हा करार रद्द करण्याचा निर्णय करावा यामागे चीन असल्याचे म्हटले जात आहे. भारताच्या पूर्वोत्तर भागावर चीनचा डोळा असल्याचे मानले जाते. बांगलादेशचा ताजा निर्णय केवळ चीनच्या सांगण्यावरून केला गेला असल्याचे भारताला वाटत आहे. भारताने पूर्वोत्तर भागाशी आपला संपर्क वाढवू नये अशी चीनची इच्छा राहात गेली आहे. कारण यातील काही आपला असल्याचा दावा चीन अनेक वर्षांपासून करीत आहे. बांगलादेशने चीनची ही भूमिका विचारात घेऊनच हा निर्णय केला असल्याचे मानले जाते.

**सिंगापूरची कंपनी** : भारत-बांगलादेश यांच्यात अखरुआ भागातून भारताला वेगवान दूरसंचार व्यवस्था करून देण्यासाठी सिंगापूरच्या दोन कंपन्या, भारतीय कंपनी भारती टेलिकॉम व बांगलादेश दूरसंचार आयोग यांच्यात एक करार करण्यात आला होता. या कराराचा भारताला फायदा होणारच आहे; बांगलादेशाला मात्र कोणताही आर्थिक फायदा होणार नाही, असे सांगून बांगलादेशने हा करार रद्द करण्याची घोषणा केली आहे.

**दोन कंपन्या** : सिंगापूरमधील समिट कम्युनिकेशन्स व फायबर एट होम या कंपन्यांच्या माध्यमातून हे काम केले जाणार होते. विशेष म्हणजे या कंपन्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या जवळच्या मानल्या जातात. या दोन्ही कंपन्यांचे प्रमुख मोहम्मद फरीद खान हे असून ते शेख हसीना यांच्या अवामी लीगचे खासदार फारीख खान यांचे लहान बंधू आहेत. म्हणजे एकीकडे शेख हसीना यांना संदेश देणे व दुसरीकडे चीनची मागणी पूर्ण करणे ही दोन उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचे मानले जाते.



शेख हसीना यांना भारताने आश्रय देणे बांगलादेशला आवडलेले नाही. भारताने शेख हसीना यांना बांगलादेशकडे सोपवावे; जेणेकरून त्यांच्यावर विविध गुन्ह्यांखाली खटला चालविता येईल, अशी बांगलादेश सरकारची भूमिका राहिलेली आहे. भारताने ही मागणी नाकारून योग्य निर्णय घेतला आहे. भारताने शेख हसीना यांना सरकारी आश्रय देत त्यांच्या सुरक्षेची पूर्ण व्यवस्था केली आहे.

**हिंदूंवर हल्ले** : बांगलादेशातील हिंदूंवर पुन्हा जे सुनियोजित हल्ले केले जात आहेत ते भारताची चिंता वाढविणारे आहेत. भारताने याबाबत आपली भूमिका बांगलादेश सरकारकडे नोंदविली असली, तरी हा आमचा अंतर्गत मामला असल्याचे बेदरकार उत्तर बांगलादेशने दिले आहे. भारताच्या परराष्ट्र सचिवांनी नुकतीच बांगला देशला भेट देत तेथील नेत्यांशी झालेल्या चर्चेत हिंदूंवरील अत्याचाराचा, हल्ल्यांचा मुद्दा उपस्थित केला. बांगलादेशातील सत्तांतरानंतर लगेचच काही हिंदू मंदिरांवर हल्ले करण्यात आले होते. त्यावेळी बांगलादेशचे कार्यकारी प्रमुख मोहम्मद युनूस यांनी योग्य भूमिका घेत या हल्ल्यांचा निषेध केला होता. आता त्यांची 'ती' भूमिका राहिलेली नाही असे दिसते. बांगलादेशच्या बोलण्यात-वागण्यात आलेला मुजोरपणा भारताच्या नजरेतून सुटलेला नाही. चीनच्या पाठिंब्याशिवाय बांगलादेश हे करू शकत नाही, याची स्पष्ट कल्पना भारत सरकारला आली आहे. यामुळे बांगलादेशशी संबंध सुधारण्याऐवजी ते अधिक कमजोर होत असल्याचे भारताला वाटत आहे.

**साखर आयात** : एक काळ होता बांगलादेश व पाकिस्तान यांच्यातून विस्तव जात नव्हता. बांगलादेशची निर्मितीच मुळी पाकिस्तान विरोधाच्या मुद्यावर झाली होती. सध्याचा पाकिस्तान म्हणजे पश्चिम पाकिस्तानवर पंजाबींचा पगडा होता तर बांगलादेशवर म्हणजे पूर्व पाकिस्तानवर बंगाल संस्कृतीचा पगडा होता. त्यातूनच दोन्ही देशांतील वैर वाढत गेले आणि त्याचे पर्यवसान पाकिस्तानचे दोन तुकडे होण्यात झाले होते. १९७१ मधील पाकिस्तानच्या विभाजनानंतर दोन्ही देशांतील संबंध कधीच मधुर राहिले नव्हते. शेख हसीना यांचे सरकार उलथवून पाडण्यात आल्यानंतर मात्र या दोन देशांतील संबंधात अचानक गोडवा आला आहे असे दिसते. पाकिस्तानने बांगलादेशातील साखरेचा तुटवडा दूर करण्यासाठी या देशाला साखर निर्यात करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पाकिस्तानी साखर बांगलादेशात पोहोचू लागली आहे. बांगलादेश व पाकिस्तान यांच्यातील व्यापार वाढविण्याचा पद्धतशीर प्रयत्न बांगलादेशातील हंगामी सरकार करीत असल्याचे दिसून येत आहे.

**चीनचा पाठिंबा** : पाकिस्तानला चीनचा पाठिंबा आहे हे तर आता साऱ्या जगाला माहीत झाले आहे. मात्र, बांगलादेशात झालेल्या सत्तांतरात चीनच्या सहभागाचे ठोस पुरावे अद्याप समोर आलेले नाहीत. चीनच्या सक्रिय सहभागाशिवाय बांगलादेशात एवढी मोठी उलथापालथ होणे शक्य नव्हते, असे मानले जाते.

**आणखी काही करार** : बांगलादेश दूरसंचार नियामक आयोगाने भारतासोबत असणारा करार रद्द करण्याची घोषणा केली आहेच. येणाऱ्या काळात असे आणखी काही करार रद्द करण्याची घोषणा बांगलादेश सरकारकडून केली जाण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे बांगलादेशातील अनेक पायाभूत प्रकल्पांमध्ये भारतीय कंपन्या काम करीत आहेत. त्यांनाही काम करणे अवघड होईल, अशी स्थिती या देशात तयार केली जाण्याची शक्यता आहे. हे सारे ठेके नंतर चिनी कंपन्यांना दिले जातील, असे मानले जाते.

**मोठे आव्हान** : बांगलादेश आजवर भारताचा साथीदार राहिला आहे. पाकिस्तान, नेपाळ, अफगाणिस्तान, भूतान, श्रीलंका यांनी अप्रत्यक्षपणे चीनचे मांडलिकत्व पत्करले असतानाही बांगलादेशने भारताची साथ सोडली नव्हती. मात्र, शेख हसीना यांचे सरकार उलथविल्यानंतर तेथे सत्तेवर आलेल्या नव्या सरकारने भारतविरोधी निर्णय घेण्याची एक मालिका जणू सुरू केली आहे. ही मालिका खंडित करून दोन्ही देशातील संबंध पुन्हा सुरळीत करण्याचे मोठे आव्हान भारतासमोर उभे ठाकले आहे.

**एकमेव आशा** : बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्यात भारताने बजावलेली भूमिका बांगलादेशी नागरिक विसरणार नाहीत. सत्तांतराचा धुरळा खाली बसल्यानंतर आपला खरा मित्र कोण आणि शत्रू कोण हे बांगलादेश नागरिकांच्या लक्षात येईल आणि दोन्ही देशांतील संबंधात आलेला दुरावा दूर होईल, अशी आशा भारताला वाटत आहे. बांगलादेश सरकार, पाकिस्तान व चीन यांनी भारतविरोधी भूमिका घेण्याचा सपाटा लावला आहे. अशा स्थितीत बांगलादेशची जनता हाच भारतासाठी आशेचा एकमेव किरण आहे. असेच मालदीवमध्ये झाले होते. स्थानिक जनतेच्या दबावामुळे मालदीव सरकारला भारताशी जुळवून घ्यावे लागले होते. अशीच स्थिती बांगलादेश सरकारसाठी तयार व्हावी, अशी आशा करण्याव्यतिरिक्त आज तरी भारताच्या हाती काहीही नाही.

---

## वेध

# कापूस खरेदीत खाजगी व्यापाऱ्यांची मक्तेदारी!

**अनिल उमाकांत फेकरीकर**

अतिप्रमाणात गोड पदार्थांचे सेवन केले तर मधुमेहाला आमंत्रण दिल्यासारखी कृती घडते. परिणामी संबंधितांना गोड पदार्थ आहारातून दूर सारावे लागतात. हाच प्रकार मक्तेदारीतही होतो. तसे पाहता मक्तेदारी कुठल्याही क्षेत्रात असो, त्यामुळे सामान्य माणूस मेटाकुटीला येतो आणि त्यातूनच पुढे संघर्ष उभा राहतो. हाच संघर्ष आता कापूस खरेदी विक्रीच्या व्यवहारात उद्भवला आहे. रात्रंदिवस मेहनत करणारा शेतकरी जेव्हा कापूस विकायला जातो, तेव्हा त्याला उत्पादन खर्चाच्या तुलनेत नफा मिळायला हवा. पण नफा सोडा तोट्यातच त्याला कापूस विकावा लागतो. हा सर्व प्रकार पाहता कापूस खरेदीच्या व्यवहारात खाजगी व्यापाऱ्यांची वाढत असलेली मक्तेदारी मोडीत काढायची वेळ आता आलेली आहे. पण ही मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी भारत सरकारच्या सहकार्याची गरज आहे. त्याशिवाय मक्तेदारी मोडीत काढणे अशक्यप्राय आहे.

महाराष्ट्रात कापूस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळावा म्हणून ऑगस्ट १९७२ मध्ये एकाधिकार कापूस खरेदी योजना कार्यान्वित झाली होती. महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ यात प्रमुख अभिकर्ता म्हणून कार्य करीत होता. दरम्यान याच योजनेत गोंधळ झाला अन् शासनाने ती पद्धत गुंडाळली. पण तेव्हाच दुसरी पर्यायी सर्वोत्तम व्यवस्था करून ठेवणे गरजेचे होते. मात्र तसे न केल्याने तेव्हापासून खाजगी व्यापाऱ्यांचे फावले. त्यांनीही मग इस्ट इंडिया कंपनीच्या धर्तीवर संधीचे सोने करीत आपली वेगळी दुकानदारी थाटली. आज तीच दुकानदारी भारत सरकारने दिलेला हमीभाव मानायला तयार नाही. ते आपल्या मतानुसार भाव देतात अन् शेतकऱ्यांना खुलेआम लुटतात. इतर विषयांवर आंदोलन करणारे यावर मात्र बोलणे टाळतात.

दरम्यान, भारत सरकारच्या अखत्यारीतील भारतीय कपास निगम लिमिटेडचे काम काही प्रमाणात चांगले सुरू आहे. पण त्यांच्या केंद्रांची संख्या अपुरी आहे. शिवाय नेमलेले कर्मचारी आळशी आहेत. एवढेच नव्हे तर तेही खाजगी व्यापाऱ्यांच्या दावणीला बांधल्यासारखे वागतात. याचा फटका शेतकऱ्यांनाच बसतो. कर्मचाऱ्यांना नियमित पगार मिळत असल्याने शेतकऱ्याचा कापूस विकला गेला किंवा नाही याच्याशी त्यांना काही देणे घेणे नाही.

याच कारणाने प्रत्यक्षात विदर्भातील बहुतांश तालुक्यात कपाशीचे प्रचंड उत्पादन होत असताना तिथे सीसीआय केंद्रच स्थापित करण्यात आलेले नाही. उदाहरण द्यायचे झाल्यास, आजही नागपूर जिल्ह्यातील पारशिवनीसह रामटेक तालुक्यातील शेतकरी सीसीआय केंद्रापासून वंचित आहेत. याचाच गैरफायदा खाजगी व्यापारी घेतात आणि कमी भावात शेतकऱ्यांकडून कपाशीची खरेदी करून त्यांची पिळवणूक करीत आहेत. हा सर्व प्रकार पाहता पारशिवनीत आता सीसीआयचे केंद्र सुरू करावे, याकरिता शेकडो कापूस उत्पादक प्रगतिशील शेतकरी सुधाकर मेंघर यांच्या नेतृत्वात समोर आले आहेत.

भारत सरकारने २९ जुलै २०२४ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार मध्यम लांब धाग्याच्या कापसाचा हमीभाव ७१२१ रुपये घोषित केला. तर लांब धागा कपाशीसाठी ७५२१ रुपये ठरला. प्रत्यक्षात खाजगी व्यापाऱ्यांनी आतापर्यंत जो काही कापूस खरेदी केला, त्याकरिता त्यांनी प्रति क्विंटल केवळ ७१०० रुपये भाव दिला. तो भाव हमीभावापेक्षाही कमी आहे. प्रत्यक्षात शेतकऱ्याला तेवढा भाव मिळतच नसल्याने तो रडकुंडीला आला आहे. वस्तुतः स्पर्धा झाल्यास तोटा होणार नाही हाच प्रकार पूर्वी सरकारमधील मंडळी सांगायचे. त्यांनीच स्पर्धायुक्त वातावरण निर्मित केले. पण आज सत्ताधारी मंडळी सरकारी केंद्र बंद करून खाजगी व्यापाऱ्यांना फायदा होईल, असा व्यवहार करीत आहेत. वर्तमान युग स्पर्धेचे आहे. पण पारशिवनी, रामटेक भागात सीसीआयचे केंद्र नसल्याने शेतकऱ्यांना खाजगी व्यापाऱ्यांनाच नाईलाजाने कापूस विकावा लागत आहे. याचाच गैरफायदा खाजगी व्यापारी घेतात आणि कमी भाव देत शेतकऱ्यांची कोंडी करीत आहेत. शेतात पिकलेला कापूस अधिक काळ घरात साठवून ठेवणे शक्य नसते. परिणामी शेतकरी मिळेल तो भाव घेऊन नशिबाला दोष देतात. यावर रामबाण तोडगा काढण्यासाठी तातडीने कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे केंद्र शेतकऱ्यांच्या मागणीनुसार उघडणे काळाची गरज आहे. ही गरज पूर्ण न झाल्यास खाजगी व्यापारी इस्ट इंडिया कंपनीनुसार शेतकऱ्यांना गिळंकृत करतील, हे मात्र नक्की.

९८८१७१७८५९

---

## कानोसा

# काँग्रेसची काळी कृती

**अमोल पुसदकर**

नुकताच सुप्रीम कोर्टाने देशभरात प्रलंबित असलेल्या विविध मंदिरांच्या संबंधात याचिकांवर सुनावणी करण्यास खालच्या न्यायालयांना मनाई केली आहे. त्यामध्ये सुप्रीम कोर्ट म्हणते की, कुठल्याही प्रकारचे नवीन सर्वेक्षण कुठल्याही मंदिर-मशीद विवादामध्ये केले जाऊ नये. १९९१ मध्ये काँग्रेसने 'प्लेसेस ऑफ वर्शिप अ‍ॅक्ट' हा पूजा स्थळांशी संबंधित एक कायदा आणला होता; ज्यामध्ये असे म्हटले आहे की, सर्व धार्मिक स्थळांची परिस्थिती १९४७ प्रमाणे राहील; त्यामध्ये कुठलाही बदल करण्यात येऊ नये. आपल्या सर्वांना माहीत आहे की, या देशावर शेकडो वर्षे मुसलमानांचे विविध राज्यांमध्ये राज्य होते. मुसलमान हे मूर्तिभंजक होते. त्यामुळे त्यांनी ज्या ज्या ठिकाणी हल्ले केले त्या ठिकाणची देवालये उद्ध्वस्त केली. देवांच्या मूर्ती तोडल्या. अनेक ठिकाणी ते संपूर्णतः देवालयांना उद्ध्वस्त करू शकले नाही म्हणून त्यांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्यामध्ये थोडेफार बदल करून त्याचे मशिदीमध्ये रूपांतर केले. १९४७ पासून आजपर्यंत हिंदू आपल्या देवालयांना प्राप्त करण्यासाठी विविध न्यायालयांमध्ये खटले लढत आहे. या सर्व खटल्यांमध्ये विजय हिंदूंचाच होणार, हे निश्चित असल्यामुळे काँग्रेसने मुसलमानांना खूश करण्यासाठी प्लेसेस ऑफ वर्शिप अ‍ॅक्ट १९९१ मध्ये पारित केला; ज्यामुळे सर्व धार्मिक स्थळांची जी स्थिती १९४७ च्या आधी होती तीच परिस्थिती कायम ठेवण्यात यावी, असे हा कायदा म्हणतो.

विश्वाचा इतिहास बघितला तर सर्वच देशांनी त्यांच्या देशामध्ये आक्रमकांनी उभ्या केलेल्या गुलामीच्या निशाण्या किंवा आक्रमणाच्या निशाण्या पूर्णपणे उद्ध्वस्त केल्या आणि त्या ठिकाणी राष्ट्रीय गौरवाची प्रतीके उभी केली. बाबराचा सेनापती मिरबाकी याने अयोध्येच्या रामजन्मभूमीवर असलेले मंदिर तोडले होते. त्याचप्रमाणे औरंगजेबाने काशी विश्वनाथ मंदिर भ्रष्ट करण्याचा आदेश दिला होता. काशी विश्वनाथाच्या बाजूला असलेली ज्ञानवापी मशीद हा



मंदिराचा भाग आहे तर कृष्ण जन्मभूमीमध्ये उभी असलेली मशीद मंदिराचा भाग आहे. उत्तरप्रदेशातील जौनपूर येथील अटला देवीचे मंदिर तोडून तेथे १४ व्या शतकात मशीद बांधण्यात आली होती. उत्तरप्रदेशच्या बदायू येथे बांधण्यात आलेली शमशी जामा मशीद ही नीलकंठ महादेवाचे मंदिर तोडून १३ व्या शतकामध्ये ती बांधली होती. लखनौ येथे असलेली टिलेवाली मशीद टिलेश्वर महादेवाचे मंदिर तोडून औरंगजेबाने बनविली होती. मध्यप्रदेशातील धार येथे भोज शाळेमध्ये वाग्देवीचे मंदिर होते. ते मंदिर तोडून येथे कमल मौला मशीद बनविण्यात आली होती. न्यायालयाने या मशिदीचे सर्वेक्षण करण्याचा आदेश दिला होता, परंतु नंतर तो थांबविण्यात आला. अजमेर येथे असलेल्या मोईनुद्दीन चिस्ती यांच्या दरगाहच्या आधी तेथे शिवमंदिर होते अशा पद्धतीचा दावा हिंदू पक्षांच्याद्वारे केला जात आहे. कर्नाटक येथील चिकमंगलूर येथे भगवान दत्तात्रेयाचे मंदिर आहे. त्याला लागूनच बाबा बुधन यांचा दरगाह आहे. १९७० मध्ये काँग्रेस सरकारने ही जागा वक्फ बोर्डाला दिली होती. त्यानंतर तेथे भरपूर वाद झाला. न्यायालयामध्ये खटला उभा राहिला. १९८० साली न्यायालयाने निर्णय दिला की, ही जागा वक्फ बोर्डाची नाही. दत्त मंदिराचा भाग पाडूनच हा दरगाह येथे उभा झालेला आहे. कुतुबमीनार दिल्ली येथे कुव्वत उल इस्लाम नावाची मशीद आहे. या मशिदीच्या परिसरात अनेक छोट्या छोट्या देवी-देवतांच्या मूर्ती असून येथेही मंदिर पाडून मशीद केली गेली असल्याचा हिंदू पक्षाचा दावा आहे. कर्नाटक येथील मंगलोर येथे जुम्मा मशिदीच्या खाली मंदिर आहे, असा पक्षकारांचा दावा आहे. या संदर्भातील याचिका न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. कल्याण येथील दुर्गाडी किल्ल्यावर मंदिर आहे की मशीद अशा पद्धतीचा दावा प्रलंबित आहे.

या सर्वच याचिका प्रातिनिधिक स्वरूपाच्या आहेत. परंतु गावोगावी अशी हजारो मंदिरे तोडण्यात आली होती. वास्तविक स्वातंत्र्यानंतर या सर्वच मशिदींचे मंदिरांमध्ये रूपांतर करण्यात यायला हवे होते. मुस्लिमधर्मीय लोकांसाठी वेगळा देश पाकिस्तानची निर्मिती करण्यात आली होती. त्यामुळे किमान भारतामध्ये तोडण्यात आलेल्या मशिदींचे तरी मंदिरांमध्ये रूपांतर करावयास पाहिजे होते. परंतु काँग्रेसला कधी हिंदू-मुस्लिम प्रश्न सुटावा, असे वाटले नाही. त्यामुळे त्यांनी अशा पद्धतीच्या सर्वच गोष्टी सडवत ठेवल्या. सर्वसामान्य भाविकांनी आपापल्या शक्तीनुसार न्यायालयामध्ये याचिका दाखल केल्या. त्या याचिकांवर कारवाई होऊ नये म्हणून १९९१ मध्ये प्लेसेस ऑफ वर्शिप अ‍ॅक्ट हा कायदा काँग्रेसने आणून हिंदूंसोबत विश्वासघात केला. यावरून आपल्या असे लक्षात येते की, हिंदूंच्या धार्मिक भावनांबद्दल पूजा करण्याच्या त्यांच्या अधिकाराबद्दल काँग्रेसला काहीही देणे-घेणे नाही. या उलट मुस्लिम तुष्टीकरण करणे व त्याच्या आधारावर एकगठ्ठा मतदान मिळत आपली सत्ता कायम ठेवण्याचेच उद्योग इतकी वर्षे काँग्रेसने केलेले आहे. परंतु आता हा कायदा रद्द झाला पाहिजे, अशी हिंदू समाजाची इच्छा आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे पूजेपासून वंचित असलेल्या ठिकाणी हिंदू समाज पूजा-आरती करू शकेल. देशाच्या संस्कृतीमध्ये या पुरातन मंदिरांचा मोठा सहभाग आहे. आम्ही संस्कृतीचे पूजक आहोत त्यामुळे या मंदिरांवरील हक्क सोडण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

---

## वाचक पत्रे

### पूजेसाठी फुले

मनपाच्या एका बागेत एक सुंदर वाक्य वाचण्यात आले ते असे - 'झाडांना लागलेली फुले झाडांवर सुंदर व मोहक दिसतात, त्यामुळे कृपया कोणीही ही फुले तोडू नयेत.' देवपूजेसाठी जसे हळद, कुंकू, अक्षता, गुलाल, बुक्का, उदबत्ती, आरतीसाठी वाती, कापूर इत्यादी गोष्टी आवश्यक आहेत. तसेच देवाला वाहण्यासाठी फुलेही आहेत. यामध्ये आपल्याला कोणती फुले पाहिजेत? तर तगर, शेवंती, झेंडू, मोगरा, जास्वंद, गुलाब इत्यादी फुले आपण पूजेमध्ये देवाला रोज वाहतो. देवाला आपण जी फुले वाहतो ती तीन ठिकाणांहून आपल्याला मिळतात. एक- घरच्या बगिच्यातील, दुसरे म्हणजे फूल विक्रेत्याकडील व तिसरे म्हणजे रस्त्याच्या बाजूच्या घराच्या कुंपणाला लागून असलेली झाडांची फुलं. खरं तर तिसऱ्या प्रकारातील फुलं देवाला वाहल्याने आपल्याला किती पुण्य मिळतं, याचा विचार व्हायला पाहिजे. सबब देवपूजेसाठी लागणारी फुले, एकतर आपल्या परसबागेतील अथवा फूल विक्रेत्यांकडून विकत घेतलेली असावीत, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

### विरोधी पक्षांचा किती हा बालिशपणा

एक दिवस आधी 'संसद चलने देंगे'' असे विरोधकांनी सांगितले. परंतु प्रत्यक्षात रोज संसदेत व राज्यसभेत गदारोळच सुरू आहे. पहिले लोकसभेचा विचार करूया. अदानी, अदानी करत राहुल गांधींचा पक्ष एक-एक निवडणूक हरत आहे. तरीपण हा मुद्दा कोण्या शहाण्याने त्यांच्या डोक्यात भरवला देव जाणे. काँग्रेस पक्षाची धूळधाण होत असताना, इंडिया आघाडीचे नेतृत्व संपुष्टात येत असताना, काँग्रेससोबत हळूहळू सगळे साथ सोडताना आपल्या पक्षाचा विचार न करता केवळ अदानी अदानी हाच ओरडा राहुलबाबा करीत आहे. कदाचित भविष्यात चुकून सारे एकवटून जर हेच लोक सत्तेत आले तर त्याच अदानीसोबत विविध करार करतील, कारण त्याला पर्याय नाही. एवढे मोठे इन्फ्रास्ट्रक्चर आज अदानी, अंबानीशिवाय कोणीच देऊ शकत नाही. काँग्रेसच्या राज्यातही हे अदानी-अंबानी आहेत. परंतु केवळ संसद चालू न देणे हाच एकमेव उद्देश घेऊन काँग्रेस पक्ष उतरतो. काही लोकांच्या चुकीच्या मतदानाने या पक्षाला थोडी बळकटी प्राप्त झाली त्याचा हा परिणाम दिसतो. बालिशपणे अदानी-मोदीचे मखवटे घालणे. त्यांच्या पिशव्या बाळगणे, उगाचच फुले वाटणे असला बालिशपणा संसदेच्या पायरीवर सध्या सुरू आहे. एक बालिश, अपरिपक्व विरोधी पक्षनेता प्राप्त झाला हे दुर्दैव. तिकडे राज्यसभेचा तालच वेगळा. तेथे केवळ अध्यक्ष, उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांचाच विरोध सुरू आहे. त्यासाठी कोमट पाणी पिऊन खडगे साहेब रोज येत आहे. 'आम्हाला बोलू देत नाही' असे म्हणत सतत तेच बोलत आहे. एकही सकारात्मक चर्चा संसदेच्या दोन्ही सभागृहांत झाली नाही. विरोधी पक्षांचा केवळ विरोधच करायचा आहे हे यावरून दिसून येते. त्यांचा सगळा खेळ हा पुढे येणाऱ्या लोकसभेकडे दिसतो. देशाची संसद न चालणे हा जनतेच्या पैशाचा अपव्यय आहे व जनता तो ओळखून आहे. तेव्हा विरोधी पक्षांनी आत व बाहेर ओरडून 'एन्जॉय' करावा कारण एवढेच त्यांच्या नशिबी आहे.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### स्वतःसह देशहिताचा निर्णय घेतला पाहिजे

कडाक्याच्या थंडीत स्वतःच्या घराला आग लावून शेकत बसणे म्हणजे त्यावर उपाय नव्हे. आजघडीला राज्याच्या व देशाच्या या विशाल अशा या वटवृक्षाला वाईट गोष्टी, व्यसनासारख्या या महाभयंकर किडीने पोखरत पोकळ व कमकुवत करत आहे.

अशा या वाईट गोष्टी आणि व्यसनरूपी भस्मासुर राक्षसाला आवर घालण्यासाठी आणि त्याला पायबंद करण्यासाठीची आता वेळ आली आहे. कळतंय पण वळत नाही. अशी भूमिका घेतली तर आपणच आपले कुटुंब खाईत लोटतो असे होईल. आधीच आपण खूप काही गमावलेले आहे. आत्ता बस्स झाले. आता सरकारनेही गल्लीपासून ते दिल्लीपर्यंतच्या सर्व जनतेच्या हिताचे असलेले सर्वच निर्णय घेतले पाहिजे.

मोफत आणि फुकटच्या लाडक्या ज्या योजना आहेत त्या बंद करून प्रत्येकाच्या हाताला कामधंदा दिला पाहिजे आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. या नवीन वर्षात नवीन योजना आणि धोरण सुरू केले पाहिजे. सरकारच्या सर्वच यंत्रणा सतर्क करून राज्याला व देशाला पुढे नेण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. सरकारचे टीव्ही, चित्रपटावरचे, सोशल मीडिया यावरचे नियंत्रण सुटलेले आहे, ते आटोक्यात आणले पाहिजे. आज नको ते डोळ्यासमोर येत आहे. लहान लहान मुले आणि मुली यामुळे फार बिघडत चालली आहेत. जुन्या काळी सारे कुटुंब एकत्र टीव्ही, सिनेमा पाहात होते. पण आता ते पाहणे अवघड झाले आहे. कमी कपडे, नको ते हावभाव अशा अश्लील दृश्यामुळे त्यांच्या मनावर वाईट परिणाम होत आहेत. यासोबतच व्यसनामुळे तरुण पिढी उद्ध्वस्त होत आहे. अनेकजण आत्महत्या करीत आहेत. रस्ते अपघातही मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. अशा घटना घडणार नाहीत यावर उपाय योजिले पाहिजेत. यासोबतच फसवणूक, भ्रष्टाचार, लाचखोरी संपुष्टात आणली पाहिजे. स्वतःच्या व देशहितासाठी प्रत्येकाने आपापल्या परीने प्रयत्न केले पाहिजेत.

**रा. हा. जेठेवाड**/नांदेड

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)






सोलापूर तरुण भारत

www.tarunbharat.org


### कृषी पुरवणी विषयी जाहीर आवाहन

दैनिक तरुण भारतच्या तमाम वाचकांना दर शनिवारी आम्ही कृषी विशेष पुरवणी देत आहोत. आपल्या भागातील कोणत्याही शेतकऱ्यांनी वैशिष्ट्येपूर्ण आणि अत्याधुनिक पध्दतीने शेती केली असल्यास त्यांची 'यशस्वी गाथा' आणि आपले लेख, कविताही या पुरवणीद्वारे विनामुल्य प्रकाशित करु.

दैनिक तरूण भारत / पुरवणी संयोजक
मो. नं. ९४२१८७६३४०



**विशेष मुलाखत/ अविनाश गायकवाड**

**शेतकरी बांधवांच्या आर्थिक उन्नतीसाठी १९३३ साली सोलापुरात कोरडवाहू संशोधन केंद्राची निर्मिती इंग्रज सरकारनेच केली होती. त्यांनी निर्माण केलेल्या केंद्रात भरीव अशी सुधारणा करून काही शेती संशोधक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आणि आजतागायत अनेक वाणांचे संशोधन या केंद्रातून झाले असून, शेतकरीभिमुख संशोधन करणे हेच आमचे ध्येय असल्याची स्पष्टोक्ती सोलापूर येथील विभागीय कृषी संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ तथा सहयोगी संशोधन संचालक डॉ. नितीनकुमार रणशूर यांनी खास दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना आज (दि. १४) दिली.**

# 'शेतकरीभिमुख संशोधन' हेच आमचे ध्येय!



### नाविण्यपूर्ण अन् अती उत्पादित बियाणांची निर्मिती

राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र पश्चिम महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या दहा जिल्ह्यांत विस्तारलेले आहे. कृषी विद्यापीठाचे प्रमुख उद्दिष्ट कृषीशिक्षण, कृषीसंशोधन आणि कृषीविस्तार कार्य आहे. कृषी साक्षरतेसाठी विद्यापीठामार्फत कृषी पदविका, कृषी पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवीचे शिक्षण दिले जाते.शेतीशी निगडित संशोधन करण्यासाठी विद्यापीठाची २८ संशोधन केंद्रे आहेत. विद्यापीठाने अन्नधान्य, फळे-फुले, चारा-पिके यांचे २०० पेक्षा जास्त वाण विकसित केले असून, मृद् व जलसंधारण, पीक लागवड पद्धती यांविषयी सखोल संशोधन करून १००० पेक्षा अधिक महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत. राज्यातील या नवनव्या संशोधनाच्या शिफारसी आमच्या कार्यालयामार्फत हैद्राबाद येथील सेंट्रल रिसर्च इस्टिट्युट ऑफ ड्राय लॅन्ड ॲग्रीकल्चर या वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविले जातात. त्यांच्याकडून हे अहवाल दिल्ली येथील मुख्य कार्यालयाकडे जातात आणि त्यानंतर केंद्रीय आणि राज्यस्तरीय कृषी विभाग या वाणांना म्हणजेच नवनिर्माणाचा प्रचार, प्रसार करतात.

सोलापुरातील या कोरडवाहू संशोधन केंद्राविषयी विस्तारीत माहिती देताना डॉ. रणशूर म्हणाले की, आपल्या सोलापुरातील या कोरडवाहू संशोधन केंद्राकडे ५६ हेक्टर क्षेत्र आहे. तर याच केंद्राच्या अधिपत्याखाली जेऊर, मोहोळ, पंढरपूर येथेही कोरडवाहू संशोधन केंद्रांची निर्मिती केली आहे. या सर्व केंद्राद्वारे विविध वाणांचे संशोधन केले जाते. इतकेच नाहीतर अवघ्या राज्यातील कोणत्याही जिल्ह्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठाद्वारे संशोधित केलेल्या वाणांची प्रस्तावित माहिती आपल्या केंद्राद्वारेच शासनाकडे पाठविली जाते. यामुळे संपूर्ण राज्याचे कोरडवाहू समन्वयक म्हणून आपल्या सोलापूर येथील केंद्राकडे पाहिले जाते.

सोलापुरातील या कोरडवाहू संशोधन केंद्राद्वारे राष्ट्रीय पातळीवरील ३ योजना राबविल्या जातात. यामध्ये अखिल भारतीय समन्वयित कोरडवाहू कृषी संशोधन प्रकल्प, अखिल भारतीय समन्वयित कोरडवाहू कृषी हवामान शास्त्र प्रकल्प आणि अखिल भारतीय समन्वयित कोरडवाहू करडई संशोधन प्रकल्प राबविले जातात. यातील कृषी संशोधन प्रकल्पाद्वारे मृदविज्ञान, कृषीविद्या आणि कृषी अभियांत्रिकीचे नियोजन करण्यात आले आहे. तर कृषी हवामान शास्त्राद्वारे राज्यातील रोजच्या हवामानाचा बळीराजाच्या उत्पादित होणाऱ्या पिकांवरील परिणाम आणि त्यांनी करावयाच्या उपाययोजना याबाबत नोंदी घेवून याचे अहवाल शासनाच्या कृषी विभागाकडे पाठविले जातात; म्हणजेच कृषी सल्ला दिला जातो. तर करडईचे सखोल संशोधन करून त्याचे विकसित वाण, शेतकऱ्यांना करडईचे दर्जेदार उत्पन्न कसे घेता येईल, फळबागा, पीक संरक्षणाबाबतचा प्रस्ताव तयार करुन शासनाकडे पाठविण्यात येतो. शासन संबंधित कृषी विभागामार्फत पुढील नियोजन करते आणि नवनवे वाण विकसित होतात.

### विद्यापीठांचे पिकांचे विविध वाण देशातील शेतकऱ्यांमध्ये प्रचलित

राहूल कृषी विद्यापीठाने विकसित केलेले विविध पिकांचे वाण संपूर्ण देशातील शेतकऱ्यांमध्ये प्रचलित आहेत. फुले २६५ या उसाच्या वाणाने उत्पादनाचे नवे उच्चांक गाठले असून क्षारयुक्त जमिनीत ते शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न देत आहे. गव्हाचे त्रिबक, नेत्रावती हे वाण, ज्वारीचे रेवती, चित्रा, सुचित्रा हे वाण, कोरडवाहू फळबागांसाठी वरदान ठरलेला आंब्याचा केशर वाण यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे. हरभऱ्याच्या विजय, विशाल, दिग्विजय, विराट या वाणांनी देशातील शेतकऱ्यांची मने जिंकली आहेत. फुले त्रिवेणी या संकरित गायीत दुसरी धवलक्रांती आणण्याची ताकद आहे. बदलते हवामान, जैविक-अजैविक ताण, पाणीटंचाई या दरवर्षी निर्माण होणाऱ्या समस्यांवर संशोधन करून विद्यापीठ त्यांचे निष्कर्ष वेळोवेळी शेतकऱ्यांसाठी प्रसिद्ध करते. विस्तार शिक्षण संचालनालयामार्फत दरवर्षी विद्यापीठ आपल्या कार्यक्षेत्रात शेतकरी, कृषी अधिकारी आदींसाठी विविध प्रशिक्षण वर्ग, शेतकरी मेळावे, प्रात्यक्षिके यांचे आयोजन करते. याव्यतिरिक्त आकाशवाणी, दूरचित्रवाणी, वर्तमानपत्रे, मासिके आदींमधून हंगामनिहाय, क्षेत्रनिहाय, शेतीविषयक तंत्रज्ञान व विविध कार्यक्रम प्रसारित करते. या फायदा कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांना आणि विशेषत: शेतकरी बांधवांना होतो.

# रब्बी पेरणी लांबल्याने गहू, हरभरा, मका पेरा वाढला

- **ज्वारीचा टक्का यंदा कमी मात्र निघणार भरघोस उत्पन्न**
- **जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांचा निर्वाळा**
- **जिल्ह्यात १०० टक्केच्याही वर होणार रब्बीचा पेरा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

'ज्वारीचे कोठार' म्हणून ओळख असलेल्या मंगळवेढ्यासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात यंदा लांबलेल्या पावसामुळे ज्वारीची पेरणी ७३ टक्के एवढीच झाली असली तरीही यंदा मुबलक पाऊस झाल्याने ज्वारीचे उत्पन्न भरघोस निघणार असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली. तर जिल्ह्यात यंदा गहू, हरभरा, ऊस आणि फळबागांचे प्रमाण वाढले असून, यंदा अजूनही काही तालुक्यात पेरण्या सुरुच असल्याने सरासरीच्या १०० टक्के क्षेत्रावर पेरण्या होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरवर्षी मंगळवेढा तालुक्यात ज्वारीची पेरणी मोठ्या प्रमाणात असते. यंदा परतीच्या पावसाचा मुक्काम वाढल्याने ही पेरणी कमी झाली आहे. मात्र त्या बदल्यात शेतकऱ्यांनी गहू, हरभरा पेरणी अधिकची केली आहे. कारण ज्वारीची पेरणी नोव्हेंबर अखेरपर्यंतच करतात मात्र गहू, हरभरा डिसेंबर एन्डपर्यंत पेरतात. तर चोहीकडे पाणीच पाणी असल्याने यंदा ऊस आणि फळबागांचे क्षेत्रही वाढले आहे. ऊस वाढल्याने आगामी वर्षात साखर कारखाने मोठ्या क्षमतेने आणि दीर्घकाळ चालणार आहेत.

तसं तर मंगळवेढ्याच्या मालदांडी ज्वारीची खमंग, खरपूस अशी भाकरी घास मोडल्याबरोबर तोंडात विरघळते. देशभर मागणी असलेल्या या ज्वारीला यापूर्वीच जीआय मानांकन मिळाले आहे. मुबलक प्रमाणात उत्पादन होणारी येथील ज्वारी केवळ भाकरी आणि खुसखुशीत हुरड्यापुरती नाही, तर त्यापासून अन्य उपपदार्थांसाठी नावारूपाला आली आहे. याच धर्तीवर भूम तालुक्यातील माणकेश्वर पट्ट्यातील ज्वारीची मागणीही सध्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मंगळवेढ्याप्रमाणेच माणकेश्वर पट्ट्यातील ज्वारी देशासह विदेशातही निर्यात होते.

या दोन्ही भागात जमिनीचा पट्टा सपाट, कसदार, पूर्णतः खोलवर काळ्याभोर मातीचा आहे. थोड्याशा पावसाने येथे ज्वारीचे उत्पादन भरघोस मिळते. रब्बी हंगामात आपल्या जिल्ह्यातील केवळ मंगळवेढा तालुक्यात ज्वारीचे सरासरी पेरणी क्षेत्र ३० हजार हेक्टरपर्यंत आहे. परंतु यंदा परतीचा पाऊस मोठ्या प्रमाणात पडला आणि यामुळे जमिनीचा वापसाच झाला नाही. त्यामुळे उशिरापर्यंत शेतात वापसा तयार न झाल्यामुळे ज्वारीची पेरणी अनेक दिवस खोळंबून राहिली. ऑक्टोबरपर्यंत केवळ ३० टक्क्यांपर्यंत पेरणी झाली. त्यानंतर उशिराने का होईना शेतकऱ्यांनी ज्वारीची पेरणी केली. यामुळे पेरणीचा टक्का वाढला.



आपल्या जिल्ह्यात खरीप हंगाम संपताच साधारणतः सप्टेंबर ते नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत रब्बी ज्वारीची पेरणी होते. तर जानेवारीमध्ये शेतात हुरडा तयार होतो. हुरड्याचा हंगाम संपताच परिपक्व झालेल्या ज्वारीची काढणी होते. तथापि, यंदा लांबलेल्या पावसाबरोबरच वाढलेली शेतमजुरी, बी-बियाणे-पेरणीचा वाढलेला खर्च, आंतर मशागतीचा खर्च आणि मालाला हमीभाव नसल्यामुळे या भागातील शेतकरीवर्गात शेती कशी करावी, असा यक्षप्रश्न आहे.

सोलापूर जिल्ह्यात खरीप हंगामात ज्वारीचे सरासरी क्षेत्र तीन लाख १८ हजार ५७ हेक्टर एवढे असून, त्यांपैकी २ लाख ३७ हजार १४१ हेक्टर क्षेत्रात (७३.५३ टक्के) ज्वारीचा ७५ टक्के पेरा झाला आहे. तर गव्हाचे क्षेत्र सरासरी ४२ हजार ५८८ इतके असते तर यंदा ४३ हजार ४८५ हेक्टर म्हणजे १०२ टक्के पेरणी झाली आहे. जिल्ह्यात मका क्षेत्र सरासरी ३६ हजार ४९३ हेक्टर असते तर मका पेरणी ५६ हजार०२१ हेक्टर क्षेत्रावर १५४ टक्के पेरणी झाली आहे. तर रब्बी तृणधान्य सरासरीच्या १८ टक्के पेरा झाला आहे. हरभरा पिकाचे क्षेत्र ५९४१२ हेक्टर असते तर यंदा ६१ हजार ९३५ हेक्टरवर १०४ टक्के पेरणी झाली आहे. करडई पिकाचे जिल्ह्यात १२१५ हेक्टरवर पेरणी झाली असून, ही पेरणी सरासरीच्या ६० टक्केच आहे. जवस ४३ हेक्टरवर पेरणी झाली आहे. तीळ १२ हेक्टर, सुर्यफुल १६ हेक्टरवर पेरणी झाली आहे.

### आजतागायत सरासरीच्या ८७ टक्के रब्बी पेरणी

जिल्ह्यात रब्बी हंगामासाठी ४ लाख ६० हजार ९१८ हेक्टर इतके सरासरी क्षेत्र असून, या पैकी ४ लाख ४३२ हेक्टर क्षेत्रावर सरासरीच्या ८७ टक्के पेरणी झाली आहे. तालुकानिहाय ही पेरणी पाहिली तर उत्तर सोलापूर ९३.७१ टक्के, द. सोलापूर ८५.१३, बार्शी ११२.२९, अक्कलकोट ९०.३७, मोहोळ ६७.६, माढा ७६.९८, करमाळा ५९.७२, पंढरपूर ९६.७३, सांगोला ९२ टक्के, माळशिरस ९२.१४ आणि मंगळवेढा ९९.२५ टक्के इतकी पेरणी झाली आहे.



# कृषी संशोधन केंद्रात जागतिक मृदा दिन साजरा


**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत विभागीय कृषी संशोधन केंद्र,सोलापूर येथे जागतिक मृदा दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त चालू वर्षाच्या मृदा दिन संकल्पनेच्या अनुषंगाने मातीची काळजी: मोजमाप, निरीक्षण,व्यवस्थापन या विषयावर जनजागृती करण्यासाठी सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी संशोधन केंद्रातील कर्मचारी व वरिष्ठ शास्त्रज्ञ, कृषी तंत्र विद्यालय सोलापूर येथील विद्यार्थी व शिक्षक वृंद तसेच दयानंद कॉलेज सोलापूर येथील प्राणीशास्त्र विषयाचे विद्यार्थी व शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. नितीनकुमार रणशूर, प्रमुख शास्त्रज्ञ व सहयोगी संशोधन संचालक, सोलापूर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जागतिक मृदा दिन साजरा करण्याची पार्श्वभूमी, अन्नसुरक्षेमध्ये मृदेचे महत्त्व, जमिनीचा सर्वांगीण विकास होण्याकरिता आणि जमिनीची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी एकात्मिक अन्नद्रव्यव्यवस्थापन करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.

दरम्यान, जमिनी खराब होण्याची जी दोन महत्त्वाचे कारणे आहेत त्यामध्ये पाण्याचा अतिवापर व असंतुलित खतांचा वापर याविषयी माहिती दिली. तसेच डॉ. रणशूर यांनी संतुलित खत वापरासाठी माती परीक्षण करूनच पिकास खते द्यावीत, जेणे करून जमिन खराब होणार नाही असे प्रतिपादन केले. डॉ. प्रशांत पवार यांनी शेतीसाठी हरितक्रांतीमध्ये जमिनीचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. सुहास उपाध्ये यांनी जल व मृदेचे संवर्धन, जमिनीची धूप कशी थांबवावी, जमिनीच्या धूप होण्याच्या विविध प्रकारांची सविस्तर माहिती देऊन जमिनीची धूप पावसाच्या एका थेंबापासून चालू होऊन नाल्या काठच्या धूतीपर्यंत कशी पोहोचते याविषयी सविस्तर माहिती दिली. वाहणाऱ्या माती व पाण्याबरोबर अनेक अन्नद्रव्ये वाहून गेल्यामुळे जमिनीचा सुपीकता नष्ट होते म्हणून आपण जमिनीची होणारी धूप थांबविली पाहिजे व पडणारे पावसाचे पाणी जमिनीत साठविले पाहिजे, असे सांगितले. डॉ. शशीशेखर खडतरे यांनी नैसर्गिक साधनांचा वापर करून मृदेचे जतन कसे करावे याबद्दल आपले विचार मांडले. तसेच डॉ. सुभाष घाडगे यांनी जमिनीची सुपीकता टिकविणेसाठी काय उपाय योजना कराव्यात याविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी सेवानिवृत्त प्राध्यापक व सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ, डॉ. देवेंद्रप्पा इंडी यांनी माती व सूक्ष्मजीव यांचा संबंध या विषयावर उपस्थिताना माहिती देताना जमिनीच्या सुपीकतेमध्ये जैविक घटकांचे महत्त्व स्पष्ट केले. सूत्रसंचालन डॉ. अर्चना पवार, मृदा पदार्थ विज्ञानवेत्ता यांनी केले तर भानुदास राठोड यांनी आभार मानले.

# अवकाळी जोरात बरसला तरच द्राक्षबागांना फटका



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

मागील आठवड्यात दोन-चार दिवस पावसाळी वातावरण तयार झाल्याने जिल्ह्यातील द्राक्ष बागायतदार शेतकरी चिंताग्रस्त झाल्याचे दिसून येत होते. दरम्यान, अशा येणाऱ्या आभाळामुळे अवकाळी पाऊस झाला तर हा पाऊस ज्वारी, गहू, मका पिकासाठी पोषकच असून, द्राक्ष बागांसाठी व इतर फळबागांसाठी मारक असल्याचे सांगण्यात येत आहे. कारण ऐन बागांच्या बहरात अवकाळीचा मोठा पाऊस पडला तर द्राक्ष बागांची मोठी हानी होण्याची भीती जाणकार शेतकरी वर्तवित होते. मात्र, शहर-जिल्ह्यात अवकाळी पावसाच्या हलक्या सरी पडून पुन्हा गुलाबी थंडी सुरू झाली असल्याने बागायतदार शेतकऱ्यांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

मध्यंतरी तयार झालेले ढगाळी वातावरण द्राक्ष, हरभऱ्याला घातक तर ज्वारी, गहू, मका या पिकांसाठी पोषक असल्याचे सांगण्यात येते. यावेळी मोठा पाऊस पडण्याचा इशाराही हवामान विभागाकडून देण्यात आला होता. त्यावेळी तापमानाचा पारा १४.६ सेल्सियसच्या घरात आला होता. आभाळ रोजच येवू लागल्याने अक्षरश: थंडी गायब झाल्याचे चित्र दिसून येत होते.

या ढगाळी वातावरणामुळे थंडी गायब झाली असून, पुन्हा पंखा लावून झोपायची वेळ शहर, जिल्हा वासीयांवर आली होती. शेतकऱ्यांनी द्राक्ष बागेची ऑक्टोबर छाटणी केली होती. बागेमध्ये घड तयार व्हायला सुरुवात झाली होती. या ढगाळ वातावरणामुळे तयार होत असलेल्या बारीक मन्यामध्ये कूज अर्थात मर हा रोग निर्माण होतो. हरभऱ्यावर घाटा अळीचा प्रादुर्भाव वाढतो, असे शेतकऱ्यांतून सांगण्यात आले आहे.

दरम्यान, अशा पावसामुळे ज्वारी, हरभरा, गहू आदी पिकांना फायदाही होणार असल्याचे सांगण्यात येते.


# राज्यांतर्गत पीक स्पर्धेमुळे उत्पन्नात होते भरीव वाढ

- **३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याची मुदत**
- **शेतकऱ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी स्तुत्य उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ डिसेंबर-**

राज्यात पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग होऊन उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढून आणखी उमदीने नवनवीन, अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. हा उद्देश ठेवून राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. रब्बी हंगाम सन २०२४ पीक स्पर्धेसाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन कृषी आयुक्तालयाचे कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) रफिक नाईकवाडी यांनी केले आहे.

कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम सन २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या ५ पिकांसाठी पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पीकस्पर्धेसाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या पिकांसाठी



अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर २०२४ आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र सर्वसाधारण गटासाठी रक्कम रु.३०० व आदिवासी गटासाठी रक्कम रु. १५० राहील. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावावर जमीन असणे व ती जमीन तो स्वत: कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल. तसेच पीक स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरता स्पर्धकास शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

### ५० हजाराचे पहिले बक्षीस

**सर्वसाधारण व आदिवासी गटातील शेतकऱ्यांसाठी पीक निहाय राज्य पातळी प्रथम क्रमांक ५०००० रुपये, द्वितीय क्रमांक ४०००० रुपये, तृतीय क्रमांक ३००००, जिल्हा पातळीवर प्रथम क्रमांक १०००० रुपये, द्वितीय क्रमांक ७००० रुपये, तृतीय क्रमांक ५०००, व तालुका पातळीवरील प्रथम क्रमांक ५००० रुपये, द्वितीय क्रमांक ३००० रुपये, तृतीय क्रमांक २००० रुपये असे बक्षिसाचे स्वरुप राहणार आहे.**

# बाळेच्या खंडोबा मंदिराला ९०० वर्षांचा इतिहास



## खंडोबा यात्रेच्या दुसऱ्या रविवारी श्रीक्षेत्र बाळे येथील श्री खंडोबा मंदिरात श्रींचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी




**तभा वृत्तसेवा - यशवंत गुरव**

**सोलापूर, दि. १४ डिसेंबर**

**श्रीक्षेत्र बाळे येथील ग्रामदैवत असलेल्या श्री खंडोबा देवाची यात्रा मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात सुरू झाली. शनिवार (दि.७) डिसेंबर रोजी चंपाषष्ठी आधारित विधी मंदिरात मोठ्या चैतन्य वातावरणात संपन्न झाला. यावेळी सोलापूर शहर जिल्ह्यातील अबालवृद्ध भक्तांनी मंदिरात श्रीखंडोबा देवाला भरीत रोडगा आणि पुरणपोळीचा अर्पण करून येळकोट..... येळकोट........जय मल्हारचा...... जयघोष केला.**

तीर्थक्षेत्र बाळे येथील श्री खंडोबा देवस्थान येथे मार्गशीर्ष महिन्यात श्रींच्या यात्रेचा अभूतपूर्व सोहळा संपन्न होत आहे. धार्मिक महिना म्हणून मार्गशीष महिन्याकडे पाहिले जाते. या महिन्यात श्री मार्तंड भैरव अर्थात खंडोबा आणि श्री महालक्ष्मीचे प्रतिरूप वैभव लक्ष्मीचे व्रत संपन्न केले जाते. त्या अनुषंगाने या मार्गशीष मासास अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. मार्गशीर्ष महिन्यातील पहिला रविवार असल्याने, आज श्रीक्षेत्र बाळे येथील श्री खंडोबा मंदिरात भाविकांची श्रींचे दर्शन घेण्यासाठी अलोट गर्दी दिसून आली. पहाटे विविध धार्मिक कार्यक्रम आणि महापूजा संपन्न झाल्यानंतर सकाळी मंदिर आणि श्रींचा गर्भ गाभारा भाविकांना दर्शनासाठी खुला करण्यात आला. यावेळी आबालवृद्ध भाविकांनी आपल्या हातामध्ये भंडारा उधळून येळकोट...... येळकोट ......जय मल्हार सदानंदाचा येळकोट....असा एकच जयघोष केला.

दरम्यान, श्री क्षेत्र बाळे श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टच्या वतीने सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षीही यात्रेचे योग्य नियोजन करण्यात आले आहे. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता दर्शन रांगा तयार करण्यात आले आहेत. त्यामध्ये मुखदर्शन आणि धर्मदर्शन अशा दोन रांगा करण्यात येऊन भाविकांना दर्शनासाठी मंदिर खुले केले आहे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेराची करडी नजर तैनात आहे. त्याच पद्धतीने पोलीस बंदोबस्त देखील लावण्यात आला आहे. भाविकांना कोणत्याही प्रकारची अडचण होऊ नये यासाठी मंदिर समिती आणि प्रशासन एकत्रितरीत्या कामकाज करत आहे.

संपूर्ण महिनाभर यात्रा सुरू राहणार असल्याने, यात्रेच्या दिवशी म्हणजेच दर रविवारी भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता. सुरक्षितता आणि दर्शन रांगा यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्याच पद्धतीने मंदिर परिसरात विविध प्रकारचे त्रास अधिक साहित्य आणि खेळण्याचे स्टॉल्स थाटण्यात आले असून, विविध साहित्य घेण्यासाठी भाविकांची स्टॉल्सवर गर्दी दिसून येत आहे. भाविक भक्तांनी सोबत आणलेला नैवेद्य अर्पण करण्यासाठी देखील



मंदिर परिसरात गर्दी होती. भरीत-रोडगा,पुरणपोळी, आणि बाजरीचे पीठ असे नैवेद्य श्रींना अर्पण करून पोटंबा भरण्यात आला. भंडारा उधळत येळकोट जयघोष करण्यात आला. सोलापूर शहर जिल्ह्यासह मराठवाडा कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील भाविक भक्त मंदिर परिसरात श्रींचे दर्शन घेण्यासाठी सकाळपासूनच रांगेत उभे असतात.

श्री खंडोबा हे महाराष्ट्राचे कुलदैवत आहे. मुख्यत्वेकरून महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांत खंडोबाची उपासना जास्त केली जाते. खंडोबाचे नवरात्र हे मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा ते मार्गशीर्ष शुद्ध षष्टी असे सहा दिवस साजरे केले जाते. हा खरा षड्रोत्सव असतो. मार्गशीर्ष शुद्ध षष्टी म्हणजेच चंपाषष्टी यादिवशी खंडोबा ऋषींच्या विनंतीला मान देऊन मणी-मल्लाचा वध करून लिंगद्वय रूपाने प्रगट झाले. नवरात्राचे पांच दिवस उपवास करून सहाव्या दिवशी तो सोडतात. सहा दिवस देवापुढे नंदादीप ठेवतात. देवाला बेल, दवणा व झेंडूची फुले फार प्रिय आहेत म्हणून ती आठवणीने वाहतात. खंडोबाच्या उपासनेंत भंडारा फार महत्वाचा आहे. भंडारा म्हणजे हळदीची पूड. खंडोबाच्या कुलधर्मासाठी व चंपाषष्टी या दिवशी ठोम्बरा (जोंधळे शिजवून त्यांत दही व मीठ घालतात.), कणकेचा रोडगा, वांग्याचे भरीत, पातीचा कांदा व लसूण हे पदार्थ नैवेद्यांत असतात. देवाला नैवेद्य समर्पण करण्यापूर्वी तळी भरण्याचा विधि असतो. तळी भरणे म्हणजे एका ताम्हनात विड्याचे पान, पैसा, सुपारी, भंडारा व खोबरे हे पदार्थ ठेवून ते ताम्हन ''सदानंदाचा येळकोट'' किंवा ''एळकोट एळकोट जय मल्हार'' असे मोठ्याने तीन वेळा म्हणून तीन वेळा उचलतात. नंतर दिवटी व बुधली घेऊन आरती करतात. देवाकडे तोंड करून भंडारा व खोबरे उधळतात व प्रसाद वाटतात.

खंडोबा हि देवता भक्तांची मनोकामना पूर्ण करणारी व नवसास पावणारी आहे. त्यामुळे नवस बोलणे व तो फेडणे याला फार महत्व आहे. दरम्यान, मार्गशीर्ष महिन्यातील षष्ठी ही चंपाषष्ठी अथवा मार्तंडभैरव षष्ठी म्हणून सर्वत्र साजरी होते. मार्गशीर्ष महिन्याला सोमवार (दि. २)पासून प्रारंभ झाला. याच दिवसापासून मार्तंडभैरव षड्यात्रोत्सवासही प्रारंभ झाला. यामासाचा पहिला दिवस खंडोबाची नवरात्री आणि देवदिवाळी म्हणून साजरा झाल्यानंतर सहा दिवसांच्या षड्रात्री उत्सवाचा समारोप शनिवारी (दि. ७) चंपाषष्ठीला खंडोबा पूजनाने झाली. ज्या परिवारांमध्ये खंडोबा कुलदैवत आहे तिथे चंपाषष्ठीनिमित्त कुलाचार-कुलधर्म करण्याची परंपरा असते. तत्पूर्वी पाच दिवस अनेक घरांमधील सदस्य उपवास करतात. सहाव्या दिवशी खंडोबाची षोडशोपचार पूजा करून महानैवेद्य दाखवला जातो. देव्हाऱ्यात अखंड नंदादीप लावला जातो.

खंडोबा मंदिरात तसेच शहर व परिसरातील खंडोबा मंदिरांत उत्सव साजरा होतो. चंपाषष्ठीला खंडोबाची नवरात्र म्हणूनही ओळखले जाते. मल्हारी मार्तंड हा भगवान शंकराच्या अवतारापैकी एक आहे. हा सण प्रामुख्याने महाराष्ट्र आणि कर्नाटकात साजरा केला जातो. घरोघरी मार्तंड भैरवाची म्हणजे मल्हारी मार्तंड देवतेची विधिवत पूजा करून भंडारा उधळत तळी उचलण्याचा विधी केला जातो.

यात्रा काळात मंदिर समिती कढून गाभारा व सभा मंडपामध्ये आकर्षक अशी फुलाची सजावट करण्यात आली आहे. भाविकांना अन्नदान प्रसाद,दर्शनासाठी मुख दर्शन व गाभारा दर्शन रांग , कमांडो फोर्स, सुरक्षेच्या दृष्टीने सी सी टी व्ही कॅमेरा, पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे.

सोलापूर महानगपालिके काढून मंदिर परिसर मध्ये आरोग्याच्या दृष्टीने औषध फवारणी, साफ सफाई, पालखी मार्ग व परिसरात अतिरिक्त पथ दिवे, बसेस,फिरते सौचालयची व्यवस्था करण्यात आली आहे. पोलिस आयुक्त यांच्या कडून चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

महाराष्ट्रात खंडोबा आणि कर्नाटकात मैलार या नावाने ओळखला जाणारे हे कुलदैवत कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या आध्यात्मिक, धार्मिक आणि सांस्कृतिक अनुबंधाचे एक प्रकट प्रतीक आहे, मल्लारी मार्तंड भैरव हे त्याचे संस्कृत नाव. या देवतेची लोकप्रियता एवढी व्यापक आहे की, रानावरणात फिरणारा धनगर, रामोशांपासून देशस्थ ब्राह्मणांपर्यंत समाजाच्या सर्व थरांत त्याची उपासना प्रचलित आहे.

खंडोबाचे नवरात्र हे मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा ते मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी असे सहा दिवस साजरे केले जाते. हा खरा षड़ात्रोत्सव असतो. मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी म्हणजेच चंपाषष्ठी, या दिवशी खंडोबा ऋषींच्या विनंतीला मान देऊन मणी-मल्लाचा वध करून लिंगद्वय रूपाने प्रगट झाले. नवरात्राचे पाच दिवस उपवास करून सहाव्या दिवशी तो सोडतात. सहा दिवस देवापुढे नंदादीप ठेवतात. देवाला बेल, दवणा व झेंडूची फुले फार प्रिय म्हणून ती आठवणीने वाहतात.

श्री खंडोबा हे महाराष्ट्राचे कुलदैवत आहे. मुख्यत्वे करून महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांत खंडोबाची उपासना जास्त केली जाते. खंडोबाचे नवरात्र हे मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा ते मार्गशीर्ष शुद्ध षष्टी असे सहा दिवस साजरे केले जाते. मार्गशीर्ष शुद्ध षष्टी म्हणजेच चंपाषष्टी या दिवशी खंडोबा ऋषींच्या विनंतीला मान देऊन मणी-मल्लाचा वध करून लिंगद्वय रूपाने प्रगट झाले. नवरात्राचे पाच दिवस उपवास करून सहाव्या दिवशी तो सोडतात. सहा दिवस देवापुढे नंदादीप ठेवतात. देवाला बेल, दवणा व झेंडूची फुले फार प्रिय आहेत म्हणून ती वाहतात.

## काही सौम्य नवस :-

१) मौल्यवान वस्तू देवास अर्पण करणे.
२) दीपमाळा बांधणे.
३) मंदिर बांधणे किंवा मंदिराचा जीर्णोद्धार करणे.
४) पायऱ्या बांधणे. ओवरी बांधणे.
५) देवावर चौरी ढाळणे. खेटे घालणे म्हणजे ठराविक दिवशी देवदर्शनास जाणे.
६) पाण्याच्या कावडी घालणे.
७) उसाच्या किंवा जोंधळ्याच्या ताटांच्या मखरांत प्रतीकात्मक देवाची स्थापना करून वाघ्या मुरळी कडून देवाची गाणी म्हणविणे. यालाच जागरण किंवा गोंधळ असेही म्हणतात.
८) देवाची गदा म्हणजे वारी मागणे. (देवाच्या नावाने ठराविक काळांत भिक्षा मागणे.)
९) तळी भरणे, उचलणे, दहीभाताची पूजा देवास बांधणे.
१०) पुरण-वरण व रोडग्याचा आठवा रीतिनुसार नैवेद्य करून ब्राह्मण, गुरव व वाघ्या-मुरळी यांस भोजन घालणे.
११) कान टोचणे, जावळ, शेंडी आदी विधी करणे. खोबरे भंडारा उधळणे, देवाच्या मूर्ती विकणे.

## खंडोबाची पांच प्रतिके :-

१) लिंग: हे स्वयंभू, अचल अगर घडीव असते.
२) तांदळा: हि चल शिळा असून टोकाखाली निमुळती होत जाते.
३) मुखवटे: हे कापडी किंवा पिटली असतात.
४) मूर्ति: ह्या उभ्या, बैठ्या, घोड्यावर कधी धातूच्या किंवा दगडाच्याही आढळतात.
५) टांक: घरांत पूजेसाठी सोन्याच्या पत्र्यावर किंवा चांदीच्या पत्र्यावर बनविलेल्या प्रतिमा.

## श्रीखंडोबाचे दर्शन घेऊन भाविक करतात आपला खेटा पूर्ण



श्री खंडोबा हे मुख्यत्वे महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक या राज्यातील बहुजनांचा कुलदैवत असुन नवसाला पावणारा देव आहे. कुलदैवत असल्याने भक्तगण मार्गशीर्ष महिन्यात श्री खंडोबाचे दर्शन घेऊन आपला खेटा पूर्ण करतात त्यामुळे भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी या महिन्यांमध्ये पडत असते. आजच्या यात्रेच्या निमित्ताने समस्त शेतकरी बांधव यांच्यासह सर्व भक्तांना श्री खंडेराया सुख संपन्न ,आरोग्य वैभव व सुख शांती समाधान देवो ही भावना व्यक्त करतो. **- गणेश पुजारी, मुख्य पुजारी, श्री खंडोबा देवस्थान बाळे.**



## रविवार दिन विशेष

रविवार हा खंडोबाचा रविवार मानण्यात आलेला आहे. सोमवती अमावस्या, चैत्री, श्रावणी व माघी पौर्णिमा, चंपाषष्टी व महाशिवरात्र ह्या दिवसांना विशेष महत्व आहे. मल्हारी- मार्तंड हा शिवाचा भैरव अवतार मानला असल्याने रविवारला महत्व आले असावे. चैत्री पौर्णिमा हा मार्तंड-भैरवाचा अवतार दिन आहे. श्रावणी पौर्णिमेस मल्हारी व बाणा यांचा विवाह झाला. माघी पौर्णिमा हा म्हाळसेचा जन्म दिवस आहे. तर मार्गशीर्ष शुद्ध षष्टी म्हणजेच चंपाषष्टी या दिवशी खंडोबा, ऋषींच्या विनंतीला मान देऊन मणी-मल्लाचा वध करून लिंगद्वय रूपाने प्रगट झाले.

## चंपाषष्ठी पूजा विधी

मार्गशीर्ष महिन्यातील शुक्ल पक्षातील प्रतिपदा ते षष्ठी तिथीपर्यंत हा उत्सव सुरू असतो. या सहा दिवसांत मार्तंडदेवाजवळ नऊ तेलाचे दिवे लावले जातात. तसेच विधिवत खंडोबाची पूजा करून आरती म्हटली जाते. चंपाषष्ठीच्या दिवशी धान्यांचे पीठ (ठोंबारा) बाजरीचा रोडगा आणि वांग्याचे भरीत नैवेद्य म्हणून अर्पण केले जाते. काही परिवारात प्रथेनुसार पुरणपोळी किंवा श्रीखंडाचाही नैवद्य दाखवला जातो. तसेच दिवे ओवाळणीची देखील पद्धत आहे. यात्रेच्या पुढील प्रत्येक रविवारी सायं श्री ची पालखी, घोडा, नंदीध्वज याचा सह मिरवणूक निघते.

## चंपाषष्ठीचे अनन्यसाधारण महत्त्व

भगवान खंडोबाच्या मल्ल आणि मणि या दोन राक्षसांवर झालेल्या विजयाचे स्मरण म्हणून चंपाषष्ठी साजरी करतात. या राक्षसांचा पराभव करण्यासाठी भगवान शंकराने मार्तंड भैरवाचे रूप घेतल्याचे पुराणात सांगितले जाते. हे युद्ध अवघ्या सहा दिवसांतच संपले. याच दिवशी मार्गशीर्ष महिन्यातील षष्ठी तिथी होती. हा दिवस वाईटावर विजय म्हणून साजरा केला जातो.

## मंदिराची स्थापना आणि वैशिष्ट्ये

श्री क्षेत्र खंडोबा मंदिराची तब्बल ७०० ते ९०० वर्षांपूर्वी स्थापना झाली आहे. हे मंदिर ऐतिहासिक आणि पुरातन काळातील मंदिर आहे. पुरातन काळातील हे बांधकाम असल्याचे सांगण्यात आले आहे मात्र हे काळ्या दगडाच्या भिंती असणारे व तीन ते चार फ ूट रुंदीच्या भक्कम भिंती कोणी बांधल्या याचा उल्लेख नसल्याचे मंदिर समितीने सांगितले. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश मधील जवळपास ४० टक्के भाविक भक्तांचे खंडोबा हे कुलदैवत आहे.

## अनेक कुटुंबांचे कुलदैवत श्री खंडेराय

खंडोबा हा देव महाराष्ट्रात प्रसिध्द असला तरीही तो लगतच्या राज्यांतही, म्हणजेच कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तेलंगणातही तितकाच प्रसिध्द आहे. अभ्यासकांच्या मते हा मूळचा कर्नाटकातील लोकदेव/ग्रामदेव. कर्नाटकात त्याचे नाव मैलार म्हणून ज्ञात आहे. साधारणतः सन १००० पासून हा ग्रामदेव कर्नाटकात प्रसिध्द होवू लागला. मल्हार हा महाराष्ट्रातील अनेक कुटुंबांचा लोकप्रिय असा कुलस्वामी (कुलदैवत) आहे. खंडोबाचेही ते एक नाव आहे. खंडोबा हा शंकराचा अवतार समजला जातो. मल्लासुर दैत्याचा संहार केला, मल्लाची हार झाली म्हणून मल्ल हार अशारितीने मल्हार हे नाव मिळाले असावे. येळकोट येळकोट जय मल्हार असा या देवाचा जयघोष केला जातो. मल्हारी मार्तंड (मल्लारिमार्तंड) असेही नामाभिधान आहे. मूळ संस्कृतमध्ये या नावाचा उच्चार मल्लार असा आहे.

## परराज्यातून येणाऱ्या नागरिकांसाठी मंदिर समितीच्या वतीने सर्व सुविधा



श्री क्षेत्र खंडोबा यात्रेस प्रारंभ झाला आहे. तेलंगाना आंध्र आणि कर्नाटक या तिन्ही राज्यातील अनेक कुटुंबांचे खंडेराया कुलदैवत आहे. नागरिक मनोभावे दर्शन घेण्यासाठी पवित्र अशा मार्गशीर्ष महिन्यात येत असतात, नवीन आयुष्याची सुरुवात खंडेरायाच्या दर्शनाने करतात, मनोभावे उपवास पकडतात, मनातील इच्छा, साकडे देवाच्या चरणी मागतात. महाराष्ट्र, कर्नाटक तसेच आंध्रप्रदेशातून लोक दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात येत येतात. परराज्यातून येणाऱ्या नागरिकांसाठी सर्व सर्वे सुबिधा करण्यात आल्या आहेत. भाविकांसाठी दर्शन रांगेचे नियोजन करण्यात आले आहे. येणाऱ्या भाविकांनी मंदिर समितीकडून दिलेल्या पार्किंगमध्ये आपल्या गाड्या लावाव्यात, असे आवाहन मंदिर समितीकडून करण्यात आले.

**- विनय ढेपे, अध्यक्ष श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान बाळे**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नांदेड जिल्ह्यात महायुतीचे ९ पैकी ९ आमदार एकही झाला नाही नामदार !

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १६ डिसेंबर**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत नांदेड जिल्ह्यातील नऊ विधानसभा मतदारसंघात नऊपैकी नऊ आमदार महायुतीची निवडून आले आहे परंतु या निवडणुकीत एकाही आमदाराला नामदार होण्याची संधी मिळाली नसल्याने नांदेडच्या पदरी निराशाच पडले असल्याचे दिसून येत आहे विशेष म्हणजे मंत्रिपदासाठी प्रमुख दावेदार असलेल्या आमदार तुषार राठोड व आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी यांना मंत्रिपदाची हुलकावणी मिळाली असली तरी त्यांनी ही मात्र कुठलीच नाराजी व्यक्त केली नसल्याने जिल्ह्यातील आमदार आहे आमदारकीवरच समाधानी आहेत की काय अशी चर्चा जिल्ह्यात सुरू आहे.

महाराष्ट्रात तीन दशकांनंतर राज्य सरकारच्या मंत्र्यांचा शपथविधी मुंबईऐवजी नागपुरात पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातील ३९ मंत्र्यांनी गोपनीयतेची शपथ घेतली. महाराष्ट्रात यापूर्वी १९९१ मध्ये नागपुरात शपथविधी सोहळा पार पडला होता. त्यानंतर आता

२०२४ मध्ये मुंबईऐवजी नागपुरात शपथविधी सोहळा झाला. मात्र नांदेडच्या पदरी निराशाच आली आहे. दिग्गज नेते आ. प्रताप पाटील चिखलीकर, आ. तुषार राठोड, आ. भीमराव केरामही पहिल्या यादीत बेदखल झाले आहेत. नांदेडतील एकाही आमदारांना फोनच आला नसल्याने सर्वांनीच मंत्रीपदाचा नाद सोडला. दरम्यान, यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींसह नागरिकांनीही तीव्र नाराजी व्यक्त केली.

मुंबईतील आझाद मैदानावर ५ डिसेंबर रोजी भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून, तर शिवसेना नेते एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस नेते अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर मंत्रिमंडळ विस्ताराबाबत चर्चा सुरू होती.

शपथविधीसाठी आधी १२ आणि नंतर १४ डिसेंबर तारीख जाहीर करण्यात आली होता. अखेर आता १५ डिसेंबर तारीख निश्चित करण्यात आली होती. मात्र या मंत्रीमंडळात नांदेडातील एकाही आमदारांना संधी दिली नाही. विधानसभेचं हिवाळी अधिवेशन आज दि. १६ डिसेंबर पासून नागपुरात सुरू होत आहे. त्याआधी एक दिवस सर्व मंत्र्यांना शपथ दिली आहे.

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळ विस्तारासाठी रविवारचा मुहूर्त निश्चित करण्यात आला होता. यासाठी भाजपमधून मंत्रिपद मिळणाऱ्या आमदारांना खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः फोन केल्यावर



शपथ घेण्यासाठी उपस्थित राहण्याच्या सूचना मिळाल्यावर यावर अधिकृत शिक्कामोर्तब होणार होता. मात्र शनिवारी रात्री उशिरापर्यंत आणि रविवारी सकाळीही कोणालाही मुख्यमंत्री तथा इतर हायटेक नेत्यांचा फोन आला नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी आणि जिल्ह्यातील जाणकार नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नागपूरमध्येच मंत्रिमंडळ विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी राजभवनात संपूर्ण तयारी झाली होती. दुपारी फोन येण्याचा ४ वाजेचा टायमिंग होता. मात्र जिल्ह्यातील महातूयीच्या आमदारांपैकी कोणालाही मुख्यमंत्री तथा मोठ्या नेत्यांचा फोन आला नाही. स्थानिक लोकप्रतिनिधींचे पीए एकमेकांच्या स्वीय सहाय्यकांना तुम्हाला फोन आला का ? असे विचारताना दिसून आले. इतकेच नाहीतर दुपारनंतर सर्वांचे डोळे मोबाईलकडेच लागले होते. काही आमदारांनी तर नागपूरला जाण्यासाठी आपल्या बॅगा तयारच ठेवल्याचेही सांगण्यात आले; मात्र या सर्वांचा एकप्रकारे हिरमोडच झाला आहे. भाजपमधील संभाव्य मंत्र्यांच्या यादीत आ. प्रताप पाटील चिखलीकर, आ. तुषार राठोड, आ. भीमराव केराम, आ. राजेश पवार यांच्यासह नांदेड जिल्ह्यात ९ पैकी ९ महायुतीचे आमदार निवडून आणण्यात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या खा. अशोक चव्हाण यांच्या कन्या आ. श्रीजया चव्हाण यांच्या नावाची गेल्या चार दिवसांत मंत्री होणार म्हणून फक्त चर्चाच झाली. एकंदरीत, नांदेडातील ९ पैकी महायुतीच्या एकाही आमदारांना मंत्रीमंडळात संधी मिळाली नसल्याने नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री पुन्हा दुसऱ्याच जिल्ह्यातील मिळणार हे निश्चित झाले आहे.

# भोकर शंभर टक्के बंद;सूर्यवंशी यांच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्यावर गून्हे दाखल करा

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. १६ डिसेंबर**

परभणी येथे संविधान विटंबना प्रकरणी ड सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी या तरुणास पोलीसांनी बेदम मारहाण केल्याने मृत्यु झाला असुन मारहाण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर खुनाचा गुन्हा दाखल करा या मागणी साठी भोकर येथील सर्व संविधान लोकशाही समर्थकाच्या वतीने निवदेन देण्यात आले.

परभणी येथे दि १० डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या समोरील संविधान प्रतिआकृतीची विटंबना सोपान पवार नावाच्या माथेफिरु समाजकंटकाने केली विटंबनेच्या निषेधार्थ आंदोलनकर्ते ॲड. सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी या तरुणास पोलीसांनी बेदम मारहाण केल्याने मृत्यु झाला आहे. कोबिंग ऑपरेशनच्या नावाखालील पोलीसांनी दलीत वस्तीत घुसून महिला, पुरुष, तरुणांना निर्दयीपणे लाठी हल्ला करुन जखमी केले. तसेच निष्पाप तरुणावर दंगलीचे गुन्हे दाखल करुन त्यांना तुरुंगात डांबले आहे या निषेधार्त दि. १६ डिसेंबर २०२४ रोजी भोकर शहर शंभर टक्के बंद ठेवण्यात आले प्रमुख मागण्या ॲड. सोमनाथ सुर्यवंशी याचा पोलीस मारहाणीत मृत्यु झाल्याने मारहान करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यावर मणुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा, मयत सोमनाथ सुर्यवंशी यांच्या वारसांना ५० लाख रुपयाची मदत देवुन त्यांच्या कुटूंबातील व्यक्तीस शासकीय नोकरी देण्यात यावी, संविधान विटंबना



करणाऱ्या समाजकंटकावर देश द्रोहाचा गुन्हा दाखल करावा, परभणी येथील अंदोलन कर्त्यावरील सर्व गुन्हे मागे घेवुन त्यांची सुटका करावी, दलित वस्तीत घुसून पोलीसांनी महिला, पुरुष, तरुणांना मारहाण करीत व वाहनांची तोडफोड केली तो व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला असुन विनाकारण मारहाण करणाऱ्या पोलीसांना निलंबित करण्यात यावे अशा अशयाचे मागणी निवेदन मुख्यमंत्री यांना तहसीलदार यांच्या तर्फे पाठवण्यात आले तर अनुचित प्रकार घडु नये म्हणुन पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शना खाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता भोकर बंद ला व्यापारी, शाळा, महाविद्यालय, एस टी बस सहभाग नोंदवुन शंभर टक्के प्रतिसाद मिळाला या वेळी एल. ए. हिरे, गोविंद बाबा गौड पाटील, डॉ साईनाथ वाघमारे, बि आर पांचाळ, उत्तम बाभळे, माधव अमृतवाड, जयभीम पाटील, नामदेव वाघमारे, भिमराव दुधारे, दिलीप के.राव, डॉ मनोज गिमेकर, डॉ विजयकुमार दंडे, देविदास हटकर ,डॉ कैलास कानिर्दे, सुलोचना ढोले, सुरेखा गजभारे,सुलोचना गायकवाड, सुरेखा माळे, शमीम बेगम ,विक्रम क्षिरसागर, कपील कांबळे, सुनील कांबळे, जुनेद पटेल, सिद्धार्थ जाधव, उत्तम कसबे, प्रतिक कदम, संदीप गायकवाड, मिलींद गायकवाड,शंकर कदम, मनोज शिंदे, संतोष डोंगरे, आनंद ढोले, निळकंट वर्षे वार, तौसीफ इनामदार, संतोष आलेवाड, बाबाखान पठाण ,माणिक जाधव,रमेश गंगासागरे, दयानंद गुंडेराव, दलित डोंगरे, राहुल सोनकांबळे, अविनाश गायकवाड, पांडुरंग वर्षवार, सतिश जाधव, भिमराव हनवते, साहेबराव वाहुळकर, गोविंद थोरात, साहेबराव हनमंते, गणेश वाघमारे, मिलिंद दुधारे,आशिष वाघमारे,आदित्य वाघमारे, तथागत गाडेकर, सतिश गुंडेराव, सुमित खंडेलोटे, मनोज मोरे, भागवान जाधव, अभिनंदन दांडगे,अशित सोनुले, निखील हंकारे , वंसंत जाधव, बिंबीसार पाटील, अतुल महाबळे, नरेंद्र मोरे, बंटी वाघमारे,दिगांबर कांबळे, विश्वजीत जळपतराव, प्रसेनजीत पाटील, प्रकाश वाघमारे, उमाकांत एडके, किरण डगारे, शुभम गोदाम छोटू हनवते आदि राष्ट्रप्रेमी नागरीकासह उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### नरसी बाजारपेठ बंद

**नायगाव**-परभणी येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात भारतीय संविधानाची प्रतिकृतीची एका माथेफिरुने केलेली विटंबना व संविधान योद्धा सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी यांच्या मृत्यू घटनेच्या निषेधार्थ येथील समाज बांधवांच्या वतीने बाजार पेठ,व राज्य महामार्गावरील रास्ता रोको करीत कडकडीत बंद पाळण्यात आला.

या वेळी लालबा सुर्यवंशी, गंगाधर भेदे, विजय भेदे, दौलत भेदे, सुनिल भेदे,चंदर भेदेसह, वंचित बहुजन आघाडीतील तालूकाध्यक्ष डोईवाड कोपरेकर, धामणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते टिपू धामणगांवकरा सह, असंख्य कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते तर या बंद वेळी अनुचित प्रकार घडू नये यासाठी रामतिर्थचे साह्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप,यांनी रामतिर्थ ठाण्यातील डोणगांव बिटचे जमादार शिवशंकर शिंदेसह सर्व पोलीस कर्मचारी व जिल्ह्यातील अतिरिक्त पोलिसां ची कुमक मागवून उत्तम बंदोबस्त लावुन बंद शांततेत पार पाडण्यात आला.

### गोदावरी अर्बनमध्ये संस्थापक दिन उत्साहात

**नांदेड**-गोदावरी अर्बनचे संस्थापक नामदार हेमंत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त गोदावरी अर्बनच्या वतीने मुख्य शाखा तरोडा नाका,नांदेड येथे भव्य रक्तदान शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या शिबीरात १०३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी गोदावरी अर्बनच्या अध्यक्ष राजश्री पाटील, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, सचिव ड.रविंद्र रगटे, संचालक प्रा.सुरेश कटकमवार, वर्षा देशमुख, वसंत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अजय देशमुख सरसमकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. गोदावरी अर्बनचे संस्थापक हेमंत पाटील यांचा जन्मदिन १६ डिसेंबर २०२४ हा दिवस असून संस्था हा दिवस संस्थापक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करतो तसेच वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे देखील आयोजन करीत असते. यामध्ये वृद्धाश्रमास उपयोगी साहित्य व भोजन, अनाथ मुलांसाठी विविध शैक्षणिक साहित्य, रस्त्यावरच्या गरजूना पांघरून वाटप, वृक्षारोपण अशा विविध सामाजिक बांधिलकी जपत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

# नांदेडमध्ये राज्यस्तरीय युवा महोत्सव उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १६ डिसेंबर**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व राष्ट्रीय सेवा योजना, स्वा. रा.ती.मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व नेहरु युवा केंद्र, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तर युवा महोत्सव सन २०२४-२५ (१५ ते २९ वर्षाआतील युवक-युवती) चे आयोजन १२ ते १४ डिसेंबर, २०२४ या कालावधीत कुसुम सभागृह, व्ही.आय.पी.रोड, नांदेड येथे संपन्न झाले.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल या तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणुन पुणे विभागाचे क्रीडा व युवक सेवा उपसंचालक युवराज नाईक व सहायक संचालक मिलींद दिक्षीत, सहाय्यक संचालक, हिंगोलीचे जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभर., श्रीमती सान्वी जेठवाणी, अध्यक्ष सप्तरंग सेवाभावी संस्था, नांदेड आदि मान्यवर उपस्थित होते. ही स्पर्धा यशस्वी करणेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांचे मार्गदर्शनाखाली राज्य क्रीडा मार्गदर्शक बालाजी शिरसीकर, श्रीमती शिवकांता देशमुख, राहुल श्रीरामवार, विपुल दापके , संतोष कनकावार, डॉ.बालाजी पेनूरकर, फजल गफुरसाब मुल्ला, मकरंद पाटील, दत्तकुमार धुतडे, संजय चव्हाण, आनंद जोंधळे, हनमंत नरवाडे, आकाश भोरे, मोहन पवार, सुभाष धोंगडे, शेख इकरम, विद्यानंद भालेराव, चंद्रकांत गव्हाणे, यश कांबळे आदींची उपस्थिती होती.

# लोहा तालुक्यात कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. १६ डिसेंबर**

परभणी येथे माथेफिरूने संविधान शिल्पाची विटंबना केली, आंबेडकर अनुयायीनी आंदोलन केले. या आंदोलनात सोमनाथ सुर्यवंशी यांचा पोलिस कस्टडीत मृत्यु झाला यांची चौकशी करा मास्टरमाईंड कोण आहे शोधुन काढ विविध मागण्यांचे निवेदन देऊन मागणी केली.शहर व तालुका कडकडीत बंद पाळुन निषेध केला.

लोहा तालुका व शहरामध्ये व्यापाऱ्यांनी स्वतःहुन आपली दुकाने बंद ठेवून बंदला पाठिंबा दर्शवला, परभणीत निंदनीय प्रकार घडला, लोकशाही मार्गाने आंदोलन सुरू आसता पोलिस यंत्रणेकडून आंदोलन मोडीत काढण्याचा कुटील डाव रचुन, भिमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांना मारहाण केली त्याचा कस्टडीत मृत्यू झाला, त्या मृत्युला महाराष्ट्राचे गृहविभाग जबाबदार आहे. गृहविभाचा निषेध करण्यासाठी रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंद ची हाक दिली या आदेशाने लोहा तालुका व शहर कडकडीत बंद करुन तहसीलदार व पोलिस निरीक्षक यांच्या कडुन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अनेक मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी तालुक्यातील सर्व आंबेडकर अनुयायी उपस्थित होते.

# मुदखेड शहरातील बाजारपेठ कडकडीत बंद



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १६ डिसेंबर**

परभणी मध्ये झालेल्या आंदोलनात पोलिस कस्टडीत असलेल्या सोमनाथ व्यकंट सुर्यवंशी यांचा मृत्यू झाला असल्याने त्याच्या निषेधार्थ आनंदराज आंबेडकर यांनी दि. १६ डिसेंबर रोजी संविधान प्रेमी यांना महराष्ट्र बंदची हाक दिली होती. परभणी येथील संविधान विटंबना प्रकरणी भिमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांचा पोलिस कस्टडीत मृत्यू झाला त्याच्या निषेधार्थ मुदखेड शहरातील व्यापाऱ्यांनी कडकडीत बंद पाळून निषेध व्यक्त केला. मुदखेड येथील व्यापाऱ्यांनी आपले दुकाने बंद ठेवून बंदला चांगला प्रतिसाद दिला मुदखेड शहरात गुजरी भाग, व सुभास गंज मौढा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, उमरी रोड, नांदेड रोड,भागातील दुकाने शंभरटक्के कडकडीत बंद होते. संविधान प्रेमी भिमसैनिकांने शांततेत बंद पाळल्याने कुठेही अनुचीत प्रकार घडला नाही. मुदखेड पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक वसंत सप्रे यांच्या मार्गदर्शनाखाली चोक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# दुर्जनांचा दुष्टपणा संपावा हे पसायदानाने शिकवले : देविदास फुलारी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १६ डिसेंबर**

गीतेमध्ये दृष्टांचा संहार करण्याची परिभाषा येते. परित्राणाय साधूनाम किंवा अभ्युत्थानम अधर्मस्य हे संबोध दुष्टांनाच संपवण्याची भाषा करतात. पण संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी पसायदान जे मागितले ते अद्वितीय आहे. खळांची व्यंकटी सांडावी आणि सत्कर्मी रती वाढावी हे मानवतावादी विचार ज्ञानेश्वराने पसायदानात मांडले आहेत. दुष्ट दुराचारी पण जगले पाहिजेत पण दुष्टातील दुष्टपणा निघून जावा असा मानवतावादी विचार पसायदानात येतो.एकूणच गीतेच्या तत्त्वज्ञानात ज्ञानेश्वरांनी मानवतावादाची भर घातली असून दुराचारी माणसे संपू नयेत तर त्यांचा दुष्टपणा संपावा हे समाजाला ज्ञानेश्वरांच्या पसायदाराने शिकवले.



दुर्जनाचा दुष्टपणा संपावा त्याच्यातला निखळ माणूस उन्नत व्हावा हे पसायदानाने शिकवले असे प्रतिपादन साहित्यिक देवीदास फुलारी यांनी केले. फलटण जिल्हा सातारा येथील गोविंद काका उपळेकर संस्थानमध्ये आयोजित केलेल्या पसायदानातील सामाजिक आशय या विषयावर ते बोलत होते. प्रारंभी फलटण येथील गीता धर्म मंडळाचे अध्यक्ष प्रसिद्ध समीक्षक पुष्पाताई बाजीराव कदम यांनी प्रास्ताविक केले. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दोन दिवसांच्या गीताजयंती सोहळ्याचे आयोजन केल्याचे सांगून मागील २२ वर्षापासून हा उपक्रम चालू असल्याचे त्यांनी सांगितले . या कार्यक्रमात फलटण परिसरातील अनेक रसिक साहित्यिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# महाराष्ट्र बंद; सिडकोत कडकडीत बंद



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १६ डिसेंबर**

परभणी येथे सविधान प्रास्ताविकेची विटंबना कारणावरून घडलेल्या घटनेमुळे परभणीतील भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी या आंदोलकांचा पोलिस कोठडीत मृत्यू झाल्याने या दोन्ही बाबींचा निषेध करत संविधान प्रेमी समाज बांधवांनी दिनांक १६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र बंदच्या आव्हानास नांदेड सिडको येथे ही बदला कडकडीत प्रतिसाद दिला. सिडको हाडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातून भीमसैनिकांनी परभणी येथील घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ प्रशासनाचा निषेध करत व परभणी येथील भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या पोलिसावर मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करा अशी मागणी करत सिडको येथील भीमसैनिकांनी सिडकोच्या मुख्य रस्त्याने हातात संविधान प्रास्ताविकेचे प्रतिमा घेऊन निषेधरॅली काढण्यात आली . ही निषेध रॅली हडको शिवाजी महाराज पुतळा ते रामा माता चौक येथे शहिद सोमनाथ सूर्यवंशी यांना श्रद्धांजली अर्पण करून विसर्जित करण्यात आले. दरम्यान संपूर्ण मार्केट कडकडीत बंद ठेवण्यात आले. यावेळी आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते पी.एस. गवळी, विलास गजभारे, राजू लांडगे, विठ्ठल गायकवाड, प्रसेनजीत वाघमारे, सम्राट आढाव, प्रदीप हनवते, व्यंकट इंगळे, गौतम पवार, गौतम डुमणे, आकाश सोनकांबळे, मनोज नांदेडकर, सिद्धार्थ गायकवाड, अमृत नरंगलकर साहेबराव भंडारे, जगदीश भुरे, मोतीराम गायकवाड, शिवाजी कांबळे ,धम्मा गजभारे, धम्मा गोपाळे, संदिप महाबळे केशव कांबळे, कोकरे यांच्यासह सिडको परिसरातील भीमसैनिकाची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सदरील बनला गालबोट लागू नये यासाठी पोलीस उपविभागीय अधिकारी सुशील कुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांचे अधिकारी कर्मचारी या टीमने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# परभणी घटनेच्या निषेधार्थ किनवटची बाजारपेठ बंद





**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. १६ डिसेंबर**

परभणी घटनेच्या निषेधार्थ आंबेडकरवादी संघटनांनी पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला किनवट तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दिवसभर दुकाने बंद ठेवून कडकडीत बंद पाळला.यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर ते तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा काढून विविध मागण्याचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले.

परभणी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधान प्रतिकृतीची विटंबना झाल्यानंतर पुकारण्यात आलेल्या बंद दरम्यान हिंसाचार उफाळला होता यात पोलिसांनी अटक केलेल्या एका तरुणाचा पोलीस कस्टडी मृत्यू झाल्यानंतर विविध आंबेडकरी संघटनानी महाराष्ट्र बंदची हाक दिली होती या बंदला किनवट तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून व्यापाऱ्यानी स्वयंस्फूर्तीतिने दिवसभर कडकडीत बंद पाळला. शासकीय कार्यालय दवाखाने औषधी दुकाने वगळता संपूर्ण बाजारपेठ बंद होती. दुपारी आंबेडकरी संघटनांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा काढून मागण्याचे निवेदन सादर केले. यावेळी राज्य सरकार व पोलीस प्रशासना विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. परभणी येथील संविधान प्रतिकृतीची तोडफोड करणाऱ्या मुख्य सूत्रधाराचा तात्काळ शोध घेऊन देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूस जबाबदार धरून पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, मयताच्या कुटुंबीयांना ५० लाख रु अर्थसाहाय्य द्यावे, निष्पाप आंबेडकरी नागरिकांवर दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावेत, पोलिसांकडून सुरू असलेले कोंबिंग ऑपरेशन तात्काळ थांबवावे परभणीतील कायदा व सुव्यवस्था हाताळण्यास अपयशी ठरलेल्या पोलीस अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांना निलंबित करावे व त्यांचे विभागीय चौकशी करावी,पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांना या प्रकरणात आरोपी करून निलंबित करावे, महिला व पुरुष व तरुणावर जातीद्वेष्यातून दाखल केलेले गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत, पोलिसानी केलेल्या अमानुष मारहाणीत जखमी झालेल्या नागरिकांवर शासकीय खर्चातून मोफत उपचार करून नुकसान भरपाई द्यावी अशा मागण्या निवेदनात केल्या आहेत यावेळी रिपाई नेते दादाराव कायापाक, विनोद भरणे ॲड. मिलिंद सर्पे, माजी नगराध्यक्ष अरुण आळणे शंकर नगराळे, विजय पोलासवार, प्रवीण गायकवाड, विवेक ओंकार, वंचितचे तालुकाध्यक्ष निखिल वाघमारे, माधव कावळे, मिलिंद कांबळे, निखिल कावळे, राहुल सरपे, एड.सम्राट सर्पे, सुगत नगराळे, दिनेश कांबळे, सम्राट कावळे, गंगुबाई परेकर यांच्यासह आंबेडकरी व संविधानप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बंद दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी श्री मळगणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला यांनी जागोजागी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवला होता.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# संतोष देशमुख हत्याप्रकरणी आ.संदीप क्षीरसागर आक्रमक

## आठवडाभरात योग्य पाऊले न उचलल्यास रस्त्यावर उतरणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ डिसेंबर**

मस्साजोग येथील दिवंगत सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरनातील नराधम आरोपी अजूनही मोकाटच आहेत. अतिशय विदारक प्रकरण असताना यातील आरोपी अटक होत नाहीत. प्रशासनाकडून या प्रकरणात दिरंगाई कशाबद्दल होत आहे? असा सवाल उपस्थित करत मस्साजोग प्रकरणी, नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळ अधिवेशनादरम्यान आ.संदीप क्षीरसागर यांनी आक्रमक होत विधिमंडळ परिसरात आंदोलन केले.



केज तालुक्यातील मस्साजोग येथील दिवंगत सरपंच स्व.संतोष देशमुख यांचे अपहरण करून अतिशय अमानवीय, क्रूर दि.९ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आली आहे. अतिशय किरकोळ कारण असताना गुन्हेगारी प्रवृत्ती असलेल्या आणि बीड जिल्ह्यांश सत्ताधाऱ्यांचा राजाश्रय असलेल्या नराधमांनी हे कुकर्म केले आहे. स्व.देशमुख यांचे अपहरण झाले तेव्हा त्यांचे लहान बंधू यांनी केज पोलीस स्टेशन ला जाऊन सदरील घटनेची माहिती दिली तरीही तेथील पोलिसांनी वेळ वाया घालवत कुठलीही कारवाई न करता त्यांना तिथे बसवून घेतले. या वेळेत स्व.देशमुख यांचा जीव वाचला असता. पोलिसांनी जाणीवपूर्वक आरोपीना हे कृत्य करण्यासाठी सहकार्य केले होते काय असाही संशय या प्रकरणात येत आहे. स्व.देशमुख यांची हत्या इतक्या हैवानतेने करण्यात आली आहे कि, त्याची कल्पनाही अत्यंत क्लेशदायक आहे. एवढे गंभीर प्रकरण असतानादेखील याप्रकरणातील मुख्य आरोपी अजूनही मोकाट आहेत. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी महाविकास आघाडीतील आमदारांसह विधिमंडळा परिसरात आंदोलन केले.

वाल्मिक कराड यांचे कॉल रेकॉर्ड तपासा

स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात वाल्मिक कराड हे मुख्य सूत्रधार असू शकतात. मारेकरी असणारे सर्व आरोपी हे वाल्मिक कराड यांचे निकटवर्तीय आहेत हे स्पष्ट आहे. वाल्मिक कराड यांचे कॉल रेकॉर्ड तपास केवळ माझी एकट्याची नसून एकंदरीत देशमुख कुटुंबीय, सर्व मस्साजोग गाववासीय आणि जिल्ह्यातील अनेक लोकप्रतिनिधी यांची आहे त्यामुळे एकदा वाल्मिक कराड यांचे कॉल रेकॉर्ड तपासले तर सत्य पुराव्यासह बाहेर येईल असेही आ.संदीप क्षीरसागर यांनी यावेळी म्हटले.

### बांगर कुटुंबियांना संरक्षण देण्याची मागणी

रामकृष्ण बांगर हे बीड जिल्ह्यातील एक संस्थाचालक आहेत. त्यांची संस्था वाल्मीक कराड यांना बळकावयची आहे. त्यामुळे बांगर कुटुंबियांवर गंभीर स्वरूपाचे खोटे गुन्हे दाखल करून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बांगर कुटुंबियांना संरक्षण देण्याची मागणीही आ.संदीप क्षीरसागर यांनी केली.

# तरुणांवर दाखल केलेले गुन्हे तात्काळ मागे घ्या



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१६ डिसेंबर**

परभणी येथे १० डिसेंबर २०२४ रोजी देशद्रोही समाज कंटकाने भारतीय संविधानाच्या प्रतीकृतीची विटंबना केली आहे. या देशद्रोही कृत्याचा दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला. भारतीय संविधानाच्या प्रतीकृतीची विटंबना करणाऱ्या देशद्रोही समाज कंटकावर भारतीय संहितेच्या देशद्रोही कायद्या नुसार कठोर कारवाई करावी. आणि सीबीआय चौकशी करून यातील मास्टर माईंड चा शोध घेण्यात यावा. तसेच सोमनाथ सूर्यवंशी या आंबेडकरवाद्याचा मृत्यू झाला आहे तो पी सी आर मध्ये होता.तेव्हा अमानवी अत्याचार करणाऱ्या पोलिसांवर तातडीने कारवाई करावी.

याप्रकरणी परभणी जिल्ह्याचे पोलिस अधिकारी व प्रशासनाला जाग यावी यासाठी संविधानिक मार्गाने आंदोलन करणाऱ्या निरपराध नागरिकांना व्देष भावनेतून अमानुष मारहाण केली आहे. त्यांच्यावर देखील कठोर कारवाई करावी. आणि बौद्ध समाजावर व्देष भावनेतून केले जात असलेले कोंबिग ऑपरेशन त्वरित थांबवावे. निर्दोष स्त्रीया, तरुणांवर दाखल केलेले गुन्हे तात्काळ मागे घेऊन त्यांना मुक्त करावे.

सदर देशद्रोही समाज कंटकावर योग्य ती कठोर कारवाई न झाल्यास जिल्ह्यातील संपूर्ण बौद्ध समाज रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल.यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासनाची राहिल.आशा अषयाचे भारतीय बौद्ध महासभा ता माजलगावच्या वतीने निवेदन देऊंन निषद व्यक्त केला. याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष डॉ भागवत साळवे, जिल्हा पर्यटन सचिव शामभाऊ वाघमारे, शहर अध्यक्ष एल आर मस्के,सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते डोंगरे, दयानंद साळवे,माजी सरपंच अभिमन्यु साळवे,बहुजन समाज पार्टी चे एड.अमोल डोंगरे,लिलाताई उजगरे,कालींदाताई बनसोडे, बाबासाहेब सोळके,मोहन काकडे,दत्ता प्रधान,सटवा मस्के सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी उपस्थित होते

# लवाद नामतालिकेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ डिसेंबर**

बहूराज्यीय सहकारी संस्था अधिनियम,२००२ चे कलम ८४ (४) अन्वये सन २०२५-२०२८ या कालावधीसाठी लवाद नामतालिका (-ीलळीीरी झरपलश्र) तयार करण्यासाठी खालील व्यक्तिंकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व न्यायालयात निवृत न्यायाधिश व सेवानिवृत्त विधी अधिकारी प्रक्टीसिंग डव्होकेटेस,चार्टड अकौन्टंट, कॉस्ट अकौन्टंट, राष्ट्रीय बॅंका, ग्रामीण बॅंका, भूविकास बॅंका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका, व्यापारी बॅंका, नागरी सहकारी बॅंका, राज्य सहकारी बॅंका यांच्या सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे) सहकार विभागातील उपनिबंधक दर्जापेक्षा वरच्या दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे) अशा व्यक्तींची नियुक्ती करताना अधिनियमामध्ये नमूद नसले तरीही खालील प्रमाणे अहर्ता पात्रता असाव्यात.

त्यांच्यावर कोणत्याही स्वरुपाचे गुन्हे दाखल नासावेत, शासकीस बॅक सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा. अशी व्यक्ती कोणत्याही काळ्या यादीत (Biack List) मध्ये समाविष्ठ नसावी. सदर व्यक्ती संबधीत विभागाच्या विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणा-या जिल्हयातील रहिवासी असावा (लातूर, उस्मानाबाद, बीड, नांदेड जिल्हयातील) व्यक्ती एकावेळी एकाच विभागातून अर्ज दाखल करू शकतो.

अर्जाचे विहित नमूने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्या कार्यालयात दि. १७ डिसेंबर २०२४ ते १६ जोनवारी २०३५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील, अर्ज सादर कण्याची अंतीम मुदत दि. १६ जानेवारी २०२५ पर्यंत आहे. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी पूर्ण करुन दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रारुप लवाद नामतालिका प्रसिध्द होईल.ही प्रारुप नामतालिका यादी संबधित विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात लावण्यात येईल. प्रारुप नामीकेवर हरकती असल्यास vaidhanik8gmail.com या ईमेल आयडीवर पुराव्यासह हरकती दि. २१ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सादर कराव्यात. हरकती निर्णय दि. ११ मार्च २०२५ रोजी करुन दि. १८ मार्च २०२५ रोजी अंतीम लवाद नामतालिका प्रसिध्द करण्यात येईल.याबाबतची जाहिर सूचना संबधित कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली असल्याचे लातूर सहकारी संस्थेचे, विभागीय सहनिबंधक, सुनिल शिरपूरकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# धनंजय मुंडे व पंकजा मुंडे या बहीण-भावाने घेतली मंत्रीपदाची शपथ

जिल्ह्यात आनंदोत्सव
**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ डिसेंबर**

जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच मुंडे घराण्यातील दोन राजकीय व्यक्तींनी सोबत मंत्रिपदाची शपथ घेतल्याचा दुर्मिळ योगायोग रविवारी (दि. १५) नागपूर येथील राजभवनावर जुळून आला.



धनंजय मुंडे व पंकजा मुंडे या बहीण-भावाने महायुती सरकारमध्ये एकाच दिवशी घेतलेली मंत्रिपदाची शपथ राज्याच्या राजकारणात चर्चेचा विषय ठरली आहे. बीड जिल्ह्यावर पुन्हा एकदा मुंडेंचेच वर्चस्व सिद्ध झाले.

जिल्ह्यात आनंदोत्सव

बीड जिल्ह्याच्या वाट्याला दोन कॅबिनेट । मंत्रिपद आल्याने महायुतीच्या कार्यकर्त्यांनी सर्वत्र पेढे वाढत, गुलालाची उधळण व फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला. पंदरा डिसेंबर डिसेंबर ही तारीख बीडकरांच्या आठवणीत । राहणारी ठरणार आहे. कारण पहिल्यांदाच बहीण-भाऊ यांनी सोबत मंत्रीपदाची शपथ घेतली.

# बीड तालुक्यात स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजनेअंतर्गत ३८ शेतकऱ्यांना मिळाला लाभ-तहसीलदार चंद्रकांत शेळके

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ डिसेंबर**

या योजनेंतर्गत राज्यात शेती व्यवसाय करताना वीज पडणे , सर्पदंश , विंचूदंश , विजेचा शॉक , पाण्यामध्ये बुडून मृत्यू , रस्ता रेल्वे अपघात इत्यादी कारणामुळे शेतकऱ्यांना लाभ दिला जातो .अपघातग्रस्त शेतकऱ्यांना अपघाती मृत्यू झाल्यास दोन लक्ष व अपंगत्व आल्यास एक लाख रुपये लाभ दिला जातो . सदर योजनेत १० ते ७५ वर्षाची अट असून महसूल नोंदीनुसार खातेदार असलेला शेतकरी व वहिती धारक खातेदार म्हणून नोंद नसलेला कोणताही एक सदस्य ( आई- वडील, शेतकऱ्याची पती – पत्नी , मुलगा व अविवाहित मुलगी यापैकी कोणताही एक व्यक्ती ) असे एकूण २ जणांना या योजनेचा लाभ देता येतो . अपघातग्रस्त व्यक्तीचा परिपूर्ण कागदपत्रासह प्रस्ताव ३० दिवसाच्या आत तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे सादर करावा लागतो . अधिक माहिती करिता कृषी विभागाच्या सर्व क्षेत्रीय अधिकारी , कर्मचारी कृषी पर्यवेक्षक , कृषि सहाय्यक यांच्याशी संपर्क केल्यास ते कुटुंबाच्या वारसदाराला मार्गदर्शन करतील असे आवाहन बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , तालुका कृषी अधिकारी अशोक साळी यांनी केले आहे .

सध्या प्रशिक्षणासाठी गेलेले जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी वेळोवेळी आढावा घेतल्यामुळे , जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी , तत्कालीन तहसीलदार तसेच तालुका कृषी अधिकारी यांनी वेळोवेळी प्रस्ताव सादर केल्यामुळे व त्यावर निर्णय घेतल्यामुळे सन २०२३-२४ या कालावधीत ५१ प्रस्तावा पैकी ३८ प्रकरणे मंजूर झालेली असल्याचे तालुका कृषी अधिकारी, बीड श्री.ए.व्ही. साळी व सदर कामकाज पाहणाऱ्या सीमा अस्वले यांनी सांगितले .

# पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांची मंत्रीपदी नियुक्ती झाल्याबद्दल माजलगाव येथे आनंदोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१६ डिसेंबर**

लोकनेत्या नामदार पकंजा गोपीनाथ मुंडे व धनंजय मुंडे यांची मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल माजलगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे तोफा, फटाके वाजउण , भारतीय जनता पार्टी महायुतीचा विजय असो , देवेंद्रजी फडणवीस तुम आगे बढो, पंकजा मुंडे, धनंजय मुंडे तुम आगे बढो हम तुम्हारे साथ अशा विविध घोषणा देत उपस्थित भाजपाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी आनंद उत्सव साजरा केला.



२०१९ नंतर लोकनेत्या पंकजा मुंडे ह्या मंत्री झाल्यामुळे सर्व कार्यकर्त्यांच्या मनामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले , येणाऱ्या काळात बीड जिल्ह्यात भरघोस निधी येईल व विकास होईल , तसेच रेल्वेसह अनेक प्रलंबित प्रश्न सुटतील अशी भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ. प्रशांतजी पाटील भाजपा ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर नाना मेंडके , नगरसेवक विनायक रत्नपारखी , बाबासाहेब आगे, कैलास खुरपे ,, दत्ताजी महाजन, हरिभाऊ नवले, सिद्धू राठोड, दत्ता क्षीरसागर, नारायण मेंडके, ईश्वर खुरपे ,तात्या पांचाळ, रामेश्वर चव्हाण, राम शिंदे, बाळू शिरसागर रवि गायकवाड, ऋषिकेश कुलकर्णी, व सर्व उपस्थित भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते.

# मोटारसायकल चोरांची आंतरजिल्हा टोळी अंबाजोगाईत जेरबंद; १९ मोटारसायकल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१६ डिसेंबर**

गुप्त माहितीच्या आधारे बीड जिल्हा पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने अंबाजोगाईत सापळा लावून मोटारसायकल चोरांच्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश केला. यावेळी चोरट्यांकडून १९ मोटारसायकलसह जवळपास ९ लाख मुद्देमाल जप्त केला.



अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दाखल चोरीच्या गुन्ह्यातील मोटारसायकल वीरसिंग शेरसिंग गोके (रा. सा.बां. कार्यालय जवळ, सदर बाजार रोड, अंबाजोगाई) याने चोरली असून तो चोरीच्या गाड्या विक्री करण्यासाठी चनई रोडवरील सीताफळ संशोधन केंद्राजवळ येणार असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेस मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे पोलीस निरिक्षक उस्मान शेख यांनी त्या परिसरात सापळा रचला. यावेळी पोलिसांना पाहताच पळून जाण्याच्या बेतात असणाऱ्या वीरसिंगला पोलिसांनी पाठलाग करून पकडला. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने घरात लपवलेल्या दहा मोटारसायकल पोलिसांना दाखवल्या. तसेच, त्याने गाडी विकताना फायनान्सची असल्याचे कारण भासवुन कागदपत्र नंतर देतो असे सांगत आठ मोटारसायकल विकल्या होत्या. पोलिसांनी या सर्व १८ मोटारसायकल जप्त केल्या. पोलीस वीरसिंगच्या इतर साथीदारांचा शोध घेत आहेत. ही कारवाई एलसीबीचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली, पीएसआय सुशांत सुतळे, पोलीस कर्मचारी मारुती कांबळे, बाळकृष्ण जायभाये, विकास राठोड, विष्णु सानप, देविदास जमदाडे, निलेश ठाकुर, मच्छिंद्र बीडकर, सचिन आंधळे, अश्विनकुमार सुरवसे व चालक नितीन वडमारे यांनी केली.

# भाशिप्र कर्मणेवाधिकारस्ते चे कौतुक आणि अभिमान

आज ११डिसेंबर ,मोक्षदा एकादशी,गीता जयंतीच्या निमित्ताने बीडच्या सावरकर शैक्षणिक संकुलातील प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयात देखील भगवद्गीता मुखवर्गत करून विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी सर्वांनी बारावा अध्याय सामूहिक पठण सादरीकरण करून एका पुस्तकाचा जन्मोत्सव साजरा करणे हे खूपच मोठं वेगळेपण, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे एक वैशिष्ट्यपूर्ण कार्य म्हणावे लागते .भगवद्गीता हा धर्मग्रंथ म्हणजेच राष्ट्रग्रंर्थ म्हणून देखील गौरवला जातोआहे.

केवळ पाठांतर नाही तर सुंदर जीवन जगण्यासाठी चे योग्य कर्म काय आहे ?ते का आणि कसे करावे? जे भगवंतांनी अर्जुनाची संभ्रमित अवस्था दूर करण्यासाठी म्हणून दिलेले ज्ञान, म्हणजेच भगवद्गीता प्रत्येकाच्या जीवनात खूप मार्गदर्शक उपयुक्त आहे याचे धडे अभ्यासक्रमातील शिक्षणाबरोबर रुजवणे हा खूप मोठा मौलिक संस्कार दिला जातो आहे .

परीक्षेत मोठे यश मिळवण्यासाठी त्या -त्या विषयातील संभ्रम दूर करण्यासाठी म्हणून विषय शिक्षक वेळोवेळी ज्ञान देण्यासाठी तत्पर असतात. मुलं -विद्यार्थी शाळा, महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून जीवनप्रवासात धर्मग्रंथ, पुस्तके मोठं काम करतात, सर्वांचा सार ज्या भगवद्गीतेत आहे त्याचे धडे बाल वयातच आत्मसात केले तर जीवनात कधीही संभ्रमावस्था येणार नाही, असा उत्तम माणूस, सुजाण नागरिक घडवण्यासाठी विद्यार्थी अवस्थेतच ज्ञानामृत देणारी संस्था म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आणि या मालेतील शिक्षक बंधू बघिनी ,शासन ,प्रशासन मंडळाचे खूप कौतुक आणि अभिमान सर्वांनाच आहे तो आज माझ्या मनातही दाटला.

संस्था, संघटना, मोठंकार्य असो की एकत्रित कुटुंब हे यशस्वी होण्यासाठी कार्यकर्त्यांची एक साखळी आणि स्वयंसेवकत्वाचे गुण अंगी कायम




राहिला पाहिजेत तेव्हा ते सर्व यशस्वी होते ,परंतु सत्ता, अधिकार मी पण एकाच्याही मनात आला की ती साखळी कमकुवत होऊ लागते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना म्हणून ,एक देशप्रेमींचे कुटुंब म्हणून जे मोठे कार्य हाती घेऊन यशस्वी करते आहे त्यामागे स्वयंसेवक या वृत्तीचा धाग्याची मजबूत गुंफण घातलेली आहे, हा पुष्पहार भारत मातेच्या पूजेसाठीच आहे हा स्वभाव प्रत्येकाचा आहे. म्हणून शंभरावे वर्षाची यशस्वी वाटचाल सुरू आहे, या पुष्पमालेत आपल्याला राहता येईल का? यासाठी विविध संस्था, संघटना ,सेवा प्रकल्प देशभर कार्यरत आहेत, याच मालेतील मराठवाड्यात शिक्षण क्षेत्रात काही योगदान, काही कार्य करण्याचा संकल्प शिक्षण प्रेमी स्वयंसेवकांनी ७५ वर्षांपूर्वी अंबाजोगाई या छोट्याशा गावातून केला आणि संपूर्ण मराठवाड्यावर लक्षवेधी शिक्षण क्षेत्रात काम उभं राहिलं आहे ते भारतीय शिक्षण प्रसारक संस्था या नावाने.

हजारो नव्हे तर लाखो विद्यार्थी, देशाची पिढी, एक उत्तम माणूस, सुजाण नागरिक म्हणून घडवण्याचे काम होते आहे. संस्था म्हटलं की घटनेप्रमाणे ती एका साखळीत बांधलेली असते त्याप्रमाणे संचालक,अध्यक्ष, कार्यवाह, पदाधिकारी, प्रशासन, कार्यकर्ते सभासद याची गुंफण आहे. संस्था अमृत महोत्सवी वाटचाल करत असताना बाहेरून न दिसणारी ही गुंफण खूप छान विणलेली आहे, त्यामागे केवळ स्वयंसेवक हा एक मजबूत रेशीम धागा आहे, तो धागा दिसणार नाही एवढी घट्ट वीण ठेवणारे संस्थेचे पदाधिकारी, प्रशासन आणि मार्गदर्शक मंडळ सर्वांना घट्ट जोडून ठेवण्याचे कुशल कार्य करत असतात. या पुष्पमालेत राहण्यासाठी पहिले सूई तून धाग्यात येण्यासाठी ज्याप्रमाणे टोचून घ्यावे लागते ,आणि जोपर्यंत आपली शोभा आहे -कर्तुत्व आहे तोपर्यंत इथे राहायचे आणि निर्माल्याप्रमाणे बाहेर पडत नव्या शोभवंत- कर्तुत्व संपन्नतेला जागा करून द्यायची ही पुष्प माला कायम प्रफुल्लित राहण्यासाठी चे अनमोल योगदान देणारी आता चौथी पिढी समोर येते आहे. राष्ट्रासाठी शिक्षण आणि त्या शिक्षण व्रताचा प्रसार करण्यासाठी भारतीय शिक्षण प्रसारक मंडळ ही भावना खरोखरच अनमोल आहे.या भारत मातेच्या पूजेसाठीच्या पुष्पमालेत भारतीय शिक्षण प्रसारक संस्था सदैव प्रफुल्लित राहून सेवार्थ राहते आहे,हा कर्मणेवाधिकारस्ते गुण असाच विकसित होत राहावा...

प्रमोद कुलकर्णी (पत्रकार),
अध्यक्ष : शालेय समिती, सावरकर विद्यालय, बीड.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. १७ डिसेंबर २०२४



# स्थलांतरित ऊसतोड मजुरांच्या ५२ मुलांनी धरला शाळेचा रस्ता

## स्थलांतरित विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी बालरक्षक पथकाच्या प्रयत्नांना यश

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.१६ डिसेंबर - तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची बालरक्षक टीम ऊसतोड मजुरांच्या स्थलांतरित मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करत असून दि. १५ डिसेंबर रविवार रोजी सायंकाळी कोपरगाव येथील संजीवनी सहकारी साखर कारखाना ऊसतोडणी परीक्षेत्रात सह बारामती सहकारी साखर कारखाना , अहिल्यानगर जिल्हातील काष्टी ,श्रीगोंदा, बाबळेश्वर , सुपे तसेच सातारा जिल्हातील फलटण येथे जाऊन कन्नड तालुक्यातील पालकांचे व विद्यार्थ्यांचे मनोबल वाढून त्यांना परत शाळेत आणण्यासाठी प्रवृत्त केल्याने ऊसतोडी साठी गेलेल्या विद्यार्थ्यांपैकी तब्बल ५२ विद्यार्थी शाळेत परत आणण्यात या पथकाला यश आले असुन सोमवार रोजी हे विद्यार्थी वेगवेगळ्या शाळेत हजर राहणार आहेत.

या साठी अंबाला शाळेचे शिक्षक कल्याण पवार , हिवरखेडा (गौ.) शाळेचे शिक्षक दिलीप मगर, डी एस राजपूत,किशोर आगळे,ज्ञानेश्वर वाघ,यांनी कामगारांच्या स्थलांतरित मुलांना शाळेत परत आणण्यासाठी ऊसतोड मजुरांची भेट घेतल्या यामध्ये प्रामुख्याने जि. प. शाळा अंबाला,उपळा, गराडा, तांदुळवाडी, वडनेर, मुंडवाडी तांडा,आंबा तांडा,जेहुर तांडा येथील पालकांची समजूत काढून सर्व मुलांना शाळेत परत पाठवण्यासाठी शिक्षकांनी आग्रह धरला या विद्यार्थ्यांना हंगामी वसतिगृहात अथवा नातेवाईकाकडे मुलांना ठेवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. मुलांना शाळेत पाठवण्याचे व शिक्षणात खंड न पडू देण्याचे आश्वासन यावेळी पालकांनी दिले. या साठी जिल्ह्याशिक्षणाधिकारी (प्राथ.) जयश्री चव्हाण, गटशिक्षणाधिकारी नीता श्रीश्रीमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बालरक्षक टीम, ऊसतोडणी कामगारांच्या राज्यभरात स्थलांतरित झालेल्या मुलांना शाळेत परत आणण्यासाठी प्रयत्न करत आहे.



सोयगाव शहरात संध्या थंडीचा जोर जास्त जाणवत आहे.तर सोयगाव शहरातील कृषी भूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी अरुण सोहणी यांची हिरवगार भरलेला गहू छायाचित्रात दिसत आहे.

(छायाचित्र - विवेक महाजन,सोयगाव)

## मराठवाड्यासह राज्यात पुरेशी सरकारी; सोयाबीन खरेदी केंद्रे सुरू करा

### किसान सभेची मागणी

छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यासह राज्यातील खरिपाचे महत्त्वाचे पीक असलेल्या सोयाबीनला सरकारच्या धोरणामुळे आधार भावापेक्षाही कमी भाव मिळत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची मते मिळावीत यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले सरकार सोयाबीनला ६ हजार रुपये भाव देईल, अशी घोषणा केली होती. सोयाबीन खरेदीसाठीचा मॉईश्चर निकष सुद्धा १५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याची घोषणा करण्यात आली होती. तत्पूर्वी 'मोदी की गॅरंटी' म्हणून जाहीर करण्यात आलेल्या हमीभावाप्रमाणे सोयाबीनला ४ हजार ८९२ रुपये प्रतिक्विंटल भाव देण्याचे जाहीर करण्यात आले होते.

प्रत्यक्षात मात्र या कोणत्याही आश्वासनाची पूर्तता करण्यात न आल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष खदखदतो आहे. केंद्र व राज्य सरकारने तातडीने याबाबत हस्तक्षेप करून दिलेला शब्द पाळावा व किमान ६ हजार रुपये प्रतिक्विंटल प्रमाणे १५ टक्के मॉइश्चर असलेले सोयाबीन खरेदी करणारी केंद्रे प्रत्येक बाजार समितीत सुरू करावीत, अशी मागणी किसान सभेच्या वतीने करण्यात आली आहे. काही ठिकाणी हमीभावाप्रमाणे सोयाबीन खरेदीची केंद्रे सुरू करण्यात आली असली तरी सर्व बाजार समित्यांवर ही केंद्रे नसल्यामुळे शेतकऱ्यांना हमीभाव केंद्रावर सोयाबीन वाहून नेण्यासाठी मोठा खर्च होत आहे. वाहतुकीचा खर्च न परवडल्यामुळे शेतकरी आपले सोयाबीन खासगी व्यापाऱ्यांना ४ हजार रुपये प्रतिक्विंटल प्रमाणे विकत आहेत.

## स्वामी समर्थ केंद्रात दत्त जयंती साजरी

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.१५ डिसेंबर - स्वामी सेवा अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र कन्नड येथे दत्त जयंती साजरी करण्यात आली.

दि.१५ डिसेंबर रोजी सूर्योदयापासून पोर्णिमाला सुरुवात झाल्याने दिंडोरी प्रणित सर्व स्वामी समर्थ केंद्र येथे रविवारी १२ वा. दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी आमदार संजना जाधव यांच्या हस्ते दत्त महाराज व श्री स्वामी समर्थ प्रतिमेची आरती करण्यात आली.

सोमवार पासून सुरुवात झालेल्या या सात दिवसीय सप्ताहात अखंड नाम, जप, यज्ञ गणेश याग, मनोबोध याग, चंडी याग, स्वामी याग, रुद्र याग मल्हारी याग असे यागाचे आयोजन करण्यात येऊन गुरुचरित्र पारायण करण्यात आले यात २४० महिला व ३६ पुरुष सेवेकरींनी सहभाग घेतला होता तसेच दि.१६ डिसेंबर सोमवार रोजी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे, या साठी केंद्र प्रतिनिधी रामकृष्ण मराठे , संजय शिरसागर, कल्याण चव्हाण, गणेश वाघ, गणेश शेजवळ ,नितीन लोंढे महिला प्रतिनिधी मीनाक्षी चव्हाण यांच्यासह सेवेकरी परिश्रम घेत आहे.



## देशमुख हत्येतील आरोपींना कठोर शिक्षा द्यावी यासाठी तहसीलदार यांना निवेदन

तभा वृत्तसेवा

पैठण दि १६ : केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच आणि मराठा सेवक संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूरपणे हत्या झाली. हा मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या चळवळीवर आघात आहे. हा चळवळीचा आवाज दाबण्याचा प्रयत्न असून, या प्रकरणातील दोषीवर कठोरात कठोर कारवाई करावी अशा मागणीचे निवेदन मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने पैठण तहसीलदार सारंग चव्हाण यांना देण्यात आले आहे.



यावेळी अखंड मराठा समाजाचे संतोष तांबे , अनिल राऊत, पवन शिसोदे, माऊली मुळे, साईनाथ कर्डिले, किशोर सदावर्ते, गणेश पवार, सुभाष नवथर, प्रशांत देशमुख, आशिष औटे, एकनाथ भाकरे, तुषार नाटकर, सोमनाथ बोबडे, जिजासाहेब रोडे, शामराव येवले, ऋषिकेश बोबडे, किरण शिंदे, शेखर देशमुख, नीरज पापुलवार, बाळासाहेब माने, महेश पवार, नवनाथ गोरे, हरीपंडित नवथर, नानासाहेब शेंबडे, अमोल सपकाळ, अरुण काळे, नारायण किरडे, रोहन भुमरे, संभाजी काटे, रवींद्र आमले, जिजा आवटे, अनिल निवारे, दत्तात्रय निवारे, संतोष काळे, महेश दसपुते,महादेव मापारी, जिजा कर्डिले, भरत शेळके, सोमनाथ बल्लाळ, विजय खाटीक, बाळासाहेब पठाडे, विशाल काळे, उद्धव लोहगळे, विजय कर्डिले, पिंटू आरगडे, रामकिसन सकुंडे, भगवान जाधव, शंकर निवारे, विठ्ठल जाधव, बी जगताप, लक्ष्मण बोडले, अंकुश काळे, आदी उपस्थित होते.

## वाळूज रोडवरील पेट्रोलपंपाला ९९ लाखांच्या दंडाची नोटीस

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : नगर रोडवरील नवीन होणार्या पेट्रोलपंपाच्या मालकाने विना रॉयल्टी मुरुम भरती केल्याचे आढळून येताच महसूल विभागाच्यावतीने पंपचालक मालक दिगंबर धर्मा गायकवाड यांना ९९ लाखांचा दंडांची नोटीस बजावत कागदपत्रे सादर करण्याबाबत कळविले आहे. याविषयी अधिक माहिती अशी की, वाळूज-नगर रोडवर बजाज कंपनीच्या गेटसमोर भारत पेट्रोलपंपाचे नवीन काम गट नं.१४४ वळदगाव हद्दीत सुरू आहे. हा पंप तयार करताना पंप मालक दिगंबर धर्मा गायकवाड यांनी विना परवानगी १५०० ब्रास मुरुमची भरती टाकल्याचे तक्रारदार विनोद वाकोडे यांनी अप्पर तहसीलदार यांना निवेदनद्वारे निदर्शनास आणून दिले होते, याप्रकरणी तहसीलदारांनी चौकशी करत संबंधित भारत पंपाचे मालक दिगंबर धर्मा गायकवाड यांना नोटीस बजावत कागदपत्रे सादर करण्याबाबत कळविले असून, ९९ लाखांचा दंड ठोठावला आहे. या संदर्भात पेट्रोलपंपाचे व्यवस्थापक दयानंद तिगोटे यांना संपर्क साधला असता, त्यांनी सांगितले की, महसूल विभाग आम्हाला जाणून-बुजून त्रास देत आहेत, आम्ही सर्व कामे कायदेशीरपणे केलेली आहेत. त्यामुळे संबंधित विभागाने कोणत्या अनुषंगाने नोटीस बजावली हे मला पहायचे आहे, या संदर्भात मी अॅट्रॉसीटी अॅक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया करणार आहे. सध्या तरी महसूल विभागाच्यावतीने बजावण्यात आलेली नोटिस आम्हाला मिळाली नाही, नोटीस आल्यावर कायदेशीररित्या उत्तर देणार असल्याचे तरुण भारत शी बोलताना सांगितले.

## मराठा समाजाचा वधु-वर परिचय मेळावा यशस्वी करण्याचा निर्धार

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

येथील प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संचलित मराठा सोयरिक ग्रुपच्या वतीने येत्या २९ डिसेंबर रोजी मराठा समाजातील वधु-वरांचा मोफत परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा यशस्वी करण्याचा निर्धार रविवारी, १५ डिसेंबर रोजी कॅनॉट प्लेस येथे आयोजित एका बैठकीत करण्यात आला.

सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब पाटील काळे यांच्या अध्यक्षतेखाली कॅनॉट प्लेस येथील त्यांच्या कार्यालयात मराठा समाज वधु- वर परिचय मेळावासंदर्भात बैठक घेण्यात आली. यावेळी मेळाव्याची रूपरेषा



ठरविण्यात आली. त्यानुसार प्रत्येक तालुक्यांत कार्यकर्ते नेमणे त्यांच्यामार्फत मेळाव्याची माहिती लोकांपर्यंत पोहोचविणे, कार्यक्रमासाठी आलेल्यांसाठी भोजनाची व्यवस्था करणे, शक्य तेवढे बॅनर व पॉम्प्लेट लावणे व ते प्रसारित करणे यावर सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्यात आला.

मेळावा यशस्वी करण्यासाठी मराठा समाजातील वधु-वरांनी अधिकाधिक बायोडाटा मराठा सोयरिक ग्रुपवर टाकावे. जेणेकरून ते लोकांपर्यंत पोहोचतील. या मेळाव्यात वधु-वरांचे सामुहिक विवाह लावण्याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. मेळाव्यात जेवण देण्याचेही ठरले.

यावेळी मेळावा आयोजक प्रमुख पोपटराव पाटील सपकाळ, जगन्नाथ प्रांजे, वसंतराव औटे, मनोहर वडजे, श्रीमंत उकिर्डे पाटील, डॉ. संतोष हरणे, प्रभाकर गायकवाड, देवानंद गरड यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आर्य चाणक्य मध्ये बँकिंग कार्यशाळा संपन्न

तभा वृत्तसेवा

पैठण दि १६ :- आर्य चाणक्य प्रा, विद्या मंदिरा मध्ये इयत्ता ६ वी व ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी बँकीग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते .या कार्यशाळेचे अध्यक्ष भास्कर कुलकर्णी तर प्रमुख मार्गदर्शिका कुमारी नेहा पैठणकर या होत्या. मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन करून कार्यशाळेची सुरूवात करण्यात आली .



प्रमुख मार्गदर्शिका नेहा यांनी विद्यार्थ्यांना बँक म्हणजे काय? बँकेत खाते कसे उघडावे? बचतखाते व चालू खाते म्हणजे ? आर,टी,जी,एस म्हणजे काय? ठेवीचे विविध प्रकार, कर्जाचे प्रकार व त्यावर आकारले जाणारे व्याज डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, पासबुक ,चेक,केवायसी याविषयी प्रात्यक्षिका सह मार्गदर्शन केले. यात विद्यार्थ्यांना पडलेल्या प्रश्नाविषयी सविस्तर माहिती देवून त्यांच्या शंकाचे निरसन केले . या उपकृमा द्वारे विद्यार्थ्यामध्ये आर्थिक साक्षरता हे मूल्य जोपासण्यात आले व विद्यर्थ्याच्या मनातील बँकेविषयी असलेली भिती दूर करण्यात आली.

सदरील कार्यक्रम गणित मंडळा अंतर्गत राखी धोकटे तसेच शुभांगी सदावर्ते यांनी घेतला तर बाळू लाड, धीरज हंडरगुळे व शिखा शहा यांनी यासाठी सहकार्य केले.

## कापूस उत्पादकता वाढीसाठी पंचसूत्रीचा वापर आवश्यक : वाय. जे. प्रसाद यांचा सल्ला

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

भारताच्या एकूण क्षेत्रफळापैकी २५ टक्के कापसाचे क्षेत्र महाराष्ट्रात आहे. परंतु, देशाच्या तुलनेत आपल्याकडे कापसाची उत्पादकता कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानात उभट वाढणारे वाण, जमिनीच्या प्रकारानुसार वाणांची निवड, घन लागवड, सघन लागवड, वाढनियंत्रकाचा वापर, एकात्मिक खत, तण व पीक संरक्षण या पंचसूत्रीचा वापर करावा, असे प्रतिपादन केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे संचालक



वाय. जी. प्रसाद यांनी येथे केले.

एमजीएमच्या गांधेली येथील कृषी विज्ञान केंद्रात विशेष कापूस प्रकल्पअंतर्गत 'उत्तम कापूस व्यवस्थापन' कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचे संचालक वाय. जी. प्रसाद यांनी उद्घाटन केले. 'शेंदरी बोंडअळीच्या व्यवस्थापनासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून कामगंध सापळा तयार केला आहे. पंजाब राज्यात १८ शेतकऱ्यांच्या शेतावर या तंत्रज्ञानाचे प्रयोग सुरू आहेत. लवकरच हे तंत्रज्ञान महाराष्ट्रात येईल, असे प्रसाद म्हणाले.

यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी अश्विनी पठारे, डॉ. के. ए. धापके यांची प्रमुख उपस्थिती होती. अशोक ठोकळ व यज्ञेश कातबने या युवा शेतकऱ्यांचा केंद्र सरकारचा मिलेनियन फार्मर्स वार्ड मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. प्रल्हाद खैरनार करंजगाव (ता. वैजापूर) या शेतकऱ्याने घन पद्धतीने लागवड केलेल्या कापूस व पंढरीनाथ काचोळे, जवखेडा (ता. कन्नड) या शेतकऱ्याने दादा लाड तंत्रज्ञानाने घेतलेल्या कापूस पिकाबद्दल माहिती दिली.

'उत्तम कापूस व्यवस्थापन' तंत्रज्ञानावर काकासाहेब सुकासे, कापूस पिकातील एकात्मिक कीड व्यवस्थापन यावर डॉ. पी. एस. जोशी, डॉ. अजय मिटकरी, पी. बी. धागा यांनी मार्गदर्शन केले. स्वप्नील वाघ यांनी सूत्रसंचालन, तर काकासाहेब सुकासे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आपल्या जीवनात पुण्यवंत व पुण्यवान व्हायचे असेल तर साधू संतांच्या, विचाराच्या आदर्शावर जीवन जगा कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही : अरुणात गिरीजी महाराज

तभा वृतसेवा

खुलताबाद प्रतिनिधी .समाजात दिवसेंदिवस व्यसनाधीनता, गैरमार्ग, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि व असामाजिक तत्त्वांचा वापर वाढला आहे. यामुळे समाजाचे दिवसेंदिवस अध:पतन होत आहे. आज संस्कारक्षम मुलगा मिळणे कठीण होऊन बसलेले आहे. प्रत्येक माता-पित्याने आपल्या मुलांना चांगले संस्कार द्यावे. त्यांची असंगतांशी संगत होऊ देऊ नये. देव देश धर्म याची शिकवण आपल्या मुलांना द्यावी जेणेकरून समाजात आदर्श व्यक्ती निर्माण होतील. तसेच आदर्श व संस्कारक्षम मुलांनाच मुलगी द्यावी जेणेकरून आदर्श समाज घडेल. असे सद्गुरु अक्काताई महाराज



यांच्या ४० व्या अखंड हरिनाम सप्ताह च्या श्रीक्षेत्र आडगाव खुर्द तालुका छत्रपती संभाजीनगर येथे काल्याचे कीर्तनादरम्यान आपल्या मधुर वाणीतून .भामाठाण येथील अडबंगनाथ संस्थान प्रमुख अरुणा गिरीजी महाराज यानी आलेल्या भक्तांना म्हटले.

तसेच काल्याचे कीर्तन ह.भ.प. स्वामी अरूननाथगिरीजी महाराज यांनी या जगतामध्ये सुखाची अपेक्षा सर्वांना आहे, सर्व सुखासाठी खटाटोप करतायेत परंतु ते सुख आम्हाला प्राप्त करून घ्यायचे असेल तर ते सुख तुकोबाराया सांगतात गोकुळात आहे. त्या सुखाला कुठलही जातीभेद नाही, कुठलाही अंत नाही, कुठलीही सुरुवात नाही ते आविट सुख केवळ आणि केवळ गोकुळात आहे. असे स्वामी अरूननाथगिरीजी महाराज यांनी काल्याच्या कीर्तनाप्रसंगी निरूपण केले. याप्रसंगी नाथ , आश्रम प्रमुख सद्गुरु आक्काताई महाराज. छत्रपती संभाजी नगरचे खासदार संदिपान भुमरे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती

श्रीक्षेत्र आडगाव खुर्द येथे दिनांक ११ ते १५ डिसेंबर पर्यंत अखंड हरिनाम फिरता नारळी सप्ताह सद्गुरु अक्काताई महाराज यांच्या आशीर्वादाने आणि प्रमुख उपस्थितीमध्ये ,खु आडगाव, ठोंबरे .ग्रामस्थ यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी काल्याचे कीर्तन ह.भ.प. स्वामी अरूननाथगिरीजी महाराज यांच्या अमृतवाणी वाणीतून झाले. तर काल्याचा महाप्रसाद खा. संदीपान भूमरे यांच्या वतीने देण्यात आला. यावेळी सप्ताहमध्ये हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.

### कोणत्याही क्षेत्रात सातत्य, संयम टिकवून ठेवल्यास यश हमखास : रोहित देशमुख

## 'युगंधर' च्या कला महोत्सव उत्साहात

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

कोणत्याही क्षेत्रात सातत्य आणि संयम टिकवून ठेवल्यास निश्चित यश मिळते. त्यामुळे आपल्याला जे योग्य वाटते, त्या क्षेत्रात समर्पण वृत्तीने काम करावे. विज्ञान शाखेत शिकूनही कला क्षेत्राचे आकर्षण वाटले आणि आता नाटक, मालिकांमध्ये स्थिरावलो आहे, असे प्रतिपादन अभिनेता रोहित देशमुख यांनी रविवारी, १५ डिसेंबर रोजी येथे केले.

युगंधरा मराठी साहित्य, कला व सांस्कृतिक प्रतिष्ठान, युगंधरा प्रकाशन यांच्या वतीने पुस्तक प्रकाशन सोहळा आणि साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. हॉटेल एमएच-२० मध्ये रविवारी झालेल्या कार्यक्रमाला अभिनेते रोहित देशमुख, ज्येष्ठ पत्रकार अरुणकुमार मुंदडा, समरता साहित्य परिषधेचे कार्यवाह नरेंद्र निकुंभ, नाट्य दिग्दर्शक सतीश इंदापूरकर आणि संमेलनाध्यक्ष अरुण देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

साहित्य आणि पत्रकारिता एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोघांनी सक्षमतेने समाजाची बाजू मांडल्यास आशादायक चित्र निर्माण होईल. सकारात्मक वातावरण तयार करण्यात साहित्याचा मोठा वाटा आहे. पूर्वीसारख्या कादंबऱ्यांची लोकप्रियता आता दिसत नाही. मराठी वाचक पुस्तकांककडे वळविण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे, असे अरुणकुमार मुंदडा म्हणाले.

२१ पुस्तकांचे प्रकाशन

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते 'प्रित ही बावरी', 'इको ऑफ सायलेन्स', 'निमेश', 'काव्यशिल्प', 'स्वची ओळख' अशा २१ पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर साहित्य, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रांतील योगदानासाठी मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या संमेलनात छत्रपती संभाजी नगर सह मुंबई, पुणे, नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, अमळनेर, चाळीसगाव, अकोला, अमरावती अशा राज्यातील विविध भागातील रसिक सहभागी झाले होते. सुनिता कावसनकर यांनी प्रास्ताविक केले. प्रवीणा कन्नडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

## शेख रियाज ची केंद्रीय राखीव पोलीस दलात निवड



**आदमपूर**-देगलूर तालुक्यातील ग्राम तमलूर येथील मूळचा रहिवासी सद्यस्थितीत आदमपूर येथे आजी आजोबांकडे शिकायला असणाऱ्या शेख रियाज रज्जाकसाब या होतकरू तरूणाची केंद्रीय राखीव पोलीस दल अंतर्गत ट्रेड्समन पदी थेट निवड झाली आहे. केंद्रीय राखीव पोलीस दलाचा सन २०२३ सालातील परीक्षेचा अंतिम निकाल नुकताच जाहीर झाला आहे. भारतीय सैन्यांमधील केंद्रीय राखीव पोलीस दलातील ट्रेड्समन पदाच्या निवडीबद्दल आदमपूर,तमलूर नगरीतील प्रतिष्ठित गावकरी,पदाधिकारी,मित्र परिवार यांनी रियाजचे अभिनंदन केले आहे.जामा-मस्जिद आदमपूर चे विद्यमान अध्यक्ष अहेमदसाब पठाण यांच्या मुलीचे ते सुपूत्र होत. सदरील निवडीने परिसरातील नव तरूण सैन्य भरतीकडे वळतील असे दै.तरूण भारत वृत्तपत्र प्रतिनिधींशी सद्गदित तो बोलत होता.

## श्रीराम चिगळेची केंद्रीय राखीव पोलीस दलात निवड



**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील सर्वसामान्य कुटुंबातील तरूण श्रीराम धोंडिबा चिगळे याची भारतीय सैन्यांमधील केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) अंतर्गत ट्रेड्समन पदी परीक्षेतून थेट निवड झाली आहे. सीआरपीएफ मधील विविध पदांचा नुकताच अंतिम निकाल लागला आहे. सीआरपीएफ या दलात निवड होणारा हा गावातील पहिलाच तरूण आहे. येथील विमलबाई चिगळे व धोंडिबा चिगळे हे अल्पभूधारक सामान्य शेतमजूर, शेतकरी कुटुंब आहे. त्यांच्या कुटुंबात आई, वडील, दोन बहीणी आणि हा एकुलता मुलगा आहे. या यशाबद्दल आई, वडील, आजी माजी ग्रामपंचायत पदाधिकारी, सहशिक्षक, व्यावसायिक, व्यापारी, गावातील प्रतिष्ठित नागरिक, मित्रांनी श्रीरामचे अभिनंदन केले आहे. देशाच्या सेवेत अधिकाधिक तरूणांनी सहभाग नोंदवावा, असेही दै.तरूण भारत वृत्तपत्र प्रतिनिधींशी श्रीरामने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

## मातृह्दयी शिक्षक साने गुरुजी या विषयावर हेरंब कुलकर्णी यांचे व्याख्यान संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १६ डिसेंबर**

स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड तालुका मुदखेड जिल्हा नांदेड व शिक्षण विभाग पंचायत समिती मुदखेड आयोजित 'मातृऱ्हदयी शिक्षक साने गुरुजी' या विषयावर हेरंब कुलकर्णी यांचे व्याख्यान संपन्न झाले.

साने गुरुजी यांच्या १२५ व्या जयंती निमित्त शिक्षणतज्ञ व सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांनी शंभर व्याख्यानाचे महाराष्ट्रभर आयोजन करण्याचा निश्चय केला त्याचाच एक धागा म्हणून आज श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय व स्वातंत्र्य सेनानी राजारामबापू माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणामध्ये स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड व शिक्षण विभाग पंचायत समिती मुदखेड यांच्या संयुक्त विद्यमाने मातृह्दयी साने गुरुजी या विषयावर व्याख्यान आयोजित केलेलं होतं याप्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून हेरंब कुलकर्णी तर कार्यक्रमाचे अध्यक्ष रुस्तुम आडे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती मुदखेड, प्रमुख पाहुणे व्यंकटेश चौधरी शिक्षण अधिकारी महानगरपालिका नांदेड, सुरेश पाटील शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती मुदखेड हे व्यासपीठावर उपस्थित होते याप्रसंगी स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संजयराव देशमुख बारडकर व सर्व संचालक मंडळ तथा तालुक्यामधून मोठ्या प्रमाणामध्ये शिक्षकांची उपस्थिती होती. हेरंब कुलकर्णी यांनी साने गुरुजी यांच्यावरती प्रकाश टाकताना साने गुरुजी याचे मातृह्दय उलगडताना त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला त्यांचे साहित्यिक योगदान शैक्षणिक योगदान सामाजिक योगदान अतिशय सुंदर रित्या शिक्षकांसमोर उघडून दाखवले व सर्वांना मंत्रमुग्ध केले.


## तीसगाव-वडगाव रोडवर अवैध दारू विक्री

त.भा. दि. १६

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : तीसगाव-वडगाव रोडवर हॉटेलच्या आडून दारू विक्री आणि दारू पिण्याची व्यवस्था केली जात असल्याने सामान्य नागरिक व कामगारांना या दारुड्यांचा नाहक त्रास होत आहे. तिसगाव- वडगाव हा रस्ता कामगारांचा येण्या जाण्याचा मार्ग आहे. अनेकदा रस्त्यावर उभे राहून हे दारुडे धिंगाणा करतात, त्यांना समजावून सांगायला जाणार्या कामगारांसोबत भांडण करतात. त्यामुळे पोलिसांनी तात्काळ या संबंधित हॉटेलवर कारवाई करून दारू विक्री बंद करून पिण्याच्या व्यवस्था करणार्या या हॉटेलवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## प्रा.डॉ.दिलीप बिरुटे यांची दुसऱ्यांदा मसापच्या कार्यकारणीवर निमंत्रित सदस्य म्हणून निवड

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१६ डिसेंबर



मराठवाडा साहित्य परिषद,छत्रपती संभाजीनगर येथे कार्यकारिणीच्या नवनिर्वाचित सदस्यांची पहिल्या बैठकीत मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीने, प्रा.डॉ.दिलीप बिरुटे यांची दुस-यांदा मसाप कार्यकरणीवर निमंत्रित सदस्य व कार्यक्रम समिती सदस्य म्हणूनही निवड केली आहे.प्रा.डॉ.दिलीप बिरुटे,लेखक,समीक्षक,ब्लॉग लेखक,आंतरजालावर विविध विषयावर लेखन करणारे लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळावर ते सदस्य आहेत.तिफण वाचक चळवळीच्या राज्य अध्यक्ष असून,मराठी साहित्य विषयावर विविध शोध निबंध,तसेच विविध परिसंवादात त्यांचा सहभाग राहिला आहे. जागतिकीकरण आणि मराठी साहित्य हा त्यांचा ग्रन्थ प्रकाशित आहे.

मराठवाडा साहित्य परिषद,छत्रपती संभाजीनगर ही मराठवाड्यातीलच नव्हे तर,महाराष्ट्रातील नावलैकिक असलेली साहित्य संस्था आहे,कवी,लेखकांना प्रोत्साहन मिळावे व साहित्य चळवळ ग्रामीण भागात खोलवर रुजावी म्हणून मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने अनेक साहित्यिक उपक्रमांबरोबरच साहित्य संमेलने,मराठवाडा लेखिका साहित्य संमेलने व ग्रामीण साहित्य संमेलनेही भरवते.प्रा.डॉ.दिलीप बिरुटे सरांच्या निवडीने गंगापुर तालुक्यातील नव-कवी लेखकांना संधी मिळेल अशी अपेक्षा गंगापुर तालुक्यातील साहित्य रसिकाकडून व्यक्त केली जात आहे,त्यांच्या निवडीबद्दल अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,प्रकाश काळे,गंगापुरचे संजय जाधव,डॉ.महेंद्र बाप्ते,भाऊसाहेब शेंगुळे,आबासाहेब शिरसाठ आदि साहित्य रसिकांनी त्यांच्या निवडीचे स्वागत केले आहे.

## यजमान 'स्वारातीम' नांदेड विद्यापीठाची आगेकूच



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १६ डिसेंबर**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडा मैदानावर सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ हॉलीबॉल (पुरुष) स्पर्धेत सलामीच्या सामन्यात यजमान नांदेड विद्यापीठाच्या संघाने आनंद कृषी विद्यापीठ, आनंद चा ३-० ने धुवा उडवत आगेकूच केली आहे.

दि. १४ डिसेंबर पासून सुरू असलेल्या या आंतर विद्यापीठ हॉलीबॉल (पुरुष) स्पर्धेत ११८ विद्यापीठांनी सहभाग नोंदविला आहे. इनडोअर व आउटडोअर मैदानावर खेळाडू आपले कौशल्य पणाला लावत आहेत. सलामीच्या सामन्यात गुजरातच्या सकलचंद पटेल विद्यापीठाने जयपूरच्या विवेकानंद विद्यापीठाचा ३-० ने पराभव केला. दुसऱ्या सामन्यात अहमदाबादच्या सिल्वरओक विद्यापीठाने कोटा विद्यापीठाचा एकतर्फी पराभव केला. वडोदरा परोल विद्यापीठाने बुंदेलखंड विद्यापीठाचा ३-० असा पराभव केला. वडोदरा विद्यापीठाने जयपूर विद्यापीठाचा, राजकोटच्या मारवाडी विद्यापीठाने पिंदवाडा विद्यापीठाचा ३-० ने पराभव केला. गोवा विद्यापीठाने भोपाळच्या जगरान विद्यापीठाचा एकतर्फी धुव्वा उडविला. भोपाळच्या राजीव गांधी विद्यापीठ, गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठाने तसेच वाफीच्या राजीव श्रॉफ विद्यापीठाने प्रतिस्पर्धीवर मात करत आगेकूच सुरू ठेवली आहे. इनडोअर मैदानावर झालेल्या अटीतटीच्या सामन्यात मुंबई विद्यापीठाने देवी अहिल्या विद्यापीठ इंदोरचा ३-१ ने पराभव केला. चुरशीच्या सामन्यात सरदार पटेल विद्यापीठाने उदयपूरच्या भोपाल विद्यापीठाचा व रवींद्रनाथ टागोर विद्यापीठ भूपालने राजऋषी मत्स्य विद्यापीठ अलवारचा ३-२ ने प्रभाव केला. गुजरात टेक्निकल विद्यापीठ अहमदाबाद, बालाजी विद्यापीठ पुणे व गुजरातच्या चारोधर विद्यापीठाने प्रतिस्पर्धीवर मात करत दुसरी फेरी गाठली आहे. राजकोटच्या सौराष्ट्र विद्यापीठाने अहमदाबादच्या सिल्वरओक विद्यापीठाचा एकतर्फी पराभव केला. वरोदरा परोल विद्यापीठ, अजमेरच्या महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ व गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठाने पुढील फेरी गाठली आहे.

पुणेच्या बालाजी विद्यापीठाने जोधपुर विद्यापीठाचा, गोधरा येथील गोविंद गुरु विद्यापीठाने सरदार पटेल विद्यापीठाचा सरळ ३-० ने पराभव केला. यासह शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, एमआयटी पुणे व संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती या संघांनीही पुढील फेरीत आपला प्रवेश निश्चित केला.

## सुर्यवंशी मृत्यू प्रकरणी : पोलीसी अत्याचाराच्या निषेधार्थ हदगाव बंद

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. १६ डिसेंबर**



परभणी घटनेच्या निषेधार्थ झालेल्या आंदोलनात पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठी हल्ल्यात सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू झाला. पोलीसी अत्याचाराच्या विरोधात सोमवारी हदगावत बंद पुकारण्यात आला. व्यापाऱ्यांनी आपापली प्रतिष्ठान बंद ठेवून शांततेत बंद ठेवून निषेध नोंदवला.

परभणी येथे संविधानाच्या प्रतिकृतीची मोडतोड करुन विटंबना केल्यामुळे आंबेडकरी जनतेने रस्त्यावर उतरून घडलेल्या घटनेचा निषेध केला आंदोलने झाली. यावेळी परभणी पोलिसांनी आंदोलन कर्त्यावर अमानुषपणे लाठीहल्ला केला. यात परभणी येथील सोमनाथ सुर्यवंशी या आंदोलकाचा पोलीसांच्या लाठीहल्लूयात मृत्यू झाला. या घटनेमुळे आंबेडकरी जनता संतप्त झाली असून. पोलीसी अत्याचाराच्या निषेधार्थ सोमवारी बंदची हाक देण्यात आली होती. सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करुन त्यांच्यावर अट्रासिटी कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात यावा व मयताच्या वारसांना अर्थिक मदत करावी अशी मागणीही करण्यात आली असून असे निवेदन हदगाव पोलिसांना देण्यात आले. यावेळी हदगाव पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांनी शहरातील प्रमुख चौकाचौकात कर्मचारी तैनात करून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला त्यामुळे कुठल्याही प्रकारचे गालबोट न लागता शांततेत बंद पाळण्यात आला. दिलेल्या निवेदनावर हिदायत पठाण, संदीप दवणे, विशाल पाईकराव, बबलू गायकवाड, निलेश गिरबीडे, वैभव वाघमारे, आर्यन शिंगारे, भीमराव नरवाडे, रवींद्र गिरबीडे, चंद्रकांत भौरे, सुमेध चौरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मसापच्या वाङ्मयपुरस्कारासाठी ग्रंथ पाठविण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने दरवर्षी उत्कृष्ट ग्रंथांना वाङ्मयपुरस्कार देण्यात येतात. यावर्षी नरहर कुरुंदकर वाङ्मयपुरस्कार, प्राचार्य म. भि. चिटणीस वाङ्मयपुरस्कार, कुमार देशमुख नाट्यपुरस्कार, कै. कुसूमताई देशमुख काव्यपुरस्कार, बी. रघुनाथ कथा कादंबरी, रा. ज. देशमुख स्मृतीपुरस्कार दिले जाणार आहेत. या वर्षीही १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील सर्वोकृष्ट काव्यसंग्रहाला / ग्रंथाला हे पुरस्कार देण्यात येणार आहेत. त्यांचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

(१) नरहर कुरुंदकर वाङ्मयपुरस्कार रुपये ३,०००/- या पुरस्कारासाठी वरील कालावधीत कुठल्याही वाङ्मय प्रकारातील उत्कृष्ट ग्रंथाचा विचार होऊ शकेल. समीक्षा ग्रंथही या पुरस्कारासाठी पाठविता येऊ शकतील. मात्र हा पुरस्कार मराठवाड्यातील लेखकासच मिळेल. प्रकाशक आणि प्रकाशन स्थळ कुठलेही असू शकेल.

(२) प्राचार्य म. भि. चिटणीस वाङ्मयपुरस्कार रुपये ३,०००/- मराठी भाषेत लिहिणाऱ्या कुठल्याही लेखकाला या पुरस्कारासाठी पुस्तक पाठविता येईल. प्रदेशाचे बंधन नाही. हा पुरस्कार वैचारिक लेखनासाठी, सौंदर्यशास्त्रावरील लेखनासाठी अगर समीक्षा ग्रंथासाठी दिला जाणार आहे.

(३) कुमार देशमुख नाट्यपुरस्कार रुपये ३,०००/- मराठी भाषेत लिहिणाऱ्या कुठल्याही नाटककाराला या पुरस्कारासाठी आपले नाटक पाठविता येईल. प्रदेशाचे बंधन नाही. हा पुरस्कार नाट्यलेखन आणि नाट्यसमीक्षा यासाठी दिला जातो.

४) कै. कुसुमताई देशमुख काव्यपुरस्कार रुपये ३,०००/- हा पुरस्कार मराठीतील उत्कृष्ट काव्यसंग्रहाला दिला जातो. प्रदेशाचे बंधन नाही.

(५) बी. रघुनाथ / कथा कादंबरी पुरस्कार रुपये ३,०००/- मराठीतील उत्कृष्ट कथासंग्रहाला किंवा उत्कृष्ट कादंबरीला हापुरस्कार देण्यात येतो. या पुरस्कारासाठीही प्रदेशाचे बंधन नाही.

ज्या लेखकांना, कवींना व प्रकाशकांना वरील पुरस्कारासाठी ग्रंथ पाठवायचे असतील त्यांनी ग्रंथाच्या तीन प्रती १० फेब्रुवारी २०२५ पर्यंत कार्यवाह, मराठवाडा साहित्य परिषद, अनंत भालेराव भवन, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह परिसर, सन्मित्र कॉलनी, छत्रपती संभाजीनगर ४३१००१ या पत्त्यावर पाठवाव्यात ही विनंती.

## बौमा कॉनेक्सपो इंडिया २०२४: भारताच्या पायाभूत सुविधांसाठी नवीन दिशा दर्शवणारे विक्रमी आवृत्ती

पुणे : बौमा कॉनेक्सपो इंडिया २०२४ ने भारताच्या बांधकाम, खाण आणि पायाभूत सुविधांच्या उद्योगांसाठी एक परिवर्तनशील आदर्श स्थापित केला आहे. ११ ते १४ डिसेंबर २०२४ दरम्यान ग्रेटर नोएडामधील इंडिया एक्सपो सेंटर येथे पार पडलेल्या या आवृत्तीनं देशाच्या पायाभूत सुविधा क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.१३५,००० चौरस मीटरपेक्षा अधिक प्रदर्शनी क्षेत्रामध्ये बौमा कॉनेक्सपो इंडिया २०२४ ने अत्याधुनिक नवकल्पना दाखविल्या, ज्यामुळे ८३ देशांमधून ५१,११८ व्यापारी पाहुणे आकर्षित झाले. या व्यापार मेळ्याने ६,२९८ प्रभावी खरेदीदार-विक्रेता बैठका घडविल्या आणि २०,००० पेक्षा जास्त अत्याधुनिक उत्पादने आणि उपायांचा अनावरण केला, ज्यामुळे भारताच्या पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवले. ९८४ प्रदर्शकांच्या सहभागाने हा व्यापार मेला नवकल्पना, सहकार्य आणि दीर्घकालीन विकासासाठी एक सक्रिय मंच तयार केला आणि उत्तर भारतातील सर्वात मोठा बांधकाम व्यापार मेला म्हणून आपली ओळख निर्माण केली. या आकडेवारीतून हे स्पष्ट होते की हा कार्यक्रम भारताच्या पायाभूत सुविधांच्या महत्वाकांक्षांना गती देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे, जे देशाच्या ५ ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेची आकांक्षा पूर्ण करण्याच्या दिशेने आहे.

### उपनिबंधक सहकारी संस्था तालुका गंगापूर यांचे कार्यालय

### जाहीर प्रगटन

उपनिबंधक सहकारी संस्था तालुका गंगापूर या कार्यालयात खालील नियोजित नागरी सहकारी पतसंस्तेची नोंदणी करणेबाबदचा प्रस्ताव या कार्यालयात सादर करण्यांत आलेला आहे

| अ.क्र. | नियोजित संस्थेचे नाव | मुख्य प्रवर्तकाचे नाव | संस्थेचे कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | स्नेहांकित नागरी सहकारी पतसंस्था मर्या वाळूज ता गंगापूर जी छत्रपती संभाजीनगर | श्री धांडे संदीप वसंतराव | गंगापूर तालुका |

नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था विशेष वर्गातील पतसंस्था नोंदणी निकष तसेच कार्यक्षेत्र वाढ व शाखा विस्ताराबाबदचे सुधारित निकष मा सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक जा क्र पतसंस्था / स आं ५/ पतसंस्था नोंदणी निकष / २०१९/५१०/२०१९ दि ०८/०३/२०१९ नुसार परिपत्रकीय सूचना निर्गमित करण्यात आलेल्या असून त्यांची अंमलबजावणी करण्यास नोंदणी नोंदणी अधिकारी तथा संबंधीत उप सहायक निबंधक सहकारी संस्था यांना कळविण्यात आलेले आहे

सदर परिपत्रकीय सूचनेनुसार गंगापूर तालुक्यातील अस्तित्वात असलेल्या सर्व नोंदणीकृत नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था यांना कळविण्यात येते कि वरील पतसंस्थेची नोंदणी करण्यांपूर्वी या संधार्बत कोणत्याही प्रकारे लेखी आक्षेप हरकती दाखल करावयाची असल्यास त्या संबधी आवश्यक त्या पुराव्यानिशी हे जाहीर प्रगटन प्रसिद्धीच्या दिनांकापासून (१५) दिवसात स्वतः अथवा प्रधिकृत प्रतिनिधीमार्फत कार्यालयीन वेळेत दाखल करावेत तसेच विहित मुदतीत कोणत्याही प्रकारे लेखी आक्षेप हरकती दाखल न झाल्यास याबाबत आपल्या पतसंस्थेची वरील पतसंस्थेची नोंदणी करण्यास हरकत नाही असे गृहित धरून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार पुढील योग्य ती कायदेशीर कारवाही करण्यांत येईल याची कृपया आपण नोंद घ्यावी

ठिकाण : गंगापूर
दि :- १६/१२/२०२४

(किरण चौधरी)
तालुका उपनिबंधक
सहकारी संस्था गंगापूर

**संचिका क्र.२०२४/३.वि.अ.वै. एम.ए.जी./ज. मृ. नोंद/सी.आर. ६९७/२०२४**
**दि. : १०/१२/२०२४**

### जाहीर प्रगटन

अर्जदार : श्री/श्रीमती मनिषा मध्छिंद्र मुळे रा. नक्षत्रवाडी चि. छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचाय कार्यालय जिकठाण ता. गंगापूर. जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९५९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११ (२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार स्वतः नामे मनिषा मच्छिंद्र मुळे यांचा जन्म दिनांक ०३/०१/१९८२ रोजी मौजे जिकठाण ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचाय कार्यालय जिकठाण ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे. त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक १०/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक :- १०/१२/२०२४

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

### जाहीर प्रगटन

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे. व्ही.डी. पाटील साहेब) क. स्तर यांचे कोर्टात**

दि. किरकोळ अर्ज क. ३९३/२०२४
पु.ता. ०७/०२/२०२५

अर्जदार-१. श्रीमती. परिगाबाई भ्र.लक्ष्मण मोटे वय-६३ धंदा- घरकाम २. श्री. रविंद्र पि. लक्ष्मण मोटे वय ३७ धंदा-शेती ३. श्री. आजिनाथ पि.लक्ष्मण मोटे वय-३३ धंदा-शेती सर्व रा. हिवरखेडा (ना.) ता. कन्नड जि. औरंगाबाद ४. सौ. वैष्णवी भ्र.विजय आधाने वय-२८ धंदा-घरकाम रा.-गदाना ता.-खुलताबाद जि. औरंगाबाद

-: विरुध्दः-

गैरअर्जदार - महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत...

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ४ यांनी या मा.न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ४ यांचे वडील मयत नामे लक्ष्मण पि. रामराव उर्फ रागा मोटे यांचा मृत्यु दि. ०५/०६/२०२४ रोजी मौजे हिवरखेडा (ना.) ता.कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून मयतास केवळ अर्जदार क. १ ते ४ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत लक्ष्मण पि. रामराव उर्फ रामा मोटे यांचे शासकीय, निमशासकीय कार्यालय यांचेकडे वारस कारवाई करण्यासाठी हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहू जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क. १ ते ४ हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयत लक्ष्मण पि. रामराव उर्फ रामा मोटे यांचे शासकीय, निमशासकीय कार्यालय यांचेकडे मयत लक्ष्मण पि. रामराव उर्फ रामा मोटे यांचे वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा ... कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप गग्रहय धरला जाणार नाही.

करीता आज दि. १६/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्कयानिशी दिले आहे.

आदेशावरुन

क. लिपिक — सहा. अधिक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड)

### जाहीर प्रगटन

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे.व्ही.डी. पाटील साहेब) क.स्तर यांचे कोर्टात**

दि. किरकोळ अर्ज क. ३९०/२०२४
पु.ता. ०५/०२/२०२५

अर्जदार : १. श्रीमती. लिलाबाई भ्र.अशोक सपकाळ वय-६० धंदा घरकाम रा. टाकळी (अं.) ता. कन्नड जि. औरंगाबाद २. श्री. अरविंद पि.अशोक सपकाळ वय-३४ धंदा- शेती रा. टाकळी (अं.) ता. कन्नड जि. औरंगाबाद

-: विरूध्दः-

गैरअर्जदार महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ व २ यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ यांचे वडील मयत नामे अशोक पि. परमत सपकाळ यांचा मृत्यु दि. १९/०५/२०२४ रोजी मौजे टाकळी अं. ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून, मयतास केवळ अर्जदार क. १ व २ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत अशोक पि. परभत सपकाळ यांचे शासकीय, निमशासकीय कार्यालय यांचेकडे वारस कारवाई करण्यासाठी हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क. १ व २ हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयत अशोक पि. परमत सपकाळ यांचे शासकीय, निमशासकीय कार्यालय यांचेकडे मयत अशोक पि. परमत सपकाळ यांचे वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप गग्रहय धरला जाणार नाही.

करीता आज दि. १३/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्कयानिशी दिले आहे.

आदेशावरुन

क. लिपिक — सहा. अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. ए. आय आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क. ३७६/२०२४
पुढील तारीख २०/०१/२०२५

अर्जदार १) अंजनाबाई भ्र. पूँजाबा घुगे, वय ८१ वर्षे, धंदा घरकाम, रा. देवपूळ ता. कन्नड जि. औरंगाबाद २) जिजाबाई पांडु ढाकणे, वय ६४ वर्षे, धंदा- घरकाम, रा. लिंगदरी, ता. जि. औरंगाबाद ३) अनुसयाबाई वबन ढाकणे, वय ४१ वर्षे, धंदा- घरकाम, रा. लिंगदरी, ता. जि. औरंगाबाद ४) अंबादास पुंजाबा घुगे, (भयत) वारस ४-१) वैभव अंबादास घुगे, वय २१ वर्ष, धंदा- शेती, रा. देवपुळ ता. कन्नड जि. औरंगाबाद ह.मु. रोहीणी ता. चाळीसगाव जि. जळगाव

विरुध्द

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन- तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ यु. ए. वारे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ४-१ हे वरील ठिकाणचे रहीवाशी आहे. अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ ते ४ यांची आई असुन अर्जदार क्र. ४-१ हा त्यांचा नातु आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील तसेच अर्जदार क्र. ४-१ चे आजोबा नामे पुंजाबा गणु घुगे हे होते ते दिनांक ०२/०९/२०२१ रोजी मौजे देवपुळ ता. कन्नड येथे राहत्या घरी मयत झालेले आहे. अर्जदार क्र. ४ नामे अंबादास पुंजाबा घुगे हा मयत पुंजाबा गणु घुगे यांचा मुलागा होता तो दिनांक २७/०६/२००७ रोजी मौजे देवपूळ ता. कन्नड येथे मयत झालेला आहे. तसेच मयत अंबादास पुंजाबा पुगे यांची पत्नी योगोता अंबादास घुगे ही देखील दिनांक २१/०८/२०१३ रोजी मयत झालेली आहे त्यांचा अर्जदार क्र. ४-१ हा वारस आहे. सोबत मयतांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. वरील अजदार क्र. १ ते ४-१ हे (मयत) पुंजाबा गणू घुगे यांचे एकमेय वारस आहे,

अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात, तलाठी कार्यालयात, महसुल अधिकारी त्र तहसिल कार्यालय येथे मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी मा. न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची मागणी केल्याने सदरील अर्ज करण्यास कारण घडले आहे.

त्याअर्थी सदरील जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की सदरील प्रकरणाबाबत कोणाचाही काही उजर, आक्षेप अथवा वारसाचे नोंद प्रमाणपत्र अर्जदाराला देण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत मा. कन्नड येथील दिवाणी न्यायालयात स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर होउन उजर, आक्षेप नोंदवावा व मुदतीत उजर आक्षेप न असल्यास अर्जदारांच्या हक्कात वारसाचे प्रमाणपत्र देण्याचे आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

करीता हे जाहीर प्रगटन.
दिनांक ०५/१२/२०२४

आदेशावरुन

क. लिपिक — सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. व्ही. एन. काटकर मॅडम दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात,**

पु.ता. ६/१/२५
दि.कि. अर्ज क्र. ३६२/२०२४

अर्जदार : १- सुमित पि. साहेबराव डोळस, वय- ३१ वर्ष, धंदा. शेती, रा. शांतीनगर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद २- मिना रामचंद्र उबाळे, वय ३९ वर्ष, धंदा घरकाम, रा. अंबेलोहळ ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३- अरुणा संजय बनकर, वय ३६ वर्ष, धंदा घरकाम. रा. अंबेलोहळ ता, गंगापुर जि. औरंगाबाद ४- नंदा नामदेव सोनवणे, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. अजवा नगर वाळुज, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ५- केसरबाई भ्र. साहेबराव डोळस, वय ५८ वर्ष, धंदा- घरकाम, रा. शांतीनगर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन - तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ एस. आर. शिंदे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे रहीवाशी असून अर्जदार क्र. १ ते ४ हे सख्खे भाऊ बहीन असून अर्जदार क्र. ५ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील व अर्जदार क्र. ५ यांचे पती नामे साहेबराव नागोराव डोळस हे होते ते दिनांक ०३/०१/२०२४ रोजी मौजे शांतीनगर कन्नड येथे राहत्या घरी मयत झालेले आहे. सोबत मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे.

वरील अर्जदार हे (मयत) साहेबराव नागोराव डोळस यांचे एकमेव वारस आहे या व्यतीरीक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी तसेच तलाठी कार्यालयात, महसुल अधिकारी व तहसिल कार्यालय येथे मयताचे वारस असल्यांची नोंद करण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र आश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत मा. दिवाणी न्यायालय कन्नड येथे स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.
दिनांक ०५/१२/२०२४

आदेशावरुन

क. लिपिक — सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## संक्षिप्त वृत्त...

### श्रीराम प्रतिष्ठान आयोजित सुरभी महोत्सवातंर्गत वैयक्तीक नृत्य स्पर्धा सेलूत संपन्न

**सेलू,/प्रतिनिधी-** श्रीराम प्रतिष्ठान आयोजित सुरभी महोत्सवानिमित्त वैयक्तिक नृत्या स्पर्धा साई नाट्य सभागृह येथे रविवार १५ रोजी उत्साहात पार पडली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे, सचिव डॉ. सविता रोडगे, प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे, परीक्षक प्रीती भाबट, पल्लवी मुंडलिक, अलका अडळकर, उत्कर्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रा. कैलास ताठे, ज्ञानतीर्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रा. हरीश कांबळे, राजेंद्र जाधव, विकास कावळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कैलास ताठे यांनी केले.परीक्षकांनी नृत्या स्पर्धेचे नियम व नृत्याकलेबाबत उपयुक्त मार्गदर्शन करत स्पर्धकांचे कौतुक केले. या वैयक्तिक नृत्या स्पर्धेत एल.के.आर. प्रिन्स इंग्लिश स्कूल, प्रॉस्परस पब्लिक स्कूल, उत्कर्ष विद्यालय व ज्ञानतीर्थ माध्यमिक या घटक संस्थेतील १३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या उत्कृष्ट नृत्याकौशल्याने प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कल्पना भाबट, सारिका ताठे यांनी केले. तसेच त्याांना ओजस्वी, अंशिका व अक्षरा या लहानग्यांनी सुंदर साथ दिली, ज्यामुळे प्रेक्षकांनी त्याांचे विशेष कौतुक केले. या उपक्रमाला पालक व शहरातील नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीराम प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व शिक्षकवर्गाने विशेष पुढाकार घेतला.

### जुन्या पिढीतील डाँ.सुनंदा मंत्री यांचे निधन

**परभणी,/प्रतिनिधी-** जुन्या पिढीतील तथा परभणी जिल्ह्यातील



पहिल्या महिला डॉक्टर श्रीमती सुनंदा लक्ष्मीनारायण मंत्री यांचे रविवारी रात्री वसमत रस्त्याावरील मंत्री कॉम्प्लेक्स मधील निवासस्थानी वृद्धापकाळामुळे निधन झाले. मृत्यूसमयी त्याा ९६ वर्षांच्या होत्याा. त्याांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून,जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे. येथील पद्मराज एनर्जी इंडिया लिमिटेड प्रकल्पाचे संचालक संजय मंत्री यांच्या त्या मातोश्री होत.

### एसएसबी परिक्षेकरिता अर्ज सादर करावेत

**परभणी,/प्रतिनिधी-** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना एसएसबी परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे राज्य शासनातर्फे दि. ३० डिसेंबर, २०२४ ते ०८ जानेवारी, २०२५ या कालावधीत एसएसबी कोर्स क्र. ६० आयोजित करण्यात येत आहे. या कालावधीत प्रशिक्षणार्थींना नि:शुल्क प्रशिक्षण व निवास भोजन दिले जाते.

परभणी जिल्हातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, परभणी येथे मंगळवार, दि. १८ डिसेंबर २०२४ रोजी मुलाखतीस उपस्थित रहावे. मुलाखतीस येतेवेळी सैनिक कल्याण विभागच्या संकेतस्थळावर एसएसबी-६० कोर्ससाठी (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या प्रवेशपत्र व त्याासोबत परिशिष्टांची प्रत परिपूर्ण भरून सोबत आणावी. या प्रशिक्षणामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खालील पात्रता असणे आवश्यक आहे व त्याासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येताना सोबत आणावेत. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेल आयडी व दूरध्वनी ०२५३-२४५१०३२ किंवा व्हाट्सअप क्र. ९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत प्रत्याक्ष अथवा संपर्क करावा, असे आवाहन केले आहे.

# अनेक वर्षानंतर मिळाले, जिंतूरला मंत्रीपद

## जिल्हा परिषदेपासून सुरू झालेला प्रवास मंत्रीपदावर पोहोचला

### जिंतूर नगरीत नागरिकांसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा एकच जल्लोष, आगमनाची प्रतिक्षा

**रामप्रसाद कंठाळे**
**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर विधानसभा मतदार संघाच्या विद्यमान आमदार सौ.मेघना साकोरे बोर्डीकर यांची आज राज्य मंत्रीमंडळात राज्यमंत्री म्हणून वर्णी लागली; त्यामुळे ज्येष्ठ नेते माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांची मंत्रिपदाची अपुरी इच्छा सौ.साकोरे यांनी म्हणजे बोर्डीकर कन्येने पूर्ण केली.

जिंतूर विधानसभा मतदारसंघात ज्येष्ठ नेते बोर्डीकर यांचा मोठा प्रभाव राहिला आहे.

विशेषता: या मतदारसंघातून बोर्डीकर यांनी तीन वेळा प्रतिनिधित्व केले आहे. एक वेळेस ते विधान परिषद सदस्य म्हणून सुद्धा कार्यरत होते. बोर्डीकर यांना आपल्या आमदारकीच्या या कारकिर्दीत मंत्रीपदाची मोठी इच्छा होती. त्यासाठी त्यावेळी त्याांनी मुंबई दिल्लीत पक्षश्रेष्ठींपर्यंत मोठी लॉबिंग केली. परंतु श्रेष्ठींनी बोर्डीकर यांना कधीही मंत्री पदाची संधी दिली नाही,त्याामुळे बोर्डीकर हे यांचे मंत्री पदाचे स्वप्न राहिले होते अखेर कन्या सौ.साकोरे यांना बोर्डीकर यांनी आपले राजकीय वारसदार म्हणून या मतदारसंघातून पुढे आणले, २०११ यावर्षी साकोरै यांनी जिल्हा परिषद निवडणुकीच्या माध्यमातून परभणी जिल्ह्याच्या राजकीय क्षेत्रात पदार्पण केले,पुढे





जिंतूर विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीची कास धरून २०१९ च्या निवडणुकीत अल्प का होईना मताधिक्याने विजय मिळवला होता. २०२४ च्या निवडणुकीत सुद्धा त्याा अटीतटीच्या लढतीतून विजयी झाल्या,

वास्तविकता ही निवडणूक सोपी नव्हती,सौ.साकोरे व बोर्डीकर कुटुंबियांनी निवडणूक अत्यांत प्रतिष्ठेची केली. विशेषता या निवडणुकीत या कुटुंबीयांनी वाडी, तांड्यांपासून तालुका स्थानापर्यंत कानाकोपरे अक्षरशः पिंजून काढले. प्रचार केला व सर्वसामान्य मतदारांपर्यंत पोहोचण्याचा मोठा आटापिटा केला. वास्तविकता बोर्डीकर यांच्या विरोधात आणि फॅक्टर कार्यरत होते, परंतु या कुटुंबीयांनी या सर्व वातावरणावर मात केली आणि विजय प्राप्त केला. त्याामुळे या निवडणुकीत साकोरे यांचा विजय लक्षवेधी ठरला अन राज्य मंत्रिमंडळात सौ.साकोरे यांना मंत्रीमंडळात समावेशाचा मार्ग मोकळा झाला. राजाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या गुड बुक मध्ये बोर्डीकर कुटुंबीयांचा समावेश आहे. त्याामुळे सौ.साकोरे यांची राज्य मंत्रिमंडळात निश्चित वर्णी लागेल हे अपेक्षित होते. अपेक्षेप्रमाणे आज बोर्डीकर यांचे राज्य मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून निवड झाली नागपुरातील भव्य कार्यक्रमात शपथविधी झाला.सहाजिकच जिंतूर सेलू या भागात जल्लोष साजरा झाला. बोर्डीकर यांचे समर्थक व भाजपाच्या कार्यकर्त्यांनी ठिकाणी आनंदोत्सव साजरा केला

ज्येष्ठ नेते बोर्डीकर यांचे मंत्रिपदाचे अधुरे स्वप्न साकोरे यांच्याद्वारे पूर्ण झाले हे खरे त्याा वडिलांची पूण्याई व सौ.साकोरे यांची मेहनत कारणीभूत आहे.

## हादगाव बु.येथे नवीन स्मशाभुमीचे भुमिपूजन

### वाढती लोकसंख्या विचारात घेता ग्रामपंचायतचा पुढाकार

**पाथरी,/प्रतिनिधी:** हादगाव बु येथे लोकसंख्येचा विचार करता भविष्यात स्मशानभूमीचा प्रश्नी समस्या निर्माण होऊ नये यासाठी ग्रामपंचायत पुढाकारातून एका नविन स्मशानभुमीच्या कामाचा शुभारंभ ग्रा.प.चे मार्गदर्शक तथा पाथरी बाजार समितीचे सभापती अनिलराव नखाते यांचे हस्ते शनिवारी करण्यात आले.

सामाजिक आणि भावनिकदृष्ट्या महत्वाचा प्रश्न मार्गी लागल्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. हादगाव बु येथे ग्रामपंचायत पुढाकाराने जनसुविधा योजना अंतर्गत झिंजाण परिवारासाठी



स्वतंत्र नविन स्मशानभुमीची मंजुरी घेतली.याचा भुमिपुजन सोहळा शनिवारी बाजार समितीचे सभापती अनिलराव नखाते यांचे हस्ते करण्यात आले.यावेळी सरपंच बिभिषण नखाते , ग्राम सेवक के. जी. फंड, चेअरमन बाबासाहेब नखाते, ग्रा.पं सदस्य बालासाहेब झिंजाण. बि.टी. कदम, सोसायटी संचालक भगवान झिंजाण, माणिक झिंजाण, संतोष झिंजाण, वैजनाथ नखाते, किशन झिंजाण, रामनाथ नखाते, महादेव झिंजाण, कैलास नखाते, सुरेश नखाते,जानकिराम नखाते, पि.आर. नखाते, दिलीप झिंजाण, धनंजय नखाते, कैलास झिंजाण, गणेश जाधव, बालासाहेब लालझरे, नारायण गायकवाड, शेख सलीम यांची उपस्थिती होती. हादगाव बु येथे वाढती लोकसंख्या पाहता आहे ती स्मशानभूमी आपुरी पडत होती.त्याामुळे आता झिंजाण परिवारासाठी स्वतंत्र स्मशानभूमी होणार असल्याने भविष्यात हि समस्या येणार नाही.

## शरीर निरोगी ठेवण्यासाठी योगा करणे आवश्यक- रायपत्रीवार

**जिंतूर,/प्रतिनिधी-** शहरातील तहसील कार्यालयातील प्रांगणात पतंजली योग समितीच्या वतीने होमगार्ड यांनी योग व प्राणायमाचा आनंद घेतला.

चावेळी योग शिक्षक पतंजली तालुका मीडिया प्रभारी सचिन रायपत्रीवार यांनी प्राणायाम मध्ये अनुलोम विलोम, कपालभाती , भ्रमरी, व वृक्षासन, ताडासन, वक्रासान, चंद्रासन, सेतुबंध आसन घेत योगाची माहिती दिली. योग केल्याने माणसाचे शरीरातील स्नायू बळकट होते तसेच योग दररोज केल्याने शरीर तंदुरुस्त राहते म्हणून म्हणतात ''करा योग रहा निरोग'' या मंत्राचा उपयोग केला तर मनुष्याला रोगा पासून दूर ठेवते. त्याा वेळी समादेशक राजेश जाधव यांच्या सह महिला व पुरुष होमगार्ड उपस्थित होते.





जिंतूर- विधानसभेच्या अधिवेशन कालावधीत पहिल्या दिवशी राज्यमंत्री आ.मेघना साकोरे यांच्या समवेत, दिपक साकोरे, अमोल यादव, ध्रुव साकोरे आणि सुनिल भोंबे पाटील दिसत आहेत.

## महाराष्ट्र बंदला सेलूत प्रतिसाद; सुर्यवंशी प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची मागणी

**सेलू,/प्रतिनिधी:** पोलीसांच्या अमानूष मारहाणीत न्यायालयीन कोठडीत मयत झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणातील दोषीवर सदोष मणूष्यवधाचा गून्हा दाखल करण्याची मागणी सोमवार १६ रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.महाराष्ट्र बंदला प्रतिसाद मिळाला

या निवेदनात कोंबिंग आँपरेशन प्रकरणाची न्यायालयीन चौकशी,कलम १७६ (१) सिआरपीसी अन्वये चौकशी,चौकशी सेवानिवृत्त न्यायाधिशाकडून न करता सिटींग न्यायाधिशामार्फत करण्यात यावी.सदरिल प्रकरणातील वादग्रस्त पोलीस अधिकारी अशोक घोरबांड सह इतरांवर कलम ३२ अन्वये अँट्राँसिटी कायद्यान्वे कलम ३(१)व ३(२) प्रमाणे गून्हे दाखल करून त्याांच्यावर सदोष मनूष्यवधाचा गून्हा दाखल करण्यात यावा.तसेच परभणी शहरातील पोलीस स्टेशन मधील



सिसिटीव्ही जप्त करून तपासावेत.मयत सोमनाथ सोमवंशी यांच्या कूटूंबियांना सरकारने ५० लाखाची

आर्थीक मदत करून कूटूंबातील सदस्यांस शासकीय नौकरीत समावून घ्यावे,तसेच वच्छलाबाई मानवते यांना मारहाण केलेल्या पोलीसांवर ३५४,३०७ अंतर्गत गून्हे दाखल करून निलंबित करून मानवते यांना १० लाख रूपये आर्थीक मदत करून पूर्नवसन करावे,न्यायालयीन कोठडीतील बांधवांची न्यायाधिशासमोर रूग्णालयात तपासणी करावी,कोंबिग आँपरेशनच्या नावाखाली पोलीसांनी केलेली समाजातील नागरीकांच्या घराची तसेच निर्दोष जखमींना मदत संविधान शिल्पाची विटंबना करणा-या सोपान पवार याच्यावर देशद्रोहाचा गून्हा दाखल करण्यात यावा तसेच १० डिसेंबर रोजी सकल हिंदू समाज मोर्चातील संयोजक याची चौकशी करून मोर्च्यातील भाषणे तपासून कारवाही करावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत शहरात शांततेत मार्च काढून तहसिलदार डाँ.शिवाजी मगर यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले यासाठी अँड.विष्णू ढोले,बालिशन साळवे,राणू ढोले,बापू धापसे,लताबाई नाडभजे,मीनाताई बंदूके,लक्ष्मीताई राक्षे,आशाताई बंदूके,सविता प्रधान,सविता भूजबळ,लता मगर,गिरजाबाई साळवे,अरूणा इंगळे सह आदींनी पूढाकार घेतला.

# निसर्गाच्या तावडीतून पीक सोडवलं पण विकताना डोळं पानावलं.!
# शेतीमालाला किफायतशीर भाव मिळत नसल्याने शेतकरी ढासळला

**बाबासाहेब गर्जे**
**सोनपेठ,/प्रतिनिधी:** निसर्गाच्या असुरक्षित लहरीपणाला बळीराजा वैतागला असून प्रत्योक वर्षी येणाऱ्या संकटावर मात करत पुन्हा नव्या उमेदीने काळ्या आईची ओटी भरत असतो. यावर्षीची खरीपाची पेरणी वेळेत झाली परंतु पुढे पावसाने सर्वत्र दाणादाण उडवली. त्याामध्ये सोयाबीन, कापूस, मुग, उडीद आदी पिकांना अतिवृष्टीचा तडाका बसला. त्याामधून कसेबसे वाचवलेलं पीक विक्री करताना मिळत असलेल्या तोकड्या भावामुळे शेतकऱ्याचे डोळे पानावले जात आहेत. परिणामी कष्टातून मिळविलेल्या शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतीमध्ये केलेला खर्चही निघणे मुश्किल बनले आहे. शेतकऱ्यांच्या कर्जाचा आलेख वाढतच चालला आहे.



त्याातून शेतकरी पुरता खचल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

या वर्षातील खरिपाची पेरणी वेळेत म्हणजे मृग नक्षत्रावरच झाली पाऊसही बऱ्यापैकी झाला. त्याामुळे शेतकऱ्यांनी अती उल्लासातून कर्ज काढून शेती खर्च भागवला. पुढे पीक जोमाने आले परंतु ऑगस्ट सप्टेंबर मध्ये पावसाचा जोर वाढला. सोनपेठ तालुक्यासह परभणी जिल्ह्यात अतिवृष्टी झाली आणि त्याामध्ये सोनपेठ तालुक्यातील बहारुन आलेल्या पिकांची राख रांगोळी झाली! शेतीमध्ये साचलेल्या गुडघाभर पाण्यातून सोयाबीन काढणीला कशीबशी सुरुवात केली असताना वरतून पावसाने पुन्हा ठेका धरला व उभी सोयाबीन नासून गेली. अनेकांना तर सोयाबीन कापणी शक्य झाली नाही तर कापसाचे भरलेली बोंड नासून गेली. फुटलेला कापूस जमिनीवर लोळू लागला आणि पावसाचा जोर पुढे वाढतच गेला. यातून शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले. न भरून निघणाऱ्या नुकसानाने शेतकरी पुरता खचून गेला. त्याातून कसेबसे हाती लागलेले पीक विक्रीसाठी आज बाजारपेठेत नेत असताना कवडीमोल भावाने विकणारे पीक पाहून शेतकऱ्या मनाला जखमा होत आहेत. सध्या बाजारपेठेत सोयाबीन ३५०० ते ३९०० रुपये भावाने विक्री होत आहे, तर हमीभावाने सुरू केलेल्या शासनाच्या सोयाबीन खरेदी केंद्रावर चाळणीतून अर्धी सोयाबीन खाली पाडून वापस केली जात आहे. त्याातही ऑनलाईन नोंदणी सारख्या जाचक अटीतून शेतकऱ्यांना वेठीस धरले जात आहे. सोयाबीन पेक्षा कापूस विक्रीची फजिती वेगळी नाही. सध्या सोनपेठ तालुक्यात शासनाच्या आधारभूत किमतीचे एकही सीसीआय कापूस खरेदी केंद्र अद्याप पर्यंत सुरू नाही. त्याामुळे येथील शेतकऱ्यांना बीड जिल्ह्यातील जवळच्या मंजीत कॉटन या सीसीआय खरेदी केंद्राचा आधार घ्यावा लागत आहे. त्याातच पांढऱ्या सोन्याला कवडीमोल भाव मिळत असून सीसीआय केंद्रावर घेऊन गेलेल्या शेतकऱ्यांच्या कापसाला सात हजार चारशे रुपये पर्यंतचा भाव मिळत आहे. तर खाजगी कापूस खरेदी केंद्रावर ६ हजार ५०० रुपये ते ७००० रुपये प्रति क्विंटल दराने कापूस खरेदी केली जात आहे.सध्या मिळत असलेल्या कापसाच्या पैशातून शेतकऱ्यांच्या पिकांचा खर्चही निघणे मुश्किल झाले आहे. परिणामी शेतकऱ्यावर शेती विकून उदरनिर्वाह चालवण्याची वेळ आली आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी आपल्या शेती विक्रीस काढल्या असल्या तरी शेतीलाही योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी वर्ग चिंतेत दिसून येत आहे. यासाठी शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर उभे राहून शेतकरी समृद्ध करायचा असेल तर शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव द्यायला हवा जेणेकरून जगाचा पोशिंदा स्वावलंबी होईल. अन्यथा बळीराजाच्या हाती झोळी घेण्याची वेळ येईल हे मात्र नक्की.



# विपश्यना केंद्र विकसित करण्यासाठी योग्य ते सहकार्य करण्यात येईल– गोयल

## जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्याहस्ते वृक्षारोपन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ डिसेंबर.**



चिंचोली येथे उभारण्यात आलेल्या विपश्यना केंद्र चांगल्या पध्दतीने विकसित करण्यासाठी परिसरात पाणी, वीज, रस्त्याची कामे प्राधान्याने करण्यासाठी योग्य ते सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी यावेळी केले.

हिंगोली जिल्हा विपश्यना समितीच्या वतीने तसेच सामाजिक वनीकरण विभाग उगम ग्रामीण विकास संस्थेच्या पुढाकाराने हिंगोली तालुक्यातील चिंचोली (महादेव) येथील धम्मदेस विपश्यना केंद्रावर आनापान, विपश्यना परिचय सत्र व वृक्षारोपण कार्यक्रमानिमित्त आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी श्री. अभिनव गोयल बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, आश्विनकुमार माने, गटविकास अधिकारी डी. आय. गायकवाड, उगम संस्थेचे जयाजी पाईकराव, विपश्यना आचार्य डॉ. संग्राम जोंधळे, विपश्यना वरिष्ठ सहाय आचार्य डॉ. श्रीराम राठोड, विपश्यना सहायक आचार्य शरद चालीकवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

विपश्यनामुळे स्वत: आत्मलीन होऊन सर्वांमध्ये शांती, समाधान निर्माण करण्याचे चांगले काम होत आहे. या विपश्यनाच्या माध्यमातून शांतीचा संदेश देण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक गावातील नागरिकांसाठी किमान दहा दिवसांचे शिबीर झाले पाहिजेत. सध्याच्या धावपळीच्या जीवनात आनंददायी व तणावमुक्त जीवन जगण्यासाठी विपश्यना ही साधना अत्यंत उपयुक्त आहे. काय चूक आणि काय बरोबर यावर नियंत्रण आणण्यासाठी आनपान ही ध्यान साधना श्वासाच्या माध्यमातून करुन ती सोडवता येते. जिल्ह्यात विपश्यना केंद्राची सुरुवात हिंगोली तालुक्यातील चिंचोली येथे चांगल्या पध्दतीने सुरु आहे, ही आनंदाची बाब आहे. जिल्ह्यातील नागरिक, अधिकारी, कर्मचारी यांनी चांगले जीवन जगण्यासाठी टप्प्याटप्प्याने विपश्यना साधनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी यावेळी उपस्थित नागरिक, अधिकारी, कर्मचारी, साधकांना केले.

अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी शांतीचा संदेश देण्यासाठी व सेवाभाव कायम मनामध्ये ठेवण्यासाठी विपश्यना हा चांगला उपक्रम आहे. चिंचोली येथील विपश्यना केंद्राची जागा एकदम चांगली असून येथे वेगवेगळ्या ठिकाणावरुन येणाऱ्या साधकासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. याठिकाणी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती दिली. तसेच त्यांच्या सेवेच्या कालावधीत आलेल्या अडचणी आणि त्यावरील उपाययोजना करण्यासाठी विपश्यनेचा उपयोग होतो, याची माहितीही त्यांनी प्रास्ताविकात दिली.

यावेळी विपश्यना समितीच्या वतीने विपश्यना केंद्रासाठी आवश्यक पाणी, वीज, रस्ता, कंपाऊंडसाठी तरतूद उपलब्ध करुन द्यावी, अशी मागणी केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आनापान, विपश्यना याविषयी परिचय करुन देण्यात आले. तसेच यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सहायक लागवड अधिकारी टी.एम. सय्यद यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, साधक, साधिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विपश्यनेच्या माध्यमातून आनंदी गावे निर्माण करावीत– गोयल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ डिसेंबर**



आनंद ही स्वत:ची अनुभती आहे. ते आपल्या स्वत:लाच तयार करावी लागते. प्रत्येक माणसाचे आनंदाचे स्त्रोत वेगवेगळे आहेत. भूतान हा सर्वांत आनंददायी देश आहे. आनंद निर्माण करण्याचे प्रकल्प विपश्यना आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी तणाव व विकार, व्यसनापासून मुक्ती मिळविण्यासाठी विपश्यना हे अत्यंत महत्वाचे साधन असून या माध्यमातून आपल्या गावात दररोज ध्यान शिबिरे घेऊन आपले गाव आनंदी गाव निर्माण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी चिंचोली येथील नागरिकांना केले.

हिंगोली तालुक्यातील चिंचोली (महादेव) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत आनंदी गाव उपक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, आश्विनकुमार माने, गटविकास अधिकारी डी. आय. गायकवाड, विपश्यना आचार्य डॉ. संग्राम जोंधळे, विपश्यना वरिष्ठ सहाय आचार्य डॉ. श्रीराम राठोड, विपश्यना सहायक आचार्य शरद चालीकवार यांची प्रमुख उपस्थिती होती. अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी आनंदी गाव उपक्रमांची संकल्पना व त्याचे महत्व याविषयीची माहिती प्रास्ताविकात दिली.

यावेळी विपश्यना आचार्य डॉ. संग्राम जोंधळे यांनी सुखशांतीचे जीवन जगण्यासाठी व अंतरमनातून आनंद मिळण्यासाठी विपश्यना आवश्यक असल्याचे सांगून आनंदी गाव उपक्रमाची सुरुवात परभणी जिल्ह्यातील कावलगाव (ता. पुर्णा) या गावातून झाली असल्याचे सांगितले. आचार्य डॉ. श्रीराम राठोड यांनी आनपान ही ध्यान साधना विद्यार्थ्यांसाठी अतिशय लाभदायी असल्याचे सांगितले. तर शरद चालीकवार यांनी दुखा:वर मात करण्याची ताकद साधनेत असल्याचे सांगून त्यांचे अनुभव कथन केले.

यावेळी आनंदी गाव कावलगाव येथे राबविण्यात असलेल्या विविध उपक्रमांची माहिती चित्रफितीद्वारे उपस्थित नागरिक, विद्यार्थ्यांना देण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी चिंचोली गावचे सरपंच, पोलीस पाटील, विविध पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यशाचा मार्ग सदैव संघर्षाच्या कसोटीतून जातो– डॉ अशोक बांगर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ डिसेंबर**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री संत भगवान बाबा, लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी आपल्या कर्तृत्वातून समाजाला दिशादर्शक व सामाजिक समतेकडे नेले आहे. इतरांच्याही धर्मांचा आदर करण्याच्या व सर्वांसाठी कल्याणकारी व्यवस्था निर्माण करण्याचे कार्य केलेला आहे. दलितांच्या मुक्तीसाठी भक्ती करणारे संत भगवान बाबा होते. आजच्या आधुनिक काळात यशाचा मार्ग मिळविण्यासाठी व समाजात समता निर्माण करण्यासाठी युवकांनी महापुरुषांच्या विचारांचे आचरण करावे ही आजच्या काळाची गरज झालेली आहे, असे आवाहन शिवचरित्रकार व सुप्रसिद्ध व्याख्याते डॉ. अशोक बांगर यांनी केले.

येथील श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान आयोजित राष्ट्रीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प सुप्रसिद्ध व्याख्याते शिवचरित्रकार डॉ. अशोक बांगर बीड यांनी बहुजनांचे प्रेरणास्थान एक चिंतन या विषयावर व्याख्यान दिले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. तानाजीराव मुटकुळे, उद्घाटक म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, प्रमुख पाहुणे माजी आमदार गजाननराव घुगे, माजी नगरअध्यक्ष बाबाराव बांगर, लक्ष्मणराव बुधवंत व व्याख्याते डॉ. अशोक बांगर व माता भगिनी व बंधू हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गोपीनाथराव म्हणजे एक परीस होते, त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाचे सोने झाले. माझ्या राजकीय कारकीर्दीतील मार्गदर्शक म्हणजे मुंडे साहेब आहेत असे मनोगत आमदार तानाजी मुटकुळे यांनी व्यक्त करत कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला.

यावेळी पुढे बोलतांना डॉ बांगर म्हणाले की, राजकारणातील उच्च पदावर विराजमान झाल्यानंतर सुद्धा ऊसतोड कामगाराच्या प्रश्नांना उकल व मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ असे नाव देण्यासाठी केलेला संघर्ष सर्वसामान्यांचे प्रश्न सहानुभूतीने व समन्वयाने सोडणारा लोकनेता म्हणजे गोपीनाथराव आहेत त्यांच्या विचारांचे जागर केला पाहिजेत. सूत्रसंचालन सारंग गीते, प्रास्ताविक एकनाथ कुटे पाहुण्यांचा परिचय राजकुमार मोरगे,आभार प्रदर्शन सुनील घुगे यांनी केले.



**हिंगोली– परभणी येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर शहरासह जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी येथील गांधी चौकासह इतर ठिकाणी पोलिस प्रशासनाच्यावतीने चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन करण्यात आले आहे. छाया– विजय गुंडेकर**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे स्थळ बदलण्याचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ डिसेंबर**



येथील बौद्ध संस्कृती मंडळाच्या कार्यकारी मंडळाची बैठक नुकतीच पार पडले असून त्यामध्ये यावर्षी आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालीचे स्थळ बदलण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बौद्ध सांस्कृतिक कार्यकारी मंडळ व व्याख्यानमाला आयोजन समितीची बैठक मंडळाचे जेष्ठ सल्लागार यु. पी. खंदारे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत यंदाच्या व्याख्यानमाला आयोजन संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. त्या मध्ये दरवर्षी जागेची येणारी अडचण पाहता सर्व बाबींनी सोयीस्कर असे स्थळ निवडण्यावर चर्चा झाली. त्यात यावर्षी रेल्वे स्टेशनच्या बाजूला असलेले उज्वल इंग्लिश स्कूल या ठिकाणी व्याख्यानमाला आयोजित करण्याचे ठरले. दरवर्षीप्रमाणे १७ ते १९ जानेवारी असे ३ दिवस व्याख्यानमाला आयोजित करण्याचे ठरले. व्याख्यानाचे विषय आणि व्याख्यात्यांची निवड यावरही चर्चा करण्यात आली त्यामध्ये विषय व व्याख्यात्यांची यादी करण्यात आली. बैठकीस कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. शत्रुघ्न जाधव, उपाध्यक्ष कैलास भुजंगळे, सुभाष भिसे, सहसचिव भीमराव कुरुडे, कोषाध्यक्ष प्रा.डॉ. सचिन हटकर सल्लागार आर.बी.वाढे, यांच्यासह संयोजन समितीतील प्रकाश इंगोले, बबन गायकवाड, रामा वाकळे, बबन दांडेकर, प्रविण रुईकर, रवींद्र पठाडे, भीमराव तुरुकमाने, गंगाधर पाईकराव आदींची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### दत्त जयंतीनिमित्त रेणापूर येथे कुस्ती स्पर्धा संपन्न



हिंगोली– दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मौजे रेनापुर ता. कळमनुरी येथे दत्त जयंती निमित्त पालखी सोहळा व विविध स्पर्धांचे आयोजन केले गेले. यावर्षी कुस्ती स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये दोन्ही मल्ल तुल्यबळ ठरले प्रथम पारितोषिक संदीप भुतनर रा. सावंगी व मेहबूब पैलवान रा. वाशीम यांना विभागून देण्यात आले. पंच म्हणून गजानन पवार यांनी निर्णय दिला. या दोघांना दत्त मंदिर समितीचे सचिव आश्विन बळीराम पतंगे व कोषाध्यक्ष माधव केशवराव पतंगे यांच्या हस्ते रुपये ७००० रोख रक्कम विभागून देण्यात आली. यावेळी उपसरपंच भाऊराव शेषराव पतंगे, हनुमान काशीराम पतंगे, सुभाष कुंडलिकराव शृंगारे, विलास दत्तराव शृंगारे, भिकाजी नामाजी शृंगारे, सचिन रंगराव पतंगे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

### शिरडशहापूर विश्वकर्मा प्रशिक्षण केंद्राचे उद्‌घाटन



औंढा नागनाथ– औंढा तालुक्यातील शिरडशहापूर येथे युवा विकास कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे रेसन्स इंग्लिश स्कूल येथे उद्घाटन करण्यात आले युवा-युवती साठी प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास द्वारे दोन कोर्स डेटा एन्ट्री व सोलर पंप टेक्निशियन हा कोर्स सुरू करण्यात आला आहे. पी एम विश्वकर्मा साठी अधिकृत प्रशिक्षण केंद्र सुद्धा सुरू झाले आहे. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जि प उपाध्यक्ष मिलिंद यंबल व प्रमुख अतिथी म्हणून आशिष वाजपेयी, राहुल मेने यांनी प्रशिक्षणार्थी यांना मार्गदर्शन केले. समारोपीय भाषण सौ साखरे यांनी केले प्रमुख उपस्थितीमध्ये सरपंच जितू रावले, अनदीप यंबल, अलका यबल, अनुष्का मक्रिवार, गंगाप्रसाद लांडगे व गावातील इतर प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# हिंगोलीच्या पुष्यमित्रला राज्यस्तरीय महोत्सवाचे विजेतेपद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ डिसेंबर**



क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड व युवा व खेल मंत्रालय भारत सरकार, नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नुकत्याच नांदेड येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय युवा महोत्सवात विज्ञान तंत्रज्ञान आधारित स्पर्धा (सायन्स मेला) या प्रकारात पुष्यमित्र जोशी यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले असून आता मा.पंतप्रधानांच्या उपस्थितीत भारत मंडपम् येथे संपन्न होणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवात पुष्यमित्र जोशी महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रामधून पुष्यमित्र जोशीच केवळ राष्ट्रीय स्तरावर राज्याचे विज्ञान तंत्रज्ञान विषयात प्रतिनिधीत्व करणार आहे.

४ ते १४ सप्टेंबर दरम्यान राज्यातील ३६ जिल्हे व त्यानंतर ६ विभागस्तरीय स्पर्धांमधून झालेल्या विजेत्यांची राज्यस्तरीय स्पर्धा नांदेडमध्ये संपन्न झाली. यामध्ये विज्ञान तंत्रज्ञान संकल्पना आधारित स्पर्धांमध्ये पुष्यमित्र ने आपले संशोधन सादर करत तज्ज्ञांची वाहवा मिळवली. पुष्यमित्र जोशीने क्रीडा उपसंचालक युवराज नाईक, सहायक संचालक मिलींद दीक्षित, क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे,राजेश्वर मारावार आदींच्या हस्ते सन्मानचिन्ह स्वीकारले. हिंगोलीमधून राज्यस्तरीय युवा महोत्सव जिंकणारा व राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधीत्व करणारा पुष्यमित्र पहिलाच ठरला आहे.

# लोकन्यालयामध्ये ३ कोटी ३३ लाख रूपयांची प्रकरणे निकाली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ डिसेंबर**



तालुका विधी सेवा समिती, हिंगोली यांनी सर्वोच्च न्यायालय तसेच उच्च न्यायालय मुंबई आणि जिल्हा न्यायालय, परभणी तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली न्यायालयामध्ये शनिवारी (दि. १४) राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकन्यायालयामध्ये प्रलंबित ११८९ प्रकरणे तसेच विद्युत महावितरण कंपनी व विविध बँका यांची वाद दाखलपूर्व ४६७८ प्रकरणे तडजोडीसाठी लोकअदालतीमध्ये ठेवण्यात आली होती.

या लोकअदालतीमध्ये प्रलंबित ९५ व वाद दाखलपूर्व १०० प्रकरणे अशी एकूण १९५ प्रकरणे निकाली काढण्यात आली. या लोकन्यायालयात प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणात ३ कोटी ३३ लाख २४ हजार ५०३ रुपयांची तडजोडी आधारे रक्कम ठरविण्यात आली व प्रकरणे निकाली काढण्यात आली. या लोकन्यायालयासाठी हिंगोली येथील न्यायिक अधिकारी तसेच विधिज्ञ समाविष्ठ असलेले एकूण पाच पॅनल करण्यात आले होते.

या लोकअदालतमध्ये जिल्हा न्यायाधीश-१ तथा तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष आर. व्ही. लोखंडे यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा न्यायाधीश-१ आर.व्ही. लोखंडे, जिल्हा न्यायाधीश-२ श्रीमती एस.एन. माने-गाडेकर, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर जी.के. नंदनवार,दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर डी.यु. राजपूत, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. पी. आर. पमनानी यांनी पॅनल प्रमुख म्हणून काम केले.

या लोकअदालतीला वकील संघाचे अध्यक्ष ॲड. शिवशंकर वाबळे (उमरेकर), उपाध्यक्ष ॲड.श्री. डी.पी. भाकरे, वकील संघाचे सचिव ॲड. अजय वानखडे, वकील संघाचे सहसचिव ॲड.नवनाथ पारोकर व सर्व सन्माननीय वकील सभासद, न्यायालयीन कर्मचारी व पोलीस कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**लोकन्यायालयामुळे मिळाला तात्काळ न्याय पक्षकारास २८ लाखाचा धनादेश सुपूर्द**

या लोकन्यायालयामध्ये गंगासागर संदीप सरकटे, वय ३५ वर्षे हिचे पती नामे संदिप मोहन सरकटे ह्यांचा दिनांक ०३ जानेवारी, २०२३ रोजी हिंगोली ते जवळा-पळशी रोडवर नांदु-याजवळ मोटारसायकलने अपघात झाला होता. या अपघातामध्ये तिचे पती मयत झाल्याने विद्यमान न्यायालय, हिंगोली येथे नुकसान भरपाई मिळण्यासाठी दावा दाखल केला होता. सदरील दावा २८ लाखांमध्ये तडजोडी अंती निकाली निघाला आहे. या प्रकरणांमध्ये लोकन्यायालयामुळे एका वर्षाच्या आत पक्षकाराला न्याय मिळाला आहे व लोकअदालतच्या दिवशीच तात्काळ कंपनीतर्फे पक्षकारांना सदरील रकमेचा धनादेश सुपुर्द करण्यात आला. सदरील धनादेश पॅनल प्रमुख तथा जिल्हा न्यायाधीश-१ राजेंद्र वि. लोखंडे व पॅनल प्रमुख तथा जिल्हा न्यायाधीश-२ श्रीमती एस.एन. माने-गाडेकर यांच्या हस्ते सुपुर्द करण्यात आला.